१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, रविवार ३ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३१७, पाने-८, किंमत : ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 317, Marathi - Daily - Pune, 3 August, 2025 Page- 8 Price- Rs. 7/-


24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## टेस्ला ऑटोपायलट कार अपघात! २,१०० कोटींची भरपाई



**फ्लोरिडा** - उद्योजक इलॉन मस्क यांच्या टेस्ला कंपनीच्या ऑटोपायलट कारचा ४ वर्षांपूर्वी फ्लोरिडात अपघात झाला. या प्रकरणात फ्लोरिडाच्या मियामी न्यायालयाने मस्क यांच्या कंपनीला दोषी धरत २४३ दशलक्ष डॉलर (अंदाजे २,१०० कोटी रुपये) भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. यावेळी कारचा चालक कार ऑटोपायलट मोडमध्ये ठेवून फोनवर व्यस्त होता. त्यावेळी सिस्टममधील बिघाडामुळे कारने एका जोडप्याला धडक दिली. यात महिलेचा मृत्यू झाला तर तिचा प्रियकर जखमी झाला होता. त्यानंतर पीडित कुटुंबाने टेस्लाविरुद्ध खटला दाखल केला होता. कंपनीने ऑटोपायलट सिस्टममधील दोष लपवला आणि अपघातापूर्वी आणि नंतर डेटा आणि व्हिडिओ फुटेजदेखील नष्ट केले, असा आरोप कुटुंबाने केला होता.

## बुद्धिबळ विश्वविजेती दिव्याला ३ कोटींचे बक्षीस प्रदान




**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महाराष्ट्र शासनातर्फे विश्वविजेती दिव्या देशमुखचा नागरी सत्कार केला. यावेळी दिव्याला मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते तीन कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात आले. यावेळी फडणवीस म्हणाले की, आम्ही बुद्धिबळ खेळतो, पण राजकारणात. मात्र दिव्या देशमुखने जागतिक बुद्धीबळ स्पर्धा जिंकून भारताचे नाव जगभरात झळकवले आहे.**

■ नागपूर

**या** कार्यक्रमाला मुख्यमंत्र्यांसह क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, ॲड. आशिष जयस्वाल, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष परिणय फुके यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते. दिव्या सत्काराला उत्तर देताना म्हणाली की, आजचा सत्कार माझ्यासाठी खास आहे. मी जेव्हा मोठ्या स्पर्धांमध्ये खेळले तेव्हा महाराष्ट्र सरकारकडून मला वेळोवेळी सहकार्य मिळाले आहे. ऑलिम्पियाड जिंकल्यानंतरही सरकारने मला रोख पारितोषिक दिले होते. काही महिन्यांपूर्वी नागपूरमध्ये माझ्यासाठी एक स्पर्धा आयोजित केली होती. सरकारच्या

» पान २ वर

# गुजराती-मराठी वाद लावण्याचा त्यांचा प्रयत्न पण मी व संजय राऊत हे घडू देणार नाही

**आज शेतकरी कामगार पक्षाच्या मेळाव्याच्या मंचावर पुन्हा एकदा ठाकरे ब्रँड दिसला. राज ठाकरे व संजय राऊत दोघेही हजर झाले. यावेळी परप्रांतीयांनी जमिनी विकत घेऊन रायगडचा सत्यानाश केल्याची टीका करताना ठाकरे बंधूंची युती कायम राहील याचे संकेत देत राज ठाकरे म्हणाले की, मराठी आणि गुजराती यांच्यात वाद निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सरकार आता गुजराती साहित्य संमेलन भरवणार आहे. त्यांना वाटले की, आम्ही विरोध करू आणि त्यातून गुजराती मराठी वाद पेटेल. पण त्यांचे षड्यंत्र आम्ही पूर्ण होऊ देणार नाही. संजय राऊत आणि मी या संमेलनाला बिलकूल विरोध करणार नाही.**

■ मुंबई

**शेतकरी** कामगार पक्षाचा ७८ वा वर्धापन दिन मेळावा पनवेल येथे पार पडला. या मेळाव्याला राज ठाकरे, खा. संजय राऊत यांच्यासह काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार आणि शरद पवार गटाचे शशिकांत शिंदे हेदेखील उपस्थित होते. या मेळाव्यात भाषण करताना राज ठाकरे आणि संजय राऊत यांनी मराठी माणसाच्या मुद्यावरून सरकारचा चांगलाच समाचार घेतला.

राज ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री महाराष्ट्रातील लहान मुलांना हिंदी कशी शिकवता येईल याचा विचार करतो. पण महाराष्ट्रात कामधंद्यासाठी येणाऱ्यांना मराठी कशी शिकता येईल याचा विचार करत नाही. महाराष्ट्राचा मराठी माणूस, महाराष्ट्राचा भूमिपुत्र याचा विचारच होत नाही. याचे सर्वात भीषण स्वरूप रायगड जिल्ह्यात दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी विकल्या जात आहेत. जमिनीचे व्यवहार आपलेच लोक करत आहेत. कुंपणच शेत खात आहे. उद्योगधंदे येत आहेत. मात्र त्यामध्ये बाहेरचे कामगार येत आहेत. त्यामुळे शेतकरी बरबाद होत आहे आणि मराठी कामगारही बरबाद होत आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात मोदी आणि अमित शहा यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले की, या देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री दोघेही गुजरातचे आहेत. मात्र गुजरातमध्ये हिंदी सक्ती नाही. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प गुजरातमध्ये गेले आहेत. प्रत्येक माणसाला आपल्या राज्याबद्दल प्रेम असते. पण आम्ही बोललो तर संकुचित होतो. गुजरातमध्ये हिंदी सक्ती नाही. मग महाराष्ट्रात का आणत आहात?



असा प्रश्न मी शिक्षण मंत्री भुसेंना विचारला होता. एकदा भाषा संपली, जमीन गेली की, जगाच्या पाठीवर कसलेही स्थान उरत नाही. गुजरातमध्ये तिथल्या कायद्यानुसार शेतजमीन गुजरातबाहेरील व्यक्तीला विकत घेता येत नाही. ती विकत घ्यायची तर विशेष कायद्यांतर्गत रिझर्व्ह बँकेकडून परवानगी घेऊनच विकत घ्यावी लागते. हे आपल्या देशातच चालू आहे. ज्या देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री गुजरातचे आहेत, त्यांच्या राज्यातील शेतजमीन या देशातील कोणताही नागरिक विकत घेऊ शकत नाही. प्रत्येक जण आपापल्या राज्याचा विचार करत असतो. मग तो आम्ही का नाही करावा? रायगडमध्ये कोण येते. कोण जमिनी विकत घेते, माहीत नाही. उत्तरेतील अनेक धनदांडगे कोकणात जमिनी विकत घेत आहेत. आमचेच लोक विकत आहेत. लोकांना कळत नाही की, यातून आम्हीच संपणार आहोत. आमची मुले तुमच्या कंपनीत कामाला लागणारच. पण त्या कंपनीत भागीदारी मागा. नाहीतर उद्या याच रायगडमध्ये अमराठी नगरसेवक, आमदार आणि खासदार निवडून येतील. सगळ्या ठाणे जिल्ह्यातही हेच चालू आहे. महाराष्ट्रात मराठी माणसाच्या थडग्यावर उद्योग उभे राहणार नाहीत. उद्योग आणायचे असतील तर मराठी माणसाचा मान-सन्मान राखूनच उद्योग आणावे लागेल. नाही तर आणता येणार नाहीत. प्रत्येकाने पैसे कमावले

» पान २ वर

## वाकडे काम करून ते सरळ करणाऱ्यांची नोंद घेतली जाते

**नवे कृषिमंत्री भरणेंचे वक्तव्य**

■ मुंबई

**वाकडे** काम करून जे ते परत नियमात बसवतात, त्यांचीच नोंद घेतली जाते असे वादग्रस्त विधान राज्याचे नवे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. इंदापूरमधील महसूल विभागाच्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. पदभार स्वीकारल्यानंतर २४ तासातच ते असे म्हणाल्याने मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यानंतर कृषीमंत्र्यांची वादग्रस्त वक्तव्यांची परंपरा कायम ठेवली आहे, अशी प्रतिक्रिया उमटत आहे.

कृषिमंत्री दत्ता भरणे म्हणाले की, जगात सगळ्यांसमोर अडचणी आणि मोठी संकटे आहेत. मात्र या काळात आपण लोकांना सहकार्य केले पाहिजे. तरच फायदा होतो. आज मी तुमच्यासमोर उभा आहे. कारखान्यावर संचालक झालो. चांगले काम करू. पण चांगले काम सगळेच करतात. सगळेच जण सरळ काम करतात. पण एखादे वाकडे काम करून परत सरळ नियमात बसवतात त्याच माणसांची नोंद घेतली जाते.

शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार त्यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, नवीन कृषिमंत्री दत्ता भरणे यांचे हे पहिलेच वक्तव्य एवढे घातक आहे. तुम्ही काय म्हणालात की, वाकडी कामेसुद्धा आपल्याला करावी लागतात. अनेक नेत्यांनी वेडीवाडकी कामे करून राज्याची तिजोरी वेडीवाकडी भरली आहे. अशा नेत्यांची मालमत्ता, संपत्ती पाहिली की, ती ताडासारखी सरळ वाढताना दिसते. भरणे मामांना सांगतो की, महाराष्ट्र प्रत्येक मंत्र्याकडे पाहत आहे. तुमच्याकडून वाकडे काम झाले तर हा महाराष्ट्र तुम्हाला माफ करणार नाही. आम्हीही तुम्हाला सोडणार नाही.

## कर्नल पुरोहितांचा छळ नाहीच पुरोहितांची याचिका फेटाळली

■ मुंबई

**मालेगाव** बॉम्बस्फोट प्रकरणी निर्दोष सुटका झालेले माजी कर्नल पुरोहित यांची विशेष तपास पथकाच्या कोठडीत छळ झाल्याची याचिका फेटाळण्यात आली आहे. विशेष तपास पथकाचे न्यायाधीश ए.के. लाहोटी यांनी ही याचिका फेटाळली आहे.

न्यायालयाने म्हटले आहे की, ही याचिका तब्बल १६ वर्षांनंतर करण्यात आली. त्याचबरोबर कोठडीतील छळाचा याआधी कधीही उल्लेख झाला नाही. त्याबाबत एकही पुरावा सादर नाही . त्यामुळे या याचिकेचे प्रयोजन नाही. त्यामुळे ही फेटाळण्यात येत आहे. या संदर्भात सरकारी पक्षाने छळाचा दावा फेटाळून लावला. त्यांनी न्यायालयाला सांगितले की, अशा प्रकारचा आरोप हा २००८ साली रिमांड न्यायालयासमोर करण्यात आला होता. त्यानंतरही त्यांच्या गुन्ह्याची तीव्रता लक्षात घेता पुरोहितना पोलीस कोठडीत पाठवण्यात आले. त्यानंतर ६ डिसेंबर २००८ रोजी पुरोहित यानेच मान्य केले की त्यांचा कोठडीत छळ झाला नाही. त्यांच्याच विनंतीवरुन त्यांची लष्करी रुग्णालयात तपासणी करण्यात आली असता.

## जमीन गैरव्यवहार प्रकरण न्यायालयाची वाड्रांना नोटीस

**पुढील सुनावणी २८ ऑगस्ट रोजी**

■ नवी दिल्ली



**सक्तवसुली** संचालनालयाने काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांच्यावर जमीन हस्तांतरण आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला आहे. दिल्ली येथील विशेष न्यायालय, या प्रकरणी ईडीने केलेल्या आरोपांची सुनावणी करण्याआधी रॉबर्ड वाड्रा व इतर १० आरोपींची बाजू जाणून घेणार आहे. यासाठी न्यायालयाने त्यांना नोटीस पाठवली आहे.

विशेष न्यायालयाचे न्यायाधीश सुशांत चंगोत्रा यांनी म्हणाले की, ईडीने केलेल्या तक्रारीबाबत रॉबर्ट वाड्रा व इतर दहा आरोपींची बाजू समजून घेण्यासाठी त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. रॉबर्ट वाड्रा यांच्या स्कायलाईट हॉस्पिटलिटी या कंपनीने हरियाणात साडेतीन एकरची जमीन ओंकारेश्वर प्रॉपर्टीजकडून साडेसात कोटी रुपयांना विकत घेतली. त्यानंतर चोवीस तासाच्या आता स्कायलाईटने ही जमीन वाड्रा यांना हस्तांतरीत केली. तत्कालिन काँग्रेस सरकारचे मुख्यमंत्री भूपेंद्र सिंग हुडा यांनी वाड्रांच्या कंपनीला व्यापारी परवाना दिला. त्यानंतर या जमिनीची किंमत वाढली. त्यांनी ही जमीन डीएलएफला कंपनीला ५८ कोटी रुपयांना विकली. त्यामुळे वाड्रा यांचा मोठा फायदा झाला. ईडीने या प्रकरणात कायद्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत वाड्रा यांनी इतर बाबतीतही असे व्यवहार केल्याची तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ ऑगस्टला होणार आहे.

## मला राजा व्हायचे नाही राहुल गांधींचे स्पष्टीकरण

■ नवी दिल्ली

**मला** देशाचा राजा व्हायचे नाही. मी राजेशाहीच्या विरोधात आहे असे स्पष्टीकरण देत आज विरोधी पक्षनेता व काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी उपस्थितांची मने जिंकली. ते आज नवी दिल्लीत एकदिवसीय वार्षिक कायदा परिषदेत बोलत होते. यावेळी राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा संशय व्यक्त केला.

दिल्लीच्या विज्ञान भवनात झालेल्या या कायदा परिषदेला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेते अभिषेक मनु सिंघवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

राहुल गांधी बोलायला उभे राहिल्याबरोबर त्यांच्या काही समर्थकांनी देश का राजा कैसा हो राहुल गांधी जैसा हो अशा घोषणा दिल्या. यावर राहुल गांधींनी मी राजा नाही. मला राजा व्हायचे नाही, मी राजेशाहीच्या विरोधात आहे असे स्पष्ट शब्दात सांगितले. यावेळी ते म्हणाले की, मी आजकाल देशाच्या निवडणूक प्रणालीबाबत

» पान २ वर

## थकलेल्या देयकांसाठी आज कंत्राटदारांच्या राज्यस्तरीय बैठका

■ मुंबई

**राज्य** सरकारच्या विविध विभागांतील विकास कामे करणाऱ्या लाखो कंत्राटदारांची सुमारे ८९ हजार कोटींची बिले सरकारने थकवली आहेत.सरकार ही बिले अदा करण्यासाठी केवळ आश्वासने देत आहे. त्यामुळे आता ही




बिल रक्कम मिळविण्यासाठी उद्या रविवार ३ ऑगस्ट रोजी पुढील दिशा ठरवली जाणार आहे. यामध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये बैठका आयोजित केल्या आहेत,अशी माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली.

मिलिंद भोसले यांनी सांगितले की, राज्यातील सर्वच ३५ जिल्ह्यांमध्ये संघटनांच्या माध्यमातून उद्या रविवार ३ ऑगस्ट रोजी दुपारी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत बैठका आयोजित केल्या आहेत. या बैठकीत आपापल्या जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास विभाग,

» पान २ वर

## यवतमध्ये जमावबंदी कायम ७०० जणांवर गुन्हा दाखल

■ पुणे

**दौंड** तालुक्यातील यवतमध्ये व्हॉट्सपवरील एका आक्षेपार्ह पोस्टवरून काल दोन गटात दगडफेक व जाळपोळ झाली होती. याप्रकरणी आतापर्यंत ७०० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून यवत परिसरात आजही जमावबंदी होती. तसेच शाळा व बाजापेठा बंद ठेवण्यात आल्या होत्या. दौंड मतदारसंघाचे भाजपा आमदार राहुल कुल यांनी यवत घटनेप्रकरणी पत्रकार परिषद घेतली. त्यांनी सांगितले की, पोलिसांकडून या घटनेची सविस्तर माहिती घेतली आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही या घटनेद्दल तीव्र चिंता व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली.

## देवेगौडांचा नातू रेवण्णाला बलात्कार प्रकरणी जन्मठेप

■ बंगळुरू



**जनता** दल (सेक्युलर) पक्षाचा माजी खासदार आणि माजी पंतप्रधान एच. डी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवण्णा घरकाम करणाऱ्या महिलेवर वारंवार बलात्कार प्रकरणात दोषी ठरला आहे. याप्रकरणी बंगळूर सत्र न्यायालयाच्या अतिरिक्त शहर दिवाणी न्या. संतोष भट यांच्या खंडपीठाने रेवण्णाला आज जन्मठेपेची शिक्षा सुनावली. याशिवाय न्यायालयाने त्याला पीडितेला १० लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. त्यावर त्याने न्यायालयाचा निर्णय मान्य असल्याचे सांगितले. या सुनावणीवेळी रेवण्णाने युक्तिवाद केला की, मी खासदार म्हणून कार्यरत असताना एकही तक्रार नोंदवण्यात आली नव्हती. निवडणुकीच्या काळातच हे आरोप का झाले? तर विशेष सरकारी वकील बी. एन. जगदीशा यांनी रेवण्णावर गुन्ह्याचा हेतू

» पान २ वर

## शेतकरी क्रांती संघटना ठाकरे गटात विलीन

■ मुंबई

**राज्यातील** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला गळती लागली असताना शेतकरी क्रांती संघटना आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात विलीन झाली. मातोश्रीवर पार पडलेल्या या सोहळ्यात शेतकरी क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन बिलेवार यांनी आपल्या १५० ते २०० पदाधिकाऱ्यांसह उबाठात प्रवेश केला.



उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शेतकरी क्रांती संघटनेच्या पदाधिकार्यांनी शिवबंधन हाती बांधले. त्यानंतर उद्धव ठाकरे म्हणाले की, अनेकजण मला आणि माझ्या शिवसेनेला संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण अजूनही त्यांना कळत नाही की, सगळी माणसं पैशांनी विकली जात नाहीत. निष्ठावंत सोडून गेले नाहीत. माझ्यासोबत माझे जुने सहकारी आजही आहेत.

माझ्या काळात नागपूरमध्ये एकमेव अधिवेशन झाले. त्यावेळी कोणत्याही शेतकऱ्याने कर्जमाफीची मागणी केली नव्हती. आता रमी खेळणाऱ्याला क्रीडामंत्री केले आहे. कदाचित रमी आणि तीन पत्ती हे खेळ ऑलिम्पिकमध्ये खेळले जातील. फडणवीस यांनी नीतीमूल्य समिती स्थापन केली होती. ती समिती कुठे गेली? बॅगा घेऊन बसलेल्या मंत्र्यांची चौकशी नाही. या भ्रष्ट सरकारचा विद्रूप चेहरा जनतेसमोर आणण्यासाठी आता सर्वांनी एकत्र यावे लागेल. म्हणून आम्ही राज्यात लवकरच हे आंदोलन छेडणार आहोत.

## पवई आयआयटीमध्ये विद्यार्थ्याची आत्महत्या

■ मुंबई

**मुंबईच्या** पवईमधील आयआयटीमध्ये एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली. काल रात्रीच्या सुमारास आयआयटीमधील हॉस्टेलच्या इमारतीवरून उडी घेऊन या विद्यार्थ्याने आपले जीवन संपवले. रोहित सिन्हा (२६) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो आयआयटीत मेटासायन्सच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत होता. पवई पोलिसांना घटनास्थळी कोणतीही चिठ्ठी आढळली नाही. पोलिसांनी रोहितच्या मित्रांचे आणि हॉस्टेलमधील सहकाऱ्यांचे जबाब नोंदवले असून सीसीटीव्ही फुटेज आणि फॉरेन्सिक तपासणीद्वारे घटनेचा तपशील जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्राथमिक तपासानंतर पोलिसांनी सांगितले की, रोहितने शैक्षणिक दबावामुळे हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज आहे. ही घटना शुक्रवारी मध्यरात्री घडली. त्याचा मृतदेह उत्तरीय चाचणीसाठी सरकारी रुग्णालयात पाठवला आहे. रोहितचा मोबाईल, खोलीतील कागदपत्रे आणि इतर वस्तूंची तपासणी सुरू आहे.

## पृथ्वीवर परतल्यानंतर मोबाईल फोन जड वाटला

**शुभांशू शुक्ला यांचा अनुभव**

■ नवी दिल्ली

**पृथ्वीवर** परतल्यानंतर, मी फोटो काढण्यासाठी मोबाईल मागितला. मी फोन हातात घेतला तेव्हा मला फोन जड वाटला, असा अनुभव भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी सांगितला. शुभांशू शुक्ला यांनी एका ऑनलाइन पत्रकार परिषदेत त्यांच्या २० दिवसांच्या अंतराळ मोहिमेचे आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील वास्तव्याचे अनुभव सांगितले.



शुक्ला यांनी पृथ्वीवर पुन्हा गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्याचा त्यांचा अनुभव सांगताना म्हटले की, मी माझ्या बेडवर बसलो होतो. मी माझा लॅपटॉप बंद केला आणि बेडच्या बाजूला ढकलला. मला वाटले की तो हवेत तरंगेल. पण तो खाली जमिनीवर पडला. सुदैवाने, जमिनीवर गालिचा असल्याने लॅपटॉपचे नुकसान झाले नाही. ४१ वर्षांनंतर एक भारतीय अंतराळातून परतला. यावेळी ती फक्त उडी नव्हती, तर भारताच्या दुसऱ्या उड्डाणाची सुरुवात होती. आता फक्त उड्डाण करण्यासाठी नाही तर नेतृत्व करण्यासाठी आपण तयार आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदींशी बोलणे आणि त्यांच्या मागे तिरंगा फडकत होता तो क्षण संपूर्ण अंतराळ प्रवासातील सर्वात अविस्मरणीय आहे. पंतप्रधान मोदींनी मला आम्ही तिथे जे काही काम करत होतो ते रेकॉर्ड करण्यास सांगितले होते आणि मी ते काम खूप चांगले केले आहे. दरम्यान, २५ जून रोजी शुभांशू यांचे ॲक्सियम-४ मिशन फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटर येथून प्रक्षेपित करण्यात आले. त्यानंतर १५ जुलै रोजी ते पृथ्वीवर परतले. आता शुभांशू हे काही दिवसातच भारतात परतण्याची शक्यता आहे.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

कंपनीत डस्टिंग आणि जेवण बनविण्यासाठी महिला पाहिजे. संपर्क - **9820930362** {NC251714}

घरी बसून अगरबत्ती , मेणबत्ती पॅकिंग पगार (18200-24300) जया : **7039874296** {NC251838}

मस्जिद बंदर मधील दुकानामध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर मुलगी पाहिजे. संपर्क - **8422976003** {NC251834}

घरकामाची वेळ संध्याकाळी 4.30 ते रात्री 9.30 (5 तास फक्त), लादी, कपडे, डस्टिंग, बेबी केअर व वरचे कामाकरिता, जन्म वर्ष 1981 नंतरची, शिक्षण कमीत कमी 7वी, बाई हवी आहे. घाटकोपर स्टेशन पूर्वे पासून 3 मिनिटे चालत मो. **7304652460** {NC251835}

मालाड वेस्टमध्ये इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार **9870041713.** {NC251836}

बोरिवली मध्ये पेस्टकंट्रोल कामासाठी अनुभवी मुले पाहिजेत. मो. **9820330717** {NC251839}

मुंबई सेंट्रल - DRM ऑफिस साफसफाई करिता माणसे पगार 12000/- आधारकार्ड / लाईटबिल/ रेंट ॲग्रीमेंट / ॲड्रेसप्रुफ - सकाळी 7-4. - मोबाईल - **9869781781** {NC251840}

चॉकलेट पॅकिंग घरी बसून काम पगार (18200 - 24300) : सुप्रिया **7039873151** {NC251843}

## Situation Vacant

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume: **9892797851.** {NC251811}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251417}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## व्यसनमुक्ती

दारू सोडवा दारू, तंबाखू गुटखा सिगारेट औषधे उपलब्ध डॉ. नागरगोजे मो. **9765609769** {NC251656}

## वधूवर मेळावा

वधु वर मेळावा सर्वजाती मुलींना फ्री APP कल्याण **9869868620** {NC251837}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# कोनोसुके मात्सुशीता

## जपानी उद्योगपती व नॅशनल पॅनासॉनिकचे संस्थापक

**जपानच्या एका छोट्या गावात शेतकऱ्याच्या घरात कोनोसुके मात्सुशीता यांचा जन्म झाला. कोनोसुके जेव्हा नऊ वर्षांचे होते, तेव्हा वडिलांना आर्थिक अडचणींमुळे सर्व जमीन विकावी लागली आणि घर सोडावे लागले. गावात सर्व काही गमावलेले कोनोसुके यांचा परिवार वडिलांसह शहरात आला आणि लहानमोठी कामे करू लागला. आपल्या कुटुंबाच्या मदतीसाठी कोनोसुके यांनाही शिक्षण सोडून एका दुकानात काम करावे लागले. सूर्योदय झाल्या झाल्या ते उठत असत. दुकानाची स्वच्छता करत असत आणि आपल्या मालकाच्या मुलांची देखभाल करत असत. काही महिने असेच गेले.**



दुकानात धातूचे काम होत असे. त्यामुळे कोनोसुके यांना तेथे अन्य कामांबरोबरच तांत्रिक अवजारांबाबतही बरेच शिकायला मिळाले. तेथे त्यांनी अंदाजे पाच वर्षे काम केले आणि वयाच्या पंधराव्या वर्षी असे काम ते शोधू लागले जेथे कामासोबत काही शिकायलाही मिळेल. भविष्यात विजेचा वाढता वापर लक्षात घेऊन त्यांनी याच क्षेत्रात नोकरी शोधायचे ठरविले. एके दिवशी त्यांनी ओसाका लाइट कंपनीची एक जाहिरात पाहिली. कंपनीला नव्या लोकांची गरज होती. कोनोसुके यांना त्यामध्ये नोकरी मिळाली. आता कामाच्याच ठिकाणी त्यांना बरेच काही शिकायला मिळू लागले. कोनोसुके एकीकडे नोकरीत नवे काही शिकत होते, तेथे दुसऱ्या बाजूला इलेक्ट्रिसिटीसंदर्भात काही पुस्तके मिळवून वाचत होते. त्याच बरोबर ते काही नवे प्रयोग करत होते. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला आणि त्यांची जबाबदारी वाढली.

२२ व्या वर्षी ते टेक्निकल इन्स्पेक्टर झाले. हे पद त्या काळी मोठे होते. आपल्या फावल्या वेळेत त्यांनी एकदम नवे आधुनिक इलेक्ट्रिकल सॉकेट बनविले आणि आपल्या बॉसला दाखविले पण त्यांना ते अजिबात आवडले नाही आणि हे मार्केटमध्ये चालणार नाही, असे सांगून त्यांनी हे नवे संशोधन नाकारले. पण कोनोसुके यांना आपल्या इलेक्ट्रिकल सॉकेटवर पूर्ण विश्वास होता.

हे एक दिवस बाजारात जरूर चालेल, या विश्वासापोटी त्यांनी नोकरी सोडली आणि स्वत:च्या पायावर उभे राहायचे ठरविले. त्यांच्या मित्रांनी इतकी चांगली नोकरी सोडून असले काही करू नकोस म्हणून बजावले. पण कोनोसुके यांना आपल्यावर आणि सॉकेटवर पूर्ण विश्वास होता. त्यांनी आपली नोकरी सोडली आणि असलेल्या पैशातून काही आवश्यक हत्यारे खरेदी केली. दोन सहकारी, लहान भाऊ आणि पत्नी यांना घेऊन ते सॉकेट तयार करू लागले. ते सॉकेट विकण्यासाठी स्वत:च जात असत. पण नकारघंटाच ऐकायला मिळायची. काही महिन्यांनंतर काही लहान ऑर्डरी मिळाल्या.

पण अडचणी संपेनात. हे हाल पाहून त्यांच्या सहकाऱ्यांनी काम सोडले. घरची परिस्थिती इतकी बिघडली की, घरचे सामान विकून कर्जही काढावे लागले. प्रत्येक दिवशी ते नवा प्रयत्न करत. पण अयशस्वी होत.

संजीव वेलणकर पुणे

# संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड मोदीबागमध्ये शरद पवार यांना भेटले

■ पुणे

**अक्कलकोटमध्ये** काही दिवसांपूर्वी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर शिवधर्म प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. या कार्यकर्त्यांनी प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला काळे फासले होते. या पार्श्वभूमीवर प्रवीण गायकवाड यांनी पुण्यातील मोदीबागेत आज शरद पवार यांची भेट घेतली.



या भेटीनंतर प्रवीण गायकवाड म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये सध्या अस्वस्थता निर्माण झाली आहे. प्रतिगामी-पुरोगामी यांच्यात संघर्ष उभा राहिला आहे. त्याची तीव्रता लक्षात आणून देण्यासाठी मी आज पवारांची भेट घेतली. माझ्यावर हल्ला झाला तेव्हा मी संरक्षण घ्यावे, अशी शरद पवारांची भावना होती. त्यांनी तसे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिले होते. महाराष्ट्रात आणि देशात वेगवेगळ्या जाती, धर्म आणि लोकांमध्ये एक संघर्ष निर्माण झाला आहे. लोकशाहीमध्ये हा संघर्ष अपेक्षित नाही. प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने माध्यमांवर व्यक्त व्हायला हवे. आपण जे लिहितो त्यातून कुणाच्या भावना दुखावल्या जाऊ नये, शांतता प्रस्थापित व्हावी ही आमची भावना आहे.

# साबळेंचा अजित पवार गटात प्रवेश रायगडमध्ये भरत गोगावलेंना धक्का

■ रायगड

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात आज शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते आणि प्रवक्ते राजीव साबळे यांनी शक्तिप्रदर्शन करत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला. या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे आदी मान्यवर उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांना जबरदस्त राजकीय धक्का बसला आहे.

रायगड पालकमंत्री पदावरून राज्यात अजित पवार गट आणि शिंदे गट यांच्यात रस्सीखेच सुरु आहे. या पार्श्वभूमीवर साबळे यांच्या पक्षप्रवेशामुळे गोगावले यांची ताकद कमी झाली आहे.

राजीव साबळे चारवेळा जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांचा प्रभाव आहे. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राजीव साबळे यांच्यासह माणगावमधील काही नेत्यांचे पक्षप्रवेश या मेळाव्यात झाले. महायुती सरकारमध्ये आपण विकासाची काम करण्यासाठी आलो आहोत.

सत्तेत असताना लोकांची कामे झाली पाहिजेत. सत्तेत असताना आपण काम करणार नसू तर मग सत्ता नसताना ते काम झाले असते तर बरे झाले असते असे म्हणण्याला अर्थ नाही.


**निकाल गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी** — सोडत सायं. 5:00 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 02/08/2025

| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-03 : 4777 | | | |
|---|---|---|---|---|

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1621 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | 1908 (जे. पी. एस. लॉटरी सेंटर, डहाणू) | 4881 | 8646 | 9165 |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 3017 | 3784 | 3892 | 4492 | 5430 | 5524 | 5528 | 5698 | 5818 | 9498 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0623 | 1113 | 2080 | 2370 | 2414 | 4452 | 4470 | 5495 | 6179 | 6558 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0030 | 0913 | 1915 | 2965 | 4548 | 5384 | 6270 | 6868 | 7762 | 8776 |
| 0040 | 1051 | 1989 | 3082 | 4596 | 5428 | 6273 | 6926 | 7771 | 8838 |
| 0059 | 1113 | 2207 | 3133 | 4698 | 5536 | 6277 | 6997 | 7775 | 8976 |
| 0095 | 1118 | 2211 | 3140 | 4700 | 5541 | 6324 | 7078 | 7986 | 9378 |
| 0238 | 1123 | 2212 | 3223 | 4784 | 5564 | 6415 | 7079 | 8021 | 9440 |
| 0377 | 1182 | 2226 | 3328 | 4786 | 5589 | 6465 | 7251 | 8252 | 9694 |
| 0390 | 1183 | 2234 | 3400 | 4848 | 5710 | 6558 | 7406 | 8270 | 9701 |
| 0408 | 1184 | 2322 | 3409 | 4906 | 5775 | 6605 | 7481 | 8318 | 9743 |
| 0476 | 1248 | 2404 | 3669 | 4924 | 6108 | 6617 | 7602 | 8366 | 9818 |
| 0608 | 1307 | 2433 | 3733 | 4927 | 6113 | 6674 | 7632 | 8394 | 9875 |
| 0617 | 1371 | 2593 | 3859 | 5025 | 6150 | 6723 | 7651 | 8547 | 9896 |
| 0635 | 1594 | 2624 | 3907 | 5157 | 6167 | 6763 | 7745 | 8583 | 9939 |
| 0739 | 1680 | 2625 | 4154 | 5191 | 6256 | 6812 | 7748 | 8721 | 9948 |
| 0800 | 1710 | 2838 | 4411 | 5244 | 6265 | 6859 | 7756 | 8773 | 9964 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


# मला राजा व्हायचे नाही राहुल गांधींचे स्पष्टीकरण

पान १ वरून

बोलतो आहे , मला नेहमी असा संशय यायचा की २०१४ पासून काही गडबड सुरु आहे. गुजरातमधील निवडणुकीनंतर माझा हा संशय बळावला. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांना मिळालेले बहुमतही संशयास्पद आहे. गेल्या १२ वर्षांच्या काळात भाजपाला मिळणाऱ्या जागा या संशय निर्माण करणाऱ्या आहेत. राजस्थान, मध्य प्रदेश व गुजरातमध्ये आमच्या पक्षाला एकही जागा मिळाली नाही हे धोकादायक आहे. महाराष्ट्रात लोकसभेत आम्हाला चांगले यश मिळाले. मात्र विधानसभेत आमच्याबरोबर चांगला जनाधार असलेल्या तीन पक्षांचाही पराभव झाला. त्याचा आम्ही बारकाईने अभ्यास केल्यावर आमच्या हे लक्षात आले की, लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या केवळ तीन महिन्याच्या काळात राज्यातील मतदार यादीत १ कोटी मतदारांची वाढ झाली आहे. त्यातील बहुसंख्य मतदान हे भाजपाला गेले. मी हे हवेत बोलत नाही. तर त्याचे आमच्याकडे ठोस पुरावे आहेत.

# पतीच्या अटकेनंतर रोहिणी खडसे शरद पवारांच्या भेटीला

■ पुणे

**पुण्यातील** गाजलेल्या रेव्ह पार्टी प्रकरणात अटकेत असलेले ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांच्या पत्नी आणि शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी आज सकाळी पुण्यामध्ये शरद पवार यांची भेट घेतली. आजची भेट ही केवळ पक्षसंघटनेच्या कामानिमित्ताने होती, अशी माहिती रोहिणी खडसे यांनी दिली. रोहिणी खडसे म्हणाल्या की, आज पक्षसंघटनेतील काही महत्त्वाचे विषय आणि नियुक्त्यासंदर्भात मी शरद पवार यांची भेट घेतली. रेव्ह पार्टी प्रकरणात मी योग्यवेळी उत्तर देणार आहे. आम्ही सगळे कुटुंबीय एकत्र मिळून जामीन अर्जाबाबत चर्चा करू आणि निर्णय घेऊ. त्यानंतर आम्ही जामिनासाठी अर्ज करू. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे न्यायालयाबाहेर काहीही बोलणे चुकीचे ठरेल.

# थकलेल्या देयकांसाठी आज कंत्राटदारांच्या राज्यस्तरीय बैठका

पान १ वरून

जलजीवन मिशन व इतर अनेक विभागातील प्रलंबित देयके व इतर अनेक प्रश्न,समस्या, या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन शासनाविरोधात मोठा निर्णय राज्य संघटनेकडून घेतला जाणार आहे.दहा दिवसांपूर्वी सांगलीतील तरुण कंत्राटदार अभियंता हर्षल पाटील यांनी आत्महत्या केली होती. अर्जिमितीला दहा दिवस झाले.मात्र शासन या विषयावर व कंत्राटदारांची थकित बिले देण्याबाबत हतबल दिसत आहे.


**निकाल महाराष्ट्र सह्याद्री** — महाराष्ट्र राज्य लॉटरी — • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 02/08/2025

| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SP-02 : 4375 |
|---|---|

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1074 | 1356 | 1513 | 1961 | 3032 | 3379 | 3390 | 4388 | 4721 | 5563 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1232 | 1634 | 2789 | 3780 | 3784 | 4477 | 4788 | 4856 | 5008 | 5827 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1001 | 1964 | 2527 | 3680 | 4784 |
| 1007 | 1971 | 2760 | 3693 | 5059 |
| 1102 | 2028 | 2792 | 3806 | 5222 |
| 1107 | 2096 | 2850 | 4034 | 5290 |
| 1131 | 2123 | 2932 | 4042 | 5372 |
| 1149 | 2242 | 3063 | 4046 | 5398 |
| 1160 | 2244 | 3131 | 4069 | 5420 |
| 1291 | 2277 | 3187 | 4407 | 5485 |
| 1354 | 2281 | 3336 | 4424 | 5595 |
| 1361 | 2309 | 3383 | 4460 | 5618 |
| 1687 | 2429 | 3468 | 4545 | 5859 |
| 1912 | 2433 | 3576 | 4557 | 5890 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी



नेहरू सेंटर आयोजित

**३३वा मराठी संगीत नाट्य महोत्सव-२०२५**

सोमवार, ११.०८.२०२५ ते गुरुवार १४.०८.२०२५, रोज सायं.६.०० वा.

११ सोमवार — **हे बंध रेशमाचे** — भरत नाट्य संशोधन मंदिर, पुणे

१२ मंगळवार — **बावनखणी** — विद्याधर गोखले संगीत नाट्य प्रतिष्ठान, मुंबई

१३ बुधवार — **अमृतवेल** — खल्वायन, रत्नागिरी

१४ गुरुवार — **गोष्ट संयुक्त मानापमानाची** — शौर्य प्रोडक्शनस् ओपिसी प्रा. लिमिटेड, पुणे

स्थळ: नेहरू सेंटर सभागृह. वरळी, मुंबई-१८

महोत्सवाच्या विनामूल्य प्रवेशिका :

बुधवार, दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी नेहरू सेंटर सभागृहाच्या आरक्षण खिडकीवरती, सकाळी १०.३० वाजल्यापासून प्रवेशिका उपलब्ध असेपर्यंत दिल्या जातील.


# गुजराती-मराठी वाद लावण्याचा त्यांचा प्रयत्न

पान १ वरून

पाहिजेत. पण महाराष्ट्र विकून नाही. कोण कुठे येतोय, पत्ताच लागत नाही. संपूर्ण राज्यात कोणती प्रगती होते, हे फक्त मंत्र्यांना माहीत. तेच ठरवतात , आधी तेथील जमिनी विकत घेतात आणि उद्योगपतींशी व्यवहार करून गब्बर होतात. मग निवडणुकीत तुमच्या तोंडावर पैसे फेकून मते घेतात. थोडक्यात जमिनी विकायच्या. पण तुमच्याकडे चुटूरपुटूर येणार. तेही तुमच्याकडून काढून घेणार. ज्या रायगड जिल्ह्यात महाराजांची राजधानी होती तिथे डान्सबार सर्वाधिक आहेत आणि तेही अनधिकृत आहेत. नवी मुंबईच्या विमानतळावर सर्वाधिक १०० टक्के मराठी मुले आणि मुली कामाला लागल्या पाहिजेत. हे सर्व पक्षांनी बघितले पाहिजे. बाहेरून कोणी तरी उद्योगपती येणार, जमिनी घेणार, धंदे घेणार आणि वाट्टेल ते थैमान घालणार, हे चालणार नाही. जमिनी आणि सर्व गोष्टीवर राज्य सरकारने कायदा आणला आहे. तुम्ही कोण तर अर्बन नक्षल. शहरात राहणारे नक्षल. तुम्ही कोणत्या प्रकल्पाला विरोध केला तर सरकार तुम्हाला अटक करू शकते. एकदा करूच देत.

राज ठाकरे पुढे म्हणाले की, बाहेरच्या राज्यात आपल्याबद्दल ही विकली जाणारी माणसे असे बोलले जाते. ही आपली प्रतिमा आहे. सव्वाशे वर्षे देशावर राज्य करणारा हा महाराष्ट्र आहे तो विकला जातो. माणसे विकली जातात. मग कशाला आपण शिवाजी महाराजांचे पुतळे ठेवतो? डेकोरेशन म्हणून? महाराष्ट्रात आम्ही स्वाभिमान आणि स्वत्व घालवत आहोत. जेव्हा स्वाभिमान विकला जातो, तेव्हा फक्त जिवंत प्रेते उरतात. महाराष्ट्र हा देशाला दिशा देणारा आहे. त्याची दशा होऊ नये. त्यामुळे तुम्ही जिवंत असले पाहिजे. मोठे झाले पाहिजे. पण महाराष्ट्र विकून होता कामा नये.

राज ठाकरेंच्या भाषणानंतर खा. संजय राऊत यांचे भाषण झाले. ते म्हणाले की, महाराष्ट्रात शेतकरी आणि कामगार दोघेही संकटात आहेत. म्हणून आपण सावध राहिले पाहिजे. या महाराष्ट्राचे राजकारण मराठी माणसाच्या हातातच राहिले पाहिजे. शेतकरी आणि कामगार जोपर्यंत राज्यात टिकून आहेत, तोपर्यंत महाराष्ट्र हातात राहील. पण सरकारला ते नको आहे. म्हणूनच यासाठी सावध राहिले पाहिजे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले आहेत. पण फक्त ते एकत्र येऊन चालणार नाही. त्यांच्यासोबत सर्व कामगार व शेतकरी संघटनांनी एकत्र आले पाहिजे. शेकापला निवडणुकीत यश मिळाले नाही. शिवसेनेला यश मिळाले नाही. राष्ट्रवादीला यश मिळाले नाही. त्यामुळे खचून जाऊ नका. पुढच्या लढाईला तयार राहिले पाहिजे. राज्याचे नेतृत्व हातात घेण्यासाठी कंबर कसून उभे राहिले पाहिजे.


**महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी** — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत दर शनिवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 31 — सोडत दिनांक 02/08/2025

| पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख | ML-09 : 7824 |
|---|---|

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4125 | अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे |
|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1402 | 1726 | 1858 | 2633 | 4761 | 5491 | 7615 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2557 | 2929 | 4106 | 4989 | 5179 | 6487 | 6537 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1630 | 2438 | 2514 | 3505 | 3526 | 4334 | 5738 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1557 | 3384 | 4834 | 5846 | 5867 | 6811 | 7777 |

सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) — सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1955 | 2327 | 2872 | 3347 | 3836 | 4264 | 4694 | 5109 | 5584 | 6297 | 6803 | 7407 |
| | | 1957 | 2328 | 2896 | 3366 | 3846 | 4283 | 4697 | 5119 | 5588 | 6302 | 6807 | 7426 |
| | | 1972 | 2347 | 2924 | 3367 | 3851 | 4319 | 4700 | 5125 | 5594 | 6319 | 6836 | 7440 |
| 1000 | 1413 | 1979 | 2351 | 2926 | 3382 | 3869 | 4343 | 4719 | 5168 | 5607 | 6328 | 6864 | 7468 |
| 1012 | 1425 | 1981 | 2358 | 2982 | 3398 | 3881 | 4355 | 4721 | 5173 | 5612 | 6339 | 6867 | 7472 |
| 1017 | 1434 | 1997 | 2368 | 2988 | 3429 | 3883 | 4361 | 4731 | 5185 | 5657 | 6380 | 6877 | 7497 |
| 1072 | 1473 | 1998 | 2371 | 2992 | 3431 | 3884 | 4368 | 4743 | 5209 | 5679 | 6394 | 6887 | 7524 |
| 1077 | 1484 | 2002 | 2381 | 3030 | 3437 | 3900 | 4369 | 4749 | 5235 | 5698 | 6397 | 6901 | 7578 |
| 1087 | 1501 | 2006 | 2385 | 3033 | 3438 | 3917 | 4388 | 4753 | 5240 | 5708 | 6407 | 6906 | 7606 |
| 1094 | 1511 | 2020 | 2392 | 3034 | 3456 | 3934 | 4400 | 4754 | 5250 | 5735 | 6441 | 6909 | 7618 |
| 1102 | 1521 | 2029 | 2404 | 3039 | 3482 | 3938 | 4406 | 4772 | 5256 | 5746 | 6470 | 6940 | 7627 |
| 1113 | 1553 | 2034 | 2420 | 3040 | 3483 | 3939 | 4419 | 4784 | 5274 | 5755 | 6480 | 6950 | 7640 |
| 1116 | 1560 | 2052 | 2424 | 3058 | 3489 | 3942 | 4422 | 4788 | 5285 | 5775 | 6533 | 6957 | 7643 |
| 1117 | 1577 | 2054 | 2426 | 3060 | 3509 | 3946 | 4426 | 4804 | 5295 | 5795 | 6535 | 6961 | 7647 |
| 1123 | 1579 | 2055 | 2441 | 3073 | 3517 | 3971 | 4434 | 4815 | 5305 | 5808 | 6552 | 6962 | 7694 |
| 1159 | 1581 | 2074 | 2478 | 3082 | 3523 | 3975 | 4439 | 4847 | 5315 | 5809 | 6586 | 6963 | 7695 |
| 1160 | 1601 | 2103 | 2520 | 3090 | 3543 | 3979 | 4441 | 4848 | 5316 | 5830 | 6587 | 6964 | 7704 |
| 1168 | 1642 | 2126 | 2527 | 3103 | 3559 | 3983 | 4447 | 4887 | 5325 | 5852 | 6596 | 6966 | 7707 |
| 1172 | 1660 | 2147 | 2562 | 3115 | 3572 | 3985 | 4448 | 4891 | 5335 | 5859 | 6616 | 6979 | 7720 |
| 1173 | 1665 | 2153 | 2577 | 3138 | 3585 | 3988 | 4451 | 4922 | 5337 | 5908 | 6618 | 6990 | 7725 |
| 1175 | 1675 | 2175 | 2580 | 3143 | 3593 | 4006 | 4452 | 4925 | 5353 | 5916 | 6627 | 7049 | 7733 |
| 1195 | 1680 | 2202 | 2583 | 3147 | 3594 | 4043 | 4454 | 4928 | 5375 | 5939 | 6630 | 7057 | 7743 |
| 1197 | 1688 | 2209 | 2597 | 3164 | 3600 | 4049 | 4456 | 4929 | 5385 | 5947 | 6636 | 7072 | 7746 |
| 1201 | 1690 | 2210 | 2614 | 3165 | 3625 | 4094 | 4458 | 4946 | 5398 | 5974 | 6645 | 7073 | 7747 |
| 1231 | 1701 | 2215 | 2619 | 3169 | 3631 | 4095 | 4464 | 4951 | 5419 | 5980 | 6648 | 7080 | 7750 |
| 1235 | 1721 | 2217 | 2624 | 3180 | 3637 | 4104 | 4471 | 4954 | 5423 | 5991 | 6653 | 7090 | 7773 |
| 1240 | 1780 | 2225 | 2625 | 3183 | 3649 | 4119 | 4474 | 4968 | 5430 | 6008 | 6656 | 7093 | 7777 |
| 1301 | 1787 | 2226 | 2629 | 3220 | 3656 | 4144 | 4475 | 4972 | 5452 | 6033 | 6666 | 7164 | 7780 |
| 1312 | 1798 | 2239 | 2630 | 3224 | 3663 | 4150 | 4490 | 4980 | 5457 | 6048 | 6671 | 7173 | 7805 |
| 1314 | 1801 | 2244 | 2667 | 3231 | 3717 | 4154 | 4506 | 4984 | 5465 | 6052 | 6673 | 7197 | 7811 |
| 1318 | 1811 | 2252 | 2707 | 3253 | 3723 | 4176 | 4512 | 5037 | 5505 | 6059 | 6692 | 7259 | 7840 |
| 1324 | 1814 | 2254 | 2708 | 3264 | 3733 | 4177 | 4536 | 5044 | 5515 | 6061 | 6701 | 7270 | 7843 |
| 1336 | 1871 | 2268 | 2722 | 3290 | 3787 | 4209 | 4548 | 5045 | 5519 | 6123 | 6706 | 7277 | 7871 |
| 1338 | 1900 | 2269 | 2726 | 3303 | 3802 | 4212 | 4550 | 5052 | 5531 | 6165 | 6711 | 7288 | 7875 |
| 1365 | 1905 | 2276 | 2782 | 3319 | 3803 | 4213 | 4575 | 5055 | 5537 | 6176 | 6744 | 7318 | 7887 |
| 1369 | 1913 | 2281 | 2790 | 3333 | 3823 | 4214 | 4581 | 5065 | 5540 | 6214 | 6749 | 7320 | 7919 |
| 1404 | 1939 | 2290 | 2805 | 3339 | 3830 | 4224 | 4594 | 5081 | 5553 | 6225 | 6761 | 7330 | 7967 |
| 1410 | 1941 | 2292 | 2814 | 3343 | 3831 | 4250 | 4604 | 5090 | 5570 | 6260 | 6765 | 7358 | 7979 |
| 1412 | 1951 | 2320 | 2828 | 3346 | 3834 | 4254 | 4649 | 5098 | 5577 | 6266 | 6767 | 7377 | 7997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी



**निकाल महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी** — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 02/08/2025

| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-01 : 4687 |
|---|---|

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0194 | 3607 | 3718 | 4044 | 6452 | 6593 | 8129 | 8350 | 8580 | 8805 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0483 | 1515 | 2525 | 5716 | 5886 | 6402 | 7074 | 7447 | 8769 | 9506 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0947 | 1613 | 3616 | 4035 | 4342 | 5762 | 6153 | 7197 | 9136 | 9824 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 0723 | 1510 | 2691 | 3354 | 4148 | 5002 | 6186 | 7524 | 8373 | 9310 |
| 0033 | 0839 | 1608 | 2712 | 3359 | 4264 | 5020 | 6301 | 7572 | 8440 | 9377 |
| 0094 | 0846 | 1641 | 2740 | 3374 | 4285 | 5055 | 6320 | 7639 | 8532 | 9392 |
| 0108 | 1012 | 1684 | 2800 | 3393 | 4338 | 5064 | 6369 | 7675 | 8563 | 9394 |
| 0159 | 1027 | 1794 | 2813 | 3435 | 4353 | 5183 | 6409 | 7760 | 8611 | 9404 |
| 0170 | 1081 | 1811 | 2825 | 3437 | 4448 | 5225 | 6455 | 7766 | 8663 | 9410 |
| 0200 | 1108 | 1884 | 2839 | 3539 | 4473 | 5345 | 6486 | 7771 | 8685 | 9459 |
| 0250 | 1111 | 1973 | 2851 | 3619 | 4485 | 5540 | 6523 | 7778 | 8688 | 9509 |
| 0254 | 1112 | 1976 | 2892 | 3622 | 4502 | 5549 | 6550 | 7786 | 8756 | 9529 |
| 0262 | 1130 | 1981 | 2906 | 3725 | 4520 | 5559 | 6634 | 7824 | 8758 | 9566 |
| 0323 | 1135 | 1992 | 2964 | 3749 | 4524 | 5566 | 6667 | 7827 | 8787 | 9601 |
| 0353 | 1139 | 2011 | 3039 | 3779 | 4526 | 5618 | 6707 | 7835 | 8805 | 9629 |
| 0364 | 1147 | 2020 | 3101 | 3794 | 4554 | 5619 | 6718 | 7872 | 8807 | 9688 |
| 0397 | 1164 | 2037 | 3129 | 3897 | 4560 | 5693 | 6875 | 7907 | 8828 | 9813 |
| 0430 | 1185 | 2203 | 3133 | 3921 | 4594 | 5815 | 6892 | 7967 | 8887 | 9861 |
| 0436 | 1219 | 2214 | 3135 | 3933 | 4647 | 5885 | 6947 | 7985 | 8896 | 9917 |
| 0502 | 1379 | 2222 | 3136 | 4044 | 4664 | 5918 | 7127 | 8042 | 8949 | 9941 |
| 0531 | 1449 | 2285 | 3143 | 4046 | 4789 | 5926 | 7151 | 8085 | 8988 | 9975 |
| 0541 | 1463 | 2286 | 3189 | 4075 | 4845 | 5950 | 7444 | 8122 | 9099 | 9976 |
| 0701 | 1466 | 2605 | 3195 | 4100 | 4847 | 5986 | 7446 | 8237 | 9136 | 9979 |
| 0713 | 1492 | 2661 | 3305 | 4122 | 4943 | 6036 | 7476 | 8298 | 9249 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


# देवेगौडांचा नातू रेवण्णाला बलात्कार प्रकरणी जन्मठेप

पान १ वरून

आणि गांभीर्य पाहता जन्मठेपेची शिक्षा योग्य असल्याचा युक्तिवाद करून कडक शिक्षा देण्याची मागणी केली. २०२१ मध्ये कोविड लॉकडाऊन काळात रेवण्णावर त्याच्या फार्महाऊसवर काम करणाऱ्या महिलेवर वारंवार बलात्कार केल्याचा आरोप आहे. त्या महिलेने सांगितले की रेवण्णाने तिच्यावर अत्याचार करताना व्हिडिओ रेकॉर्ड करून तो प्रसारित करण्याची धमकी दिली. म्हणून तिने तक्रार केली नाही. नंतर रेवण्णाचे २,९०० पेक्षा अधिक अश्लील व्हिडिओ समाजमाध्यमवर प्रसारित झाले. त्यानंतर पीडित महिलेने तक्रार दाखल केली. या प्रकरणात रेवण्णावर एकूण चार गुन्हे दाखल झाले. नागरिकांच्या तीव्र संतापानंतर रेवण्णा २०२४ लोकसभा निवडणुकांनंतर जर्मनीला पळून गेला. मात्र ३१ मे २०२४ रोजी भारतात परतल्यावर त्याला अटक झाली.

# बुद्धीबळ विश्वविजेती दिव्याला ३ कोटींचे बक्षीस प्रदान

पान १ वरून

या पाठिंब्यामुळे मला आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप मोठी मजल मारता आली.

दिव्याचे कौतुक करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दिव्याचा विजय हा देशासह नागपूर, महाराष्ट्राचा गौरव आहे. दिव्याच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

राज्यातील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झाला, त्यावेळी मंत्री छगन भुजबळ मिश्किलपणे म्हणाले की, नागपुरातील लोकांकडे बुद्धीमत्ता जास्तच आहे. त्यामुळे बुद्धीबळात त्यांना जास्तच गती आहे. आम्ही राजकारणीही बुद्धीबळ खेळतो. परंतु राजकारणाचे बुद्धीबळ खेळतो. आमच्याही खेळात नॉक आऊट, चेक मेट केले जाते. दिव्याच्या नागपुरातील सत्कारातून सगळ्यांना प्रेरणा मिळणार आहे. सध्या खेळाला सर्वत्र व्यावसायिक रूप येत आहे. महाराष्ट्र शासन क्रीडा क्षेत्राला महत्त्व देत असल्याने देश पातळीवरील स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक वर राहतो. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, खेळाडूंना विविध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खूप खर्च येतो. मात्र, कुटुंबाला खर्चाला मर्यादा असते. त्यामुळे पैसे नसलेल्या खेळाडूंची गैरसोय होत होती. काही प्रकरणांत त्यांना स्पर्धेतही सहभागी होता येत नव्हते. पण शासनाने ही अडचण दूर करण्यासाठी रोख स्वरूपातील बक्षिसाच्या रकमेत वाढ केली. यामुळे कोणताही होतकरू खेळाडू पैशांअभावी खेळापासून वंचित राहणार नाही.

Email-navakal.1923@gmail.com
navakaloffcial ▸www.navakal.in
पुणे ■ रविवार ३ ऑगस्ट, २०२५
नवा काळ
विजय


# 'टेरीफकंपा'च्या हादऱ्यांचे वास्तव




**डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टेरीफ आकारण्याची घोषणा नुकतीच केली आहे. या निर्णयातून ट्रम्प यांना भारतावर दबाव आणून वाटाघाटीत अधिक सवलती पदरात पाडून घ्यायच्या आहेत. जपान, व्हिएतनाम आणि युरोपवर असाच दबाव टाकल्यानंतर या देशांनी अमेरिकन कृषीमालासाठी आपल्या बाजारपेठा खुल्या केल्या. पण भारत मात्र याबाबत तयार नसल्याने ट्रम्प यांचा अहंकार दुखावला आहे. त्यामुळेच एक ऑगस्टच्या पूर्वीच त्यांनी ही घोषणा केली. वास्तविक, या टेरीफ शुल्कामुळे भारताला फार मोठा फटका बसणार नसून उलटपक्षी अमेरिकेत भारतीय उत्पादने महाग होणार आहेत. तसेच येणाऱ्या काळात वाटाघाटीतून काही मार्ग निश्चितपणाने निघू शकतो.**

» रविवार विशेष
● डॉ. शैलेंद्र देवळाणकर
परराष्ट्र धोरण विश्लेषक



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच एक ट्विट करत भारतावर २५ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केली. खरे तर त्यांनी दिलेली मुदत १ ऑगस्ट रोजी संपणार होती. पण त्यापूर्वीच त्यांनी ही घोषणा केली असून, यामुळे भारत–अमेरिका संबंधांमध्ये काही प्रश्नचिन्हे निर्माण झाले आहेत. वास्तविक पाहता, जानेवारी महिन्यामध्ये राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाल्यापासूनच ट्रम्प यांच्याकडून घेतली जाणारी भूमिका आणि सातत्याने केली जाणारी विधाने पाहिल्यास ती भारत–अमेरिका संबंधांमध्ये तणाव निर्माण करणारीच असल्याचे दिसून येते. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प अशा प्रकारे का वागताहेत, हे समजून घेणे गरजेचे आहे.

> चीनच्या जीडीपीमध्ये निर्यातीचा वाटा ६० टक्के आहे. त्यामुळे चीनवर अमेरिकेच्या निर्णयाचा परिणाम होऊ शकतो. चीनवर ट्रम्प यांनी आधी २०० टक्के टेरीफ आकारले आणि नंतर अचानक दोन्ही देशांत व्यापार करार झाल्याचे सांगत हे टेरीफ कमी करण्यात आले. हे एकाएकी घडले नाही. चीन हा अतिशय धूर्त देश आहे. ट्रम्प यांनी प्रचंड टेरीफ लावल्यानंतर चीनने रेअर अर्थ मिनरल्स म्हणजेच दुर्मीळ खनिजांचा अमेरिकेला होणारा पुरवठा पूर्णपणे बंद केला. यामुळे ट्रम्प यांचे मेक इन अमेरिकासारखे प्रकल्प धोक्यात आले. परिणामी चीनच्या या हुकमी एक्क्यामुळे ट्रम्प यांना चीनपुढे गुडघे टेकावे लागले.



**■ ट्रम्प यांची कार्यपद्धती**

मुळात डोनाल्ड ट्रम्प हे कसलेले उद्योगपती आहेत. त्यांची कार्य करण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. प्रतिपक्षावर प्रचंड दबाव टाकणे आणि त्याला चर्चेसाठी तयार करून आपल्या पदरात यश पाडून घेणे ही त्यांची कार्यपद्धती आहे. दुसरा मुद्दा म्हणजे, ही व्यक्ती आपल्या फायद्याशिवाय अन्य कोणत्याही गोष्टीचा विचार करत नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, त्यांना कोणी मित्र नाहीत. त्यांच्या दृष्टीने अमेरिकेचे हितसंबंध शीर्षस्थानी आहेत. आपल्या मतदारांना, अमेरिकन नागरिकांना खूश करणे यापलीकडे दुसरा विचार ते करत नाहीत.

**■ बहुपक्षतावादाला बगल**

वस्तुतः दुसऱ्या महायुद्धानंतरच्या अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणामध्ये बहुपक्षतावादाला महत्त्व होते. तसेच अमेरिकेची भूमिका ही प्रामुख्याने उपकाराची होती. पण डोनाल्ड ट्रम्प हे बहुपक्षतावादाऐवजी सातत्याने देवाणघेवाणीच्या (ट्रँझॅक्शनल) विषयांवरच बोलतात. ट्रम्प यांच्याकडून केल्या जाणाऱ्या घोषणा या बहुतांश वेळा दबावासाठीच असतात. त्यामुळेच ते केलेल्या घोषणेवरून बिनधास्तपणाने घूमजाव करून मोकळे होतात. हे लक्षात घेता भारतावर २५ टक्के टेरीफ आकारणीचा निर्णय हा ट्रम्प यांच्या दबावतंत्राचाच एक भाग असण्याची शक्यता आहे.

दोन्ही देशांदरम्यान चर्चा सुरू आहेत. असे असताना ट्रम्प यांनी एकाएकी २५ टक्के टेरीफ लावण्याची घोषणा का केली? याचे कारण आगामी चर्चेवर या घोषणेचा प्रभाव टाकून त्यांना भारताकडून अधिकाधिक सवलती पदरात पाडून घ्यावयाच्या आहेत.

**■ तणाव कशामुळे?**

केंद्र सरकारने यासंदर्भात दिलेल्या प्रतिक्रियेवरून भारत–अमेरिका व्यापार करारामध्ये छोटे व्यावसायिक–उद्योजक आणि शेतकरी हा तणावाचा मुद्दा असण्याची शक्यता आहे.

खरे पाहता, अमेरिकेकडून भारताला होणाऱ्या निर्यातीमध्ये ९० टक्के हिस्सा हा औद्योगिक उपकरणांचा (इंडस्ट्रियल कंपोनंटस्) असून कृषीक्षेत्राशी संबंधित घटकांचा हिस्सा केवळ ५ टक्के आहे. भारत आणि अमेरिकेतील व्यापार १२५ अब्ज डॉलर इतका असून, यामध्ये भारताची निर्यात ८५ अब्ज डॉलरची आहे. अमेरिकेची भारताला होणारी निर्यात ४० अब्ज डॉलरची आहे. याचाच अर्थ साधारणतः ४५ अब्ज डॉलरची व्यापारतूट आहे. ही व्यापारतूट इंडस्ट्रीयल कंपोनंटवरील आयात शुल्क कमी करून दूर करता येऊ शकते. याखेरीज अमेरिकेकडून कच्च्या तेलाची आयात करून किंवा शस्त्रास्त्रांची आयात करून ही व्यापारतूट कमी करता येऊ शकते. असे असताना कृषीमालाच्या आयातीवर डोनाल्ड ट्रम्प का अडून बसले आहेत?

> **विविध देशांची शरणागती**
>
> ■ जपानसारखा देश तांदळाची प्रचंड प्रमाणात निर्यात करणारा देश आहे. तसेच कृषीक्षेत्राबाबत संरक्षणात्मक भूमिका घेणारा हा देश आहे. असे असतानाही जपानने अमेरिकेच्या दबावाखाली येऊन कृषीक्षेत्र पूर्णपणे खुले केले आणि अमेरिकन कृषीमालावरील आयात शुल्क शून्य टक्के केले. इतकेच नव्हे तर जपानने अमेरिकेत ७०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची तयारीही दर्शवली.
>
> ■ व्हिएतनाम या देशानेही आपले कृषीक्षेत्र अमेरिकेसाठी खुले केले.
>
> ■ युरोपनेही अमेरिकन शेतमालासाठी आयात शुल्क शुन्यावर आणले आणि अमेरिकेत ७५० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची घोषणा केली. या सर्व देशांनी शेतमालाबरोबरच डेअरी उत्पादने, फिशरीजवरील शुल्कही शून्यावर आणले.
>
> ■ पाकिस्तानसारखा देश तर ट्रम्प यांच्या हातचे बाहुले बनल्याचे दिसत आहे. नोबेल पुरस्कारासाठी ट्रम्प यांना पाठिंबा देणाऱ्यांमध्ये पाकिस्तान सहभागी आहे. यावरून अमेरिकेसोबत करार करण्यासाठी आणि आपली अर्थव्यवस्थांची दारे अमेरिकेसाठी सताड उघडी करण्याची एक प्रकारची स्पर्धाच राष्ट्रांमध्ये सुरू झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

**■ मुख्य कारण काय?**

याचे कारण कुठे तरी ट्रम्प यांचा अहंकार दुखावला गेला आहे. सध्या सुरू असलेल्या टेरीफ प्रकरणामागे ट्रम्प यांचा मुख्य उद्देश सुमारे ३०० अब्ज डॉलरचा महसूल जमा करणे हा आहे. यासाठी त्यांनी १०० हून अधिक देशांविरोधात टेरीफअस्त्र उगारले आहे. एप्रिल महिन्यात केलेल्या घोषणेनंतर त्यांनी जी ९० दिवसांची मुदत दिली होती, या ९० दिवसांमध्ये काही देशांनी अमेरिकेसोबत तत्काळ व्यापार करार करण्याची भूमिका घेतली आणि ते पूर्णत्वासही नेले. पण हे करार म्हणजे सपशेल शरणागती म्हणता येईल अशा स्वरुपाचे होते. वास्तविक, याचे गंभीर परिणाम या देशांना भोगावे लागणार आहेत. डोनाल्ड ट्रम्प आता टेरीफ प्लस अशा प्रकारचे धोरण आणत आहेत. म्हणजेच कृषीक्षेत्र खुले करणाऱ्या देशांकडून त्यांना आणखीही काही अपेक्षा आहेत. यामुळे सगळीकडे असंतोषाचे वातावरण पसरले आहे.

अशा सर्व वातावरणात भारत मात्र ९० दिवस होत आले तरी कृषीक्षेत्र आणि डेअरी उत्पादने, फिशरीज यामध्ये अमेरिकेला पाय ठेवू न देण्याची आणि देशातील छोट्या व्यावसायिकांच्या हिताला बाधा येईल असा निर्णय न घेण्याची ठाम भूमिका घेऊन वाटाघाटी करत आहे. थोडक्यात ट्रम्प खूश होतील अशा प्रकारचे कोणतेही कृत्य करण्यास भारत तयार नाहीये. त्यामुळे ट्रम्प यांचा त्रागा होत आहे.

**■ रशियाचा मुद्दा नेमका काय आहे?**

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारादरम्यान रशिया–युक्रेन युद्ध सत्तेत आल्यानंतर काही तासांतच थांबवेन अशी गर्जना केली होती. पण आज परिस्थिती अशी आहे की, झेलेन्स्कीही त्यांचे ऐकण्यास तयार नाहीयेत आणि ब्लादीमिर पुतीन यांनीही त्यांचे प्रस्ताव धुडकावून लावले आहेत. पुतीन यांना कोणत्याही परिस्थितीत शस्त्रसंधीसाठी तयार करण्यासाठी ट्रम्प धडपड करताहेत. पण पुतीन यांची सध्या संपूर्ण भिस्त रशिया आणि भारतावर आहे. याचे कारण भारत सध्या आपल्या एकूण गरजेच्या ४० टक्के कच्चे तेल रशियाकडून घेत आहे. चीनही रशियाकडून प्रचंड प्रमाणात तेल आयात करत असून यामुळे रशियाची अर्थव्यवस्था निर्बंधांनंतरही सावरलेली आहे. भारत–चीनच्या या आयातीमुळे ट्रम्प यांचे मनसुबे पूर्ण होत नाहीयेत. त्यामुळेच आता त्यांनी टेरीफची घोषणा करताना रशियाकडून केल्या जाणाऱ्या तेलआयातीचा मुद्दा पुढे करत अतिरिक्त दंडआकारणी करण्याची धमकीही दिली आहे.

**■ भारतावर काय परिणाम?**


भारताच्या जीडीपीमध्ये निर्यातीचा वाटा २० टक्के आहे. भारताचा विचार करता अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत बड्या उद्योगांचा वाटा मोठा असून छोट्या व्यावसायिकांचा हिस्सा कमी आहे. जेम्स अँड ज्वेलरी, ऑटोपार्ट्स तयार करणाऱ्या मोठ्या कंपन्या, इंडस्ट्रीयल प्रॉडक्ट्स आणि फार्मास्युटिकल्स कंपन्या यांची अमेरिकेला होणारी निर्यात मोठी आहे.

■ भारताकडे एक जमेची बाजू आहे, ती म्हणजे देशांतर्गत मागणी. भारताचे डोमेस्टिक कंझम्पशन जीडीपीच्या ४० टक्के आहे. त्यामुळे जगाच्या बाजारपेठेवर भारताची फारशी भिस्त नाहीये. भारताच्या अर्थव्यवस्थेचा आकार सुमारे ४ ट्रिलियन डॉलर इतका आहे. या तुलनेत अमेरिकेसोबतचा व्यापार हा केवळ २ टक्के इतका आहे. त्यामुळे २५ टक्के टेरीफ आकारणीमुळे फार मोठे आकाश कोसळणार आहे, अशी स्थिती नाहीये. भारताने ब्रिटन, युएई, ऑस्ट्रेलियासह १३ देशांसोबत मुक्त व्यापार करार केलेला आहे. मध्य आशियातील देशांशी भारताचे व्यापार करार आहेत. त्यामुळे भारताने खूप मोठी काळजी करण्याची गरज आहे अशी स्थिती नाहीये. भारत–अमेरिका संबंध कायमचे बिघडणार आहेत अशी स्थिती बिलकूल नाहीये. ही पूर्णतः ट्रम्प यांची दबावनीती आहे. याचा परिणाम भारतापेक्षा अमेरिकेवर अधिक होणार आहे.



# परखड प्रत्युत्तराने काय साधणार?

■ प्रा. संजय कुमार
संचालक, सीएसडीएस



बिहारमधील मतदारयादी फेरतपासणीच्या मुद्यावरून विरोधकांनी देशभरात रान उठविले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही हा मुद्दा लावून धरला आहे. निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असतानाही त्याच्यावर आरोप केले जात आहेत. बिहारमध्ये मतदारयाद्यांच्या फेर आढाव्याच्या विरोधात विरोधी पक्षांनी नुकतीच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्यावर प्रखर टीका केली. या टीकेला उत्तर देत मुख्य निवडणूक आयुक्तांनी देखील काही प्रश्न उपस्थित केले. काही लोकांच्या म्हणण्याला बळी पडत निवडणूक आयोगाने मृत झालेल्या मतदारांच्या, स्थलांतर केलेल्या मतदारांच्या आणि दोन ठिकाणी यादीत नाव असलेल्या मतदारांच्या तसेच बनावट किंवा परदेशात असलेल्या मतदारांच्या नावावर बोगस मतदान करण्यासाठी समाजकंटकांना मोकळे रान द्यायचे का? असा सवाल त्यांनी केला.

वास्तविक, देशातील मुख्य निवडणूक आयुक्तांनी अशा प्रकारचा संयम सोडायला नको होता. उलट त्यांनी गांभीर्याने विचार करत अशा प्रकारचे आरोप निवडणूक आयोगावर का केले जात आहेत, याबाबत आत्मचिंतन करायला हवे होते. याचे कारण निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे. असे असूनही तिला एखाद्या पक्षाप्रमाणे टीकेला सामोरे जावे लागत असेल तर ती बाब चिंतनीय आहे. याहूनही वाईट गोष्ट म्हणजे विरोधी पक्षाचे नेते बिहारमधील आगामी निवडणुकीवरच बहिष्कार घालण्याची धमकी देत आहेत. कारण निवडणूक आयोगाकडून त्यांना अपेक्षेप्रमाणे निष्पक्षपणा दिसत नाहीये. आयोग सत्याला धरून भूमिका घेत नसल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.

विरोधकांचे सर्वच आरोप निराधार आहेत असे म्हणता येणार नाही. मतदारयाद्यांच्या फेरतपासणीवरून निवडणूक आयोगाने ५२ लाखांहून अधिक मतदार वेगवेगळ्या कारणांने संबंधित पत्त्यावर आढळून आले नसल्याचे म्हटले आहे. परंतु २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या काळात केलेल्या फेरतपासणीच्या वेळी या लोकांची माहिती कशी मिळाली नाही, याचे उत्तर आयोगाकडे नाही. त्याचवेळी ७.५ लाखांपेक्षा अधिक मतदारांचे नाव एकापेक्षा अधिक ठिकाणी आहे. परंतु एखादा मतदार तरी आपले नाव दोन ठिकाणी असल्याचे सांगण्यासाठी पुढे आला आहे का? नाही. अशा स्थितीत मुख्य निवडणूक आयुक्तांनी सध्याच्या अभियानावर होणाऱ्या टीकेला परखड शब्दांत प्रत्युत्तर देण्याऐवजी पुराव्यासह स्पष्टीकरण द्यायला हवे.




अर्थात मुख्य निवडणूक आयुक्त काहीवेळा एखाद्या पक्षाला झुकते माप देतात ही बाब नवीन नाही. गेल्या दोन तीन दशकांत वेगवेगळ्या मुख्य निवडणूक आयुक्तांबाबत असे बोलले गेले. एका आयुक्तांनी तर निवडणूक लढवत मंत्रिपदही मिळवले होते. काही निवडणूक आयुक्तांनी उघडपणे पक्षाची बाजू घेतल्याने आरोप–प्रत्यारोपाच्या फैरीही झडल्या आहेत. मात्र आजघडीला निवडणूक आयोग सत्तेच्या इशाऱ्यावर काम करत असल्याचा आरोप हा अधिक जोरकसपणे केला जात आहे.

गेल्या पाच वर्षांत अनेकदा असे अनुभव आले की, सरकारच्या परवानगीनंतर निवडणूक आयोगाने कार्यक्रमांची घोषणा केली. एवढेच नाही तर एखाद्या राज्यात गरज नसतानाही अनेक टप्प्यांमध्ये मतदानाची प्रक्रिया घेण्यात आली. काही वेळा निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्यापूर्वीच काही मंत्र्यांनी किंवा नेत्यांनी त्याचा उल्लेख केलेला असल्याचे निदर्शनास आले आहे.

आपल्यावर होणाऱ्या आरोपांपासून बचाव करण्यासाठी निवडणूक आयोगाने बिहारची मतदारयादी पुन्हा दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला आणि तो स्वागतार्ह होता. कारण मतदारयादीत अनेक प्रकारचे घोळ दिसून आले. दुर्दैवाने असे घडले नाही आणि आयोगाने दिलेला शब्द न पाळल्याने पुन्हा वाद निर्माण झाला. एवढेच नाही तर निवडणूक आयोगाने काही महिन्यांपूर्वी आगामी काळातील मोहिमांची जंत्री मांडली होती. त्यावेळी मतदारयादी फेरतपासणीचा कसलाही उल्लेख नव्हता. पण अचानक याबाबतचा निर्णय घेतला गेल्याने विरोधकांना टीका करण्यासाठी मुद्दा हाती लागला.

निवडणूक आयोगाच्या मोहिमेतील घोळावरूनही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. उदाहरणार्थ, निवडणूक आयोगाने सांगितलेली अत्यावश्यक कागदपत्रे आज अनेकांकडे उपलब्धच नाहीयेत आणि ज्या लोकांकडे असण्याची अपेक्षा होती ते सामाजिक आणि आर्थिक पातळीवर वंचित असल्याचे गृहीत धरण्यात आले. सामान्यपणे हा वर्ग राजद किंवा 'इंडिया' आघाडीला मतदान करणारा आहे. अर्थात कागदपत्रावरूनच नियम शिथिल करण्यात आले. मात्र आयोगाची कार्यशैली पाहता नंतर दाखल झालेल्या कागदपत्राच्या आधारे नावांत सुधारणा केली जाईल का? हा प्रश्न आहे. शिवाय ८० ते ९० टक्के अर्ज नाकारले गेले असून त्याचे कारण म्हणजे पुरावा नाही, असे आयोगाने सांगितले आहे.


एकंदरीत, प्रश्नांची योग्य उत्तरे न दिल्याने आयोगाची प्रतिमा खराब होत आहे. स्थिती अजूनही पूर्ण हाताबाहेर गेलेली नाहीये. एका सर्वेक्षणात 'सीएसडीए'ने म्हटल्यानुसार सर्वोच्च न्यायालय, लष्कर आणि निवडणूक आयोगावर लोकांचा विश्वास आहे. पण गेल्या काही वर्षात निवडणूक आयोगाची विश्वासार्हता कमी झाली आहे. पण संयमाने काम केले तर बिघडलेली गोष्ट दुरुस्त होऊ शकते. सर्वात आधी मुख्य निवडणूक आयुक्तांनी सर्व पक्षांना सोबत घेत पुढे जायला हवे आणि वादात तेल घालणाऱ्या वक्तव्यांपासून दूर राहण्याची भूमिका घेतली पाहिजे.

# आयटी क्षेत्रासाठी धोक्याची घंटा?

**देशातील सर्वात मोठ्या आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) ने आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये आपल्याकडील २ टक्के कर्मचाऱ्यांची कपात करण्याचा निर्णय अलीकडेच जाहीर केला आणि संबंध आयटी क्षेत्रासह उद्योगजगतात एकच खळबळ उडाली. सुरुवातीला हा निर्णय कंपनीच्या धोरणांचा भाग म्हणून पाहिला गेला; पण या निर्णयाचा परिणाम आता भारतातील इतर आयटी कंपन्यांवरही दिसून येत आहे. नफ्यावरचा दबाव (मार्जिन प्रेशर), जुनी आणि कालबाह्य कौशल्ये (मिसमॅच स्किल्स) आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता)चा वेगाने वाढणारा प्रभाव यामुळे ही कामगार कपात येणाऱ्या काळात आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.**




■ महेश कोळी
संगणक अभियंता



टीसीएसच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ही कामगारकपात थेट एआयमुळे नव्हे, तर कर्मचाऱ्यांच्या कौशल्यांमध्ये आणि कंपनीच्या गरजांमधील विसंगतीमुळे (कौशल्य तफावत) झाली आहे, असे म्हटले आहे.

३० जून २०२५ पर्यंत टीसीएसकडे एकूण ६,१३,०६९ कर्मचारी होते. नव्या धोरणानुसार आता मधल्या आणि वरिष्ठ स्तरावरील सुमारे १२,२०० कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने कामावरून कमी केले जाणार आहे. या निर्णयामुळे खळबळ उडण्यामागे टीसीएसचे आयटी क्षेत्रातील महत्तम स्थान आणि एकूण भारताच्या सॉफ्टवेअर क्षेत्रातील तिचे योगदान या गोष्टी कारणीभूत आहेतच; पण त्याला अन्य काही गोष्टींची पार्श्वभूमीही आहे आणि ती समजून घेणे गरजेचे आहे.

**• भारतातील आयटी उद्योग**

भारताच्या आयटी क्षेत्राने देशाच्या आर्थिक यशोगाथेत फार मोठी भूमिका बजावली आहे. २०२४ मध्ये हे क्षेत्र सुमारे ५० लाख लोकांना रोजगार देत होते, तर जीडीपीमध्ये आयटी क्षेत्राचे योगदान ७ टक्के होते. सेवाक्षेत्रातील निर्यातीच्या निम्म्याहून अधिक वाटा या क्षेत्राचा होता. त्यामुळे आयटी क्षेत्रातील कोणतीही नकारात्मक घटना देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम करू शकते.

**• अस्वस्थता का?**

गेल्या काही वर्षांत भारताने डिजिटल परिवर्तन आणि तांत्रिक प्रगतीच्या दिशेने भरीव पावले टाकली आहेत. देशातील सर्व स्तरांवर समाजाने बदलते तंत्रज्ञान स्वीकारले आहे. त्यामागे एक विश्वास होता की, या परिवर्तनाच्या लाटेमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. परंतु अशा सकारात्मक वातावरणात टीसीएसने कर्मचारी कपातीची घोषणा केल्याने अस्वस्थता निर्माण झाली आहे. आयटी सेवा उद्योग आता एका मूलभूत रचनेतील बदलाच्या टप्प्यावर उभा आहे. या क्षेत्रात आता पारंपरिक भूमिकांपेक्षा अधिक उत्पादनक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत कौशल्यांची मागणी वाढत आहे. एकीकडे, तांत्रिक स्पर्धेत मागे पडायचे नाही, ही व्यवसायांची गरज आहे, तर दुसरीकडे रोजगार गमावलेले कर्मचारी आणि हजारो नवे पदवीधर त्यांच्या भविष्यासाठी अस्वस्थ आहेत.

**• एआयचा प्रभाव**

वास्तविक, डिजिटल विश्वात कृत्रिम बुद्धीमत्ता नावाचा नवा अवतार उदयास आल्यापासून तो अनेकांच्या नोकऱ्या गिळंकृत करणार हा ढोल सातत्याने वाजवला जात आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमपासून अनेक संस्थांनी याबाबत धोक्याचा इशारा यापूर्वीच दिलेला आहे. जगभरातील अनेक दिग्गज कंपन्यांमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला असून, त्याचा परिणाम कामगारकपातीच्या रुपाने दिसून येऊ लागला आहे. मायक्रोसॉफ्ट, आयबीएम आणि इंटेल या कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्याच्या योजना जाहीर केल्या आहेत.

त्यामुळे टीसीएसमधील कर्मचारीकपात हे एखाद्या अपवादात्मक घटनेचे लक्षण न राहता, एक उद्योगव्यापी कल असल्याचे मानण्यास जागा आहे. भविष्यात नव्या बदलांसोबत स्वतःला जुळवून घेत मूल्यवर्धन करू शकणाऱ्या आणि रोजगार निर्मितीत हातभार लावू शकणाऱ्या संस्थाच टिकाव धरू शकणार आहेत.

**• अनेक कार्यांसाठी एक एआय**

तंत्रज्ञानविश्वातील एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अलीकडेच एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत स्पष्टपणे म्हटले की, आता एकच एआय मॉडेल अनेक कार्यांसाठी वापरणे शक्य होत असून हे काम पूर्वी केवळ माणसेच करू शकत होती. एकदा का उद्योगक्षेत्र या मॉडेल्सचा स्वीकार करू लागले की, मानवी श्रमाची जागा एआयने घेण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल. उद्योगक्षेत्र अधिकाधिक प्रमाणात संगणक व बुद्धिमान यंत्रणा वापरून कार्यक्षमतेमध्ये वाढ करेल. परंतु त्याचवेळी मानवी कामगारांची गरज कमी होईल. काही कंपन्यांमध्ये तर एआयचा वापर इतका प्रभावी ठरला आहे की, विशिष्ट काम करणारे संपूर्ण विभागच बंद करून टाकण्यात आले आहेत. हे फक्त भारतापुरते मर्यादित नाही, तर जगभरातील अनेक देशांमध्ये हे चित्र दिसते आहे.

**• कर्मचारीभरतीही मंदावली**

गेल्या दशकभरात नवीन इंजिनिअर्सच्या प्रारंभिक पगारात फारशी वाढ झाली नाही. तशातच आज नवीन भरती झालेल्यांची कामे करण्यामध्ये एआय सक्षम झाला आहे. त्यामुळे कंपन्यांनी हजारो नवीन अभियंते दरवर्षी भरती करत राहावेत, याला आता तितकासा आधार नाही. परिणामी, यापुढे नवशिके म्हणून रुजू झालेले अतिरिक्त कर्मचारी हळूहळू कमी केले जाण्याची शक्यता निश्चित आहे.

**• रोजगाराचे बदलते स्वरुप**

एआयच्या वापरामुळे रोजगाराचे स्वरूपच बदलते आहे. आता आयटीमध्येही सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कंप्युटिंग, फुलस्टॅक डेव्हलपमेंट आणि एआय तंत्रज्ञान यामध्ये अधिक मागणी आहे. याशिवाय, डेटा सेंटर्सचे व्यवस्थापन, चिप डिझाईनसारख्या क्षेत्रांमध्येही काम मिळू शकते. पण हे रोजगार कौशल्याधारित असतील, त्यासाठी दीर्घ आणि खर्चिक शिक्षण आवश्यक आहे. इतके करूनही यामध्ये भरपूर संधी निर्माण होणार नाहीत, हे स्पष्ट आहे. आज देशभरातील खासगी आणि सरकारी शिक्षणसंस्था, विद्यापीठांमध्ये आयटी विषयांची मागणी प्रचंड वाढलेली आहे. हजारो तरुण आयटी इंजिनिअर्स दरवर्षी शिक्षण घेऊन बाहेर पडताहेत. या अभियंत्यांना टीसीएससारख्या कंपनीकडूनच सर्वाधिक अपेक्षा असते. अशावेळी आलेला हा निर्णय तमाम पिढीवर नकारात्मक परिणाम करणारा ठरणार आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# ट्रम्प यांचा कही पे निगाहे कही पे निशाना

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची अर्थव्यवस्था मृत म्हणजेच डेड इकोनॉमी असल्याची टीका केली आहे. त्यांच्या या टीकेचे अनेक अर्थ आणि संदर्भ निघतात. त्यांना भारतीय अर्थव्यवस्था डेड का वाटावी. कारण त्यांच्याच देशातल्या अनेक संस्थांनी भारताच्या अर्थव्यवस्थेचे तोंड भरून कौतुक केलेले आहे. ट्रम्प यांचे हे वक्तव्य म्हणजे 'कही पे निगाहे कही पे निशाना' या पद्धतीचे आहे. भारताचे आणि रशियाचे संबंध चांगले आहेत. गेल्या अनेक वर्षांची भारत-रशिया मैत्री गेल्या दहा वर्षांत आणखी भक्कम झाली. अमेरिकेला अपेक्षित नसलेले अनेक नवीन करारमदारही रशियाबरोबर झाले. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी भारताचा वारंवार गौरव केला. भारताच्या जागतिक स्तरावरच्या दहशतवादविरोधी मोहिमेत रशियाने नेहमी पाठिंबा दिला. एवढेच नव्हे तर संयुक्त राष्ट्र परिषदेत भारताला स्थान मिळाले पाहिजे. याचे रशियाने वारंवार समर्थन केले आहे. रशिया आणि युक्रेन या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे रशियाबरोबरचे वैमनस्य आणखी वाढले. रशियाविरोधात युक्रेनचे समर्थन करून अमेरिकेने आपला हा रशियाविरुद्धचा राग वारंवार व्यक्त केला. पण त्याचा फारसा परिणाम झाला नाही. एवढेच नव्हे तर रशियावर आर्थिक निर्बंध लादण्याचाही प्रयोग करून बघितला. परंतु त्याचाही फारसा उपयोग झाला नाही. भारताची आणि रशियाची ही मैत्री अमेरिकेच्या डोळ्यात खुपू लागली आहे. म्हणजेच भारत अमेरिकेपेक्षा रशियाला जास्त महत्त्व देतो आहे, अशी समजूत अमेरिकेने करून घेतली आहे. रशियावरचा राग भारतावर काढण्याचे उपद्व्याप अमेरिकेने सुरू केले आहेत. म्हणजे रशियाबरोबर या नव्या टेरिफ प्रकरणात भारतालाही भरडून काढण्याचा अमेरिकेचा डाव दिसतो. भारताने यासंदर्भात अधिक स्पष्ट भूमिका घेतली आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेली आणि अमेरिकेसारखीदेखील तितकीच मोठी बाजारपेठ असलेल्या भारताबरोबरचे संबंध इतक्या सहजासहजी बिघडवणे अमेरिकेला परवडणारे नाही ही देखील वस्तुस्थिती आहे. म्हणूनच 'कही पे निगाहे कही पे निशाना' हेच सूत्र ट्रम्प यांच्याबाबतीत लागू पडते

**भारताला भरडण्याचा प्रयोग**

रशियापाठोपाठ भारतावरही जवळपास पंचवीस टक्के टेरिफ आकारण्याचा अमेरिकेने निर्णय घेतला. या दबाव तंत्राचा भारतावर परिणाम होईल, असा ट्रम्प यांना अंदाज असावा. अमेरिकेच्या या निर्णयाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो. विशेषतः कृषीप्रधान देश असलेल्या भारताच्या शेतीव्यवसायाला त्याचा फटका बसू नये. म्हणजेच कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांचे हित जपणे हे अधिक महत्त्वाचे ठरते. येत्या सहा महिन्यांमध्ये या सगळ्या प्रकरणाबाबत सविस्तर खुलासे होऊ शकतील. जरी आज ट्रम्प यांनी भारताची अर्थव्यवस्था मृत अर्थव्यवस्था आहे अशी शेरेबाजी केली तरी ती उटपटांग स्वरूपाचीच ठरते. आणि याची जाणीवही त्यांना येत्या सहा महिन्यांमध्ये होऊ शकेल. जर भारताची अर्थव्यवस्था इतकी डबघाईला गेली आहे, असे ट्रम्प यांना वाटत असेल तर अगदी काही महिन्यांपूर्वी त्यांचे 'जीवश्च कंठश्च' मित्र असलेल्या इलॉन मस्कने भारतात मोठी गुंतवणूक केली नसती. याशिवाय बऱ्याच अमेरिकन कंपन्यांनी भारतात मोठे प्रकल्प उभारायला सुरुवात केलेली आहे. महत्त्वाचा भाग म्हणजे आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात जगाच्या अर्थव्यवस्थेचे भवितव्य बदलत्या तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. आणि तंत्रज्ञानामध्ये भारताने मोठी प्रगती केलेली आहे. अगदी अमेरिकेतल्या सिलीकॉन व्हॅलीलासुद्धा जगातल्या प्रत्येक देशांवर अवलंबून राहावे लागते. तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्था एकमेकांशिवाय राहू शकत नाही. भारताने या दोन्ही क्षेत्रात मोठी झेप घेतल्याने जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने फारच वेगाने पुढे जात आहे. याउलट अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला गेल्या काही वर्षात धक्के बसले आणि भविष्यकाळात ही व्यवस्था कोलमडू नये म्हणून ट्रम्प यांनी टेरिफचे हत्यार उपसले आहे. परंतु 'सब घोडे बारा टक्के' अशा पद्धतीने सगळ्या देशांनाच ही टेरिफची मात्रा लागू पडेल असे नाही. सगळं जग काही अमेरिकेवर अवलंबून नाही. कोरोना काळात अनेक देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडल्या. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणताही परिणाम झाला नव्हता. इतक्या मोठ्या जागतिक संकटातही भारतीय अर्थव्यवस्था टिकून राहिली हे नाकारता येणार नाही.

**पॉलिटिकल ब्रेड बटर**

ट्रम्प यांच्या या टीकेच्या सुरामुळे भारतातल्या काही राजकीय नेत्यांनीदेखील आपला सूर मिसळला आहे. राजकीय लाभासाठी कदाचित ते योग्यही असेल. परंतु राजकारणाच्या पलिकडे जाऊन अर्थकारणाचा जर विचार केला तर भारताची स्थिती बऱ्यापैकी चांगली आहे. सर्वाधिक लोकसंख्या तितकीच मोठी गरिबी, बेरोजगारी आणि अनेक प्रकारची विविधता या सगळ्यांमधून मार्ग काढीत भारतीय अर्थव्यवस्थेला प्रवास करावा लागत अनेक क्षेत्रात भारताने स्वयंपूर्णता प्राप्त केलेली आहे. स्वाभाविकपणे अमेरिकेसारख्या देशावर अवलंबून राहण्याचे दिवस संपले आहेत. भारताची ही प्रगतीदेखील ट्रम्प यांना अडचणीची वाटत असावी. अगदी दहशतवाद्याच्या लढ्यातसुद्धा भारताने स्वतःच्या ताकदीवर पाकिस्तानला गुडघे टेकायला लावले आहे. ऑपरेशन सिंदूरचा जागतिक परिणामही प्रभावी ठरला. भारत-पाक संघर्षामध्ये ट्रम्प यांची मध्यस्थी भारताने सपशेल फेटाळून लावली आहे. ट्रम्प यांचा इगो दुखावला गेला असण्याची शक्यता आहे. म्हणूनच आता त्यांच्या तोंडी पाकिस्तानला गोंजारण्याची भाषा ऐकू येते आहे. खरं तर एकूणच अमेरिकेचेच भवितव्य ट्रम्प यांच्या हातात सुरक्षित आहे की नाही याबद्दल अमेरिकन लोकांनाच शंका वाटू लागते. अशा परिस्थितीत त्यांनी भारताविषयी शेरेबाजी करण्याचे काहीच कारण नव्हते. भारताला डेड इकॉनॉमी ठरवून आपल्या पॉलिटिकल ब्रेड बटरची व्यवस्था होऊ शकते. बदललेल्या आंतरराष्ट्रीय वातावरणाचा विचार केला तर अतार्किक आणि अनावश्यक दबावापुढे भारतासारखा देश नमण्याची शक्यता नाही. या सर्व गोष्टी राजकीय चर्चा आणि मुत्सद्देगिरीतून सहजपणे निकाली काढता येऊ शकतात.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**भावनांचा आणि वेदनांचा कधीच हिशोब लावता येत नाही, त्या ज्याच्या त्यालाच कळतात.**

## पंचांग

**रविवार, ३ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



**श्रावण शुक्ल नवमी**
**नक्षत्र : विशाखा**

**रवी उदय- ०६-१७**
**रवी अस्त- १९-१२**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० वृश्चिक**

**आदित्य पूजन; संत नरहरी महाराज जयंती; क्रांतीसिंह नाना पाटील जयंती; जागतिक मैत्री दिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### मलाई लाडू

★ **साहित्य :-** फुल क्रीम दूध - एक लीटर, लिंबाचा रस किंवा व्हिनेगर - दोन चमचे, साखर - अर्धा कप, वेलची पावडर - अर्धा चमचा, केशराचे धागे, बदाम आणि पिस्ता, तूप - १ चमचा

★ **कृती :-**
सर्वात आधी फुल क्रीम दूध एका जाड तळाच्या पॅनमध्ये उकळवा. दूध उकळताच, त्यात हळूहळू लिंबाचा रस किंवा व्हिनेगर घाला आणि ढवळून घ्या. थोड्या वेळाने, दूध दही होईल आणि चक्का आणि पाणी वेगळे होईल. आता हा चक्का मलमलच्या कपड्यात गाळून त्यावर थंड पाणी ओतून चांगले धुवा जेणेकरून लिंबाचा आंबटपणा निघून जाईल. यानंतर, चेना एका कापडात गुंडाळा आणि हलके दाबा आणि २० ते ३० मिनिटे लटकवा जेणेकरून सर्व पाणी बाहेर येईल. चक्का कोरडा झाल्यावर ते एका प्लेटमध्ये काढून चांगले मॅश करा. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही ते मिक्सर ग्राइंडरमध्ये फिरवू शकता जेणेकरून ते खूप गुळगुळीत होईल. चक्का एका नॉन-स्टिक पॅनमध्ये ठेवा, त्यात साखर आणि वेलची पावडर घाला. मिश्रण घट्ट होईपर्यंत आणि एकसारखे होईपर्यंत आणि पॅनमधून बाहेर पडू लागेपर्यंत मध्यम आचेवर सतत ढवळत शिजवा. जर तुम्हाला केशरची चव आवडत असेल तर तुम्ही त्यात केशराचे धागे देखील घालू शकता. आता गॅस बंद करा आणि मिश्रण थोडे थंड होऊ द्या. ते कोमट झाल्यावर तूप लावा आणि हाताने छोटे लाडू बनवा. वर चिरलेले बदाम आणि पिस्त्याने सजवा. तर चला तयार आहे आपले मलाई लाडू.



# दुलीप ट्रॉफीसाठी पूर्व विभागाचा संघ जाहीर
# कर्णधारपदाची जबाबदारी ईशान किशनकडे

**दुलीप ट्रॉफी २०२५ साठी पूर्व विभागाच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा करण्यात आली. या संघाचे नेतृत्व भारतीय संघाबाहेर असलेला यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशनकडे सोपवण्यात आले आहे, तर अनुभवी फलंदाज अभिमन्यू ईश्वरनला उपकर्णधार बनवण्यात आले.**



■ नवी दिल्ली

**संघात** अनेक उल्लेखनीय खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे, ज्यात भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी नुकताच इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघात समावेश करण्यात आलेला आकाश दीप आणि तरुण प्रतिभावान रियान पराग यांचा समावेश आहे. याशिवाय, बिहारचा १४ वर्षीय १९ वर्षांखालील खेळाडू वैभव सूर्यवंशीचा सहा स्टँडबाय खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला आहे. भारतीय संघाबाहेर असलेल्या ईशान किशनने नुकतीच काऊंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन-१ मध्ये नॉटिंगहॅमशायरकडून शानदार कामगिरी केली आहे. त्याने दोन अर्धशतके झळकावली. ज्यामुळे त्याला पूर्व विभागाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. अभिमन्यू ईश्वरन सध्या भारतीय कसोटी संघासोबत इंग्लंड दौऱ्यावर आहे. त्याची तांत्रिकदृष्ट्या चांगली फलंदाजी आणि अनुभव संघासाठी महत्त्वाचा असेल. दुखापतीतून सावरल्यानंतर भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी पुनरागमन करत आहे. तो शेवटचा आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबादकडून खेळला होता, जिथे त्याने ९ सामन्यांमध्ये ६ विकेट घेतल्या होत्या. त्याचा शेवटचा प्रथम श्रेणी सामना नोव्हेंबर २०२४ मध्ये रणजी ट्रॉफीमध्ये बंगालकडून होता आणि शेवटचा कसोटी सामना जून २०२३ मध्ये खेळला गेला होता. शमीची अनुभवी गोलंदाजी पूर्व विभागासाठी ट्रम्प कार्ड ठरू शकते. इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघात समावेश करण्यात आलेला वेगवान गोलंदाज आकाश दीपने अलिकडच्या काळात उत्तम कामगिरी केली आहे. त्याची गती आणि स्विंग गोलंदाजी विरोधी फलंदाजांसाठी आव्हान निर्माण करेल.

## जुहू विलेपार्ले जिमखान्यात १६ ऑगस्टपासून कॅरम स्पर्धा

■ मुंबई

**जुहू** विलेपार्ले जिमखाना, महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या विद्यमाने १६ ते १८ ऑगस्टदरम्यान जुहू विलेपार्ले जिमखाना (ए.सी.) हॉल, प्लॉट क्रमांक १३, एन.एस.रोड क्रमांक १३, जुहू बस डेपोच्या समोर, जुहू येथे राज्य मानांकन कॅरम स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. पुरुष एकेरी आणि महिला एकेरी अशा दोन गटांत ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेतील प्रत्येक गटातील पहिल्या ८ खेळाडूंना मिळून एकंदर १ लाख १० हजारांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धे चे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशन,पारेख महल बिल्डिंग, सखाराम कीर मार्ग, आश्रय हॉटेलच्या मागे, शिवाजी पार्क, दादर येथे सायंकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान उपलब्ध असून, स्पर्धेत नावे नोंदविण्याची अंतिम तारीख ६ ऑगस्ट २०२५ आहे.

## भारतीय फुटबॉल संघाच्या प्रशिक्षकपदी खलिद जमिल

■ नवी दिल्ली



२०१७ मध्ये ऐजवाल फुटबॉल क्लबला आय लीगचे जेतेपद मिळवून देण्यासाठी संघाला मार्गदर्शन केलेल्या खलिद जमिल यांची भारतीय फुटबॉल संघाच्या प्रमुख प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. या पदावर नियुक्ती झालेले ते १३ वर्षांतील पहिले भारतीय आहेत. ४८वर्षीय जमिल हे माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू असून, सध्या ते जमशेदपूर एफसीचे प्रशिक्षक आहेत. शुक्रवारी एआयएफएफ कार्यकारी समितीची बैठक झाली. त्यात त्यांच्या नियुक्तीचा निर्णय घेण्यात आला. या पदासाठी संघाचे दोन माजी प्रशिक्षक स्टिफन कॉन्स्टन्टाईन व स्टिफन तार्कोविच हेही शर्यतीत होते.

## रचना आणि अश्विनीने विश्व जेतेपद पटकावले

■ ॲथेन्स

**ॲथेन्स** येथे झालेल्या १७ वर्षांखालील वयोगटाच्या महिलांच्या विश्व कुस्ती चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताच्या महिला मल्ल रचना आणि अश्विनी विष्णोई यांनी विश्व जेतेपद पटकावले तर भारताच्या मोनीचे सुवर्णपदक थोडक्यात हुकल्याने तिला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. रचनाने ४३ किलो गटात तर अश्विनी विष्णोईने ६५ किलो गटात विजेतेपद पटकाविले. मात्र ५७ किलो गटात मोनीचे जेतेपद थोडक्यात हुकले. महिलांच्या ४३ किलो वजनी गटातील अंतिम लढतीत रचनाने चीनच्या झीन हुआंगचा ३-० अशा गुणांनी एकतर्फी पराभव करत विश्वविजेतेपद आणि सुवर्णपदक पटकाविले.

## विश्व टेबल टेनिस स्पर्धेसाठी भारतीय संघांचे तिकीट पक्के

■ नवी दिल्ली

**लंडनमध्ये** होणाऱ्या आगामी विश्व टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी आपले तिकीट पक्के केले आहे. काठमांडू येथे झालेल्या द.आशियाई विभागीय टेबट टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांनी दर्जेदार कामगिरी केल्याने त्यांना विश्व टेबल टेनिस स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध करता आली.

विश्व टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी आशिया खंडातून केवळ १६ संघांनी आणि मध्य आशिया, द.आशिया, दक्षिण-पूर्व आशिया आणि प.आशिया या चार विभागांतून प्रत्येकी ४ विभागीय चॅम्पियन्सना पात्र ठरविण्यात आले. काठमांडूमध्ये झालेल्या द. आशियाई विभागीय टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी दर्जेदार कामगिरी करत शेवटपर्यंत एकही पराभव पत्करला नाही. ही स्पर्धा ५ देशांमध्ये राऊंडरॉबीन पद्धतीने खेळविली गेली. भारताच्या पुरुष संघामध्ये आकाश पाल, रोनीत भांजा, अनिर्बन घोष, पी. बी.अभिनंद आणि दिव्यानेश श्रीवास्तव यांचा समावेश होता. भारतीय पुरुष संघाने बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ आणि मालदिव या संघांचा ३-० अशा समफरकाने पराभव केला. भारताच्या महिला संघामध्ये कृत्विका सिन्हा, सेलेनादिप्ती सेलव्हाकुमार, तनिषा कोटेचा, सायली वाणी आणि सिंड्रेला दास यांचा समावेश होता. भारतीय महिला संघाने चार प्रतिस्पर्ध्यांवर एकतर्फी विजय मिळवित विश्व टेबल टेनिस स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली.

## पाकिस्तान,अफगाणिस्तान,युएईमध्ये २९ ऑगस्टपासून तिरंगी मालिका सुरू

■ दुबई




२९ ऑगस्टपासून खेळविण्यात येणाऱ्या तिरंगी टी-२० मालिकेत पाकिस्तान संघाचा सलामीचा सामना अफगाणबरोबर होणार आहे. या तिरंगी स्पर्धेत संयुक्त अरब अमिरात (युएई) हा तिसरा संघ आहे. सप्टेंबर महिन्यात संयुक्त अरब अमिरातमध्ये आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा भरविली जाणार आहे. त्यामुळे या उपखंडीय संघांमध्ये सरावाकरिता ही तिंरगी टी-२० मालिका आयोजित केली आहे.

या तिरंगी स्पर्धेत प्रत्येक संघ दुसऱ्या संघाबरोबर दोनवेळा लढत देईल. त्यानंतर आघाडीचे दोन संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील. अंतिम सामना ७ सप्टेंबरला खेळविला जाईल. शारजाच्या क्रिकेट स्टेडियमवर पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या दोन संघांमध्ये आतापर्यंत पाचवेळा टी-२०चे सामने खेळविले गेले. त्यामध्ये पाकिस्तानने तीनवेळा तर अफगाणने दोनवेळा विजय नोंदविले आहेत. पाकिस्तानचा क्रिकेट संघ सध्या विंडीजच्या दौऱ्यावर ३ सामन्यांची टी-२० मालिका खेळत आहे.

## वाराणसीच्या दोन्ही हॉकी संघांनी ट्रॉफी जिंकली

■ काशी

यजमान झाशी आणि प्रयागराज विभागाच्या हॉकी संघांना पराभूत करून वाराणसीने प्रथमच मुले आणि मुली दोन्ही गटांत ट्रॉफी जिंकली आहे. या विजयासह वाराणसी विभागातील दोन्ही संघ नेहरू कप हॉकीच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. वाराणसी विभागाचे प्रतिनिधित्व विकास इंटर कॉलेजच्या खेळाडूंनी केले होते. नेहरू कप प्रादेशिक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मुलांच्या संघाने झाशी विभागाचा ५-२ असा पराभव केला.

## लक्ष्य सेन आणि मन्नेपल्लीचा मकाऊ ओपनच्या उपांत्य फेरीत पराभव

■ मकाऊ



**भारतीय** बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि थरुन मन्नेपल्ली यांनी आपापल्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत पराभव पत्करला. त्यामुळे मकाऊ ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात आले. लक्ष्यला पाचव्या मानांकित इंडोनेशियन शटलर अल्वी फरहानविरुद्ध ३९ मिनिटांत १६-२१,९-२१ असा पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे मन्नेपल्लीचा मलेशियाच्या जस्टिन होहविरुद्ध १ तास २१ मिनिटे चाललेल्या सामन्यात २१-१९, १६-२१, १६-२१ असा पराभव झाला.

२०२५ च्या बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरमध्ये लक्ष्य सेनची ही आतापर्यंतची सर्वात यशस्वी मोहीम होती. या हंगामात तो पहिल्यांदाच एखाद्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचला होता.गेल्या वर्षीच्या अखेरीस सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय विजेतेपद जिंकल्यापासून त्याने १० बीडब्ल्यूएफ स्पर्धा खेळल्या आहेत. परंतु कोणत्याही स्पर्धेत तो उपांत्य फेरीत पोहोचलेला नाही. गुरुवारी झालेल्या संघर्षपूर्ण विजयानंतर लक्ष्यने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आणि नंतर चीनच्या झू झुआन चेनवर तीन गेमने विजय मिळवला. २३ वर्षीय थरुन मन्नेपल्लीसाठी मकाऊ ओपनच्या उपांत्य फेरीत पोहोचणे ही त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वात मोठी कामगिरी होती. त्याने चिनी शटलर हू झे अनचा २१-१२,१३-२१,२१-१८ असा पराभव करून अंतिम ४ मध्ये स्थान मिळवले.

# दुसरा सोमवार शिवामूठ...

शिवामूठ ही एक धार्मिक संकल्पना आहे. श्रावण महिन्यात प्रत्येक सोमवारी भगवान शंकराला एक मूठ धान्य अर्पण करणे म्हणजे शिवामूठ होय. प्रत्येक सोमवारी वेगवेगळे धान्य एक मूठ घेऊन ते शिवाच्या पिंडीवर वाहिले जाते. या सोमवारी म्हणजेच दुसऱ्या सोमवारी तिळाची मूठ भगवान शंकरांना अर्पण करावी. तीळ म्हणजे मूळ भारतातील तेलवर्गीय वनस्पती. देव कार्यात नंदादीप, समई, पणती यातील शांत, सौम्य प्रकाशासाठी तिळाच्या तेलाला प्राधान्य दिले जाते. धार्मिक कार्यात विशेषत: श्राद्धपक्ष कार्यात काळे तीळ वापरले जातात. स्नेह याचा अर्थ प्रेम, जिव्हाळा, जवळीक साधणे. शरीर आणि मन जोडणारे हे तिळधान्य शिवामूठ म्हणून वाहताना हा स्नेहभावच आपण शंकराला अर्पण करीत असतो. समुद्र मंथनानंतर बाहेर पडलेले विष शंकराने प्राशन केले आणि मनुष्य जिवाचा धोका टाळला. त्याचे हे ऋण फेडण्यासाठी श्रावण सोमवारी ही तिळाची स्नेहयुक्त शिवामूठ प्रतीक रुपाने वाहिली जाते.





# सुख शांती समाधान

## राखी केव्हा बांधावी व काढावी

**भद्रा** सहसा पौर्णिमेवर असतात आणि भद्राकाळामध्ये कोणतेही शुभ काम करणे निषिद्ध मानले जाते. गेल्या तीन वर्षांपासून, बहिणींना राखी बांधण्यासाठी रात्रीपर्यंत थांबावे लागले. पण यावेळी भद्रा ८ आणि ९ ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतर संपेल, जेणेकरून ९ ऑगस्ट रोजी राखी बांधण्यासाठी संपूर्ण दिवस शुभ असेल. ९ ऑगस्ट २०२५ दिवस,



शनिवारी शुभ वेळ सकाळी ५.४७ पासून सुरू होईल आणि दुपारी १.३० वाजेपर्यंत असेल. शास्त्रानुसार राखी बांधण्याच्या शुभ मुहूर्तावर बहिणींनी भावाला रक्षासूत्र बांधावे.

रक्षाबंधनानिमित्त प्रथम देवाला राखी बांधावी. त्यांना अक्षता आणि तांदूळ लावून टिळा लावावा. मिठाई अर्पण करावी. यानंतर भावाला राखी बांधायला सुरुवात करा. भावाच्या डोक्यावर रुमाल किंवा टोपी ठेवा. भावाला कुंकवाचा टिळा आणि अक्षदा लावा. नंतर त्याला राखी बांधा. मात्र अक्षदा लावताना तांदूळ तुटलेला नाही ना, याची काळजी घ्या.

राखी बांधताना भावाने रक्षासूत्रात ३ गाठी बांधल्या पाहिजेत. या गाठी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे प्रतीक मानले जातात. ज्योतिष शास्त्रानुसार भावाला नेहमी उजव्या हातात राखी बांधावी. उजवा हात कर्माशी संबंधित आहे. त्यामुळे या हातावर राखी बांधणे शुभ मानले जाते.

रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या भावा-बहिणींना कोणत्याही प्रकारे रागावू नका. तसेच राखी बांधताना भावाचे तोंड दक्षिण दिशेला नसावे हे लक्षात ठेवा. तसेच काळ्या रंगाचा वापर कमी करा.

भद्रा सूर्य देवाची मुलगी आणि शनी देवाची बहीण मानली जाते आणि ती पृथ्वीवर, कधीकधी स्वर्गात राहते. जेव्हा भद्रा पृथ्वीवर राहतात तेव्हा तिला अशुभ मानले जाते आणि अशावेळी राखी बांधण्यास मनाई आहे. हेच कारण आहे की, मागील वर्षांत रक्षाबंधनाच्या दिवशी भद्रादोषामुळे बहिणींना विशेष वेळ येईपर्यंत थांबावे लागले. पण यावेळी चांगली बातमी अशी आहे की, भद्रा ८ ऑगस्टच्या मध्यरात्री संपेल, जेणेकरून ९ ऑगस्ट रोजी संपूर्ण दिवस राखी बांधण्यासाठी शुभ असेल.

आपण राखी बांधतो. परंतु ती भावाने लगेच राखी काढू नये. राखी बांधण्याप्रमाणे राखी केव्हा काढावी याचेही काही नियम आहेत. ते आपण जाणून घेऊया.

राखी काढण्याच्या बाबतीत अशा कोणत्याही विशिष्ट सूचना दिलेल्या नाहीत. परंतु आपल्याला माहीत आहे की, कितीही तास झाले तरी ती बांधल्याच्या दिवशीच काढता येत नाही. महाराष्ट्राच्या संस्कृतीसारख्या काही संस्कृतींमध्ये, ते दुसऱ्या सणाच्या १५ दिवसांनी पोळा नंतर राखी काढू शकतात. राखीचा उत्सव चांगल्या आणि शुभ चिन्हाने संपवण्यासाठी हे केले जाते. हिंदू संस्कृतीनुसार, असे मानले जाते की, राखीनंतर ८ दिवसांनी, कृष्ण जन्माष्टमी साजरी केली जाते. जिथे एखादी व्यक्ती इच्छित असल्यास राखी काढू शकते.

रक्षाबंधनाच्या कथेशी जोडलेल्या देवांपैकी एक असलेल्या कृष्णाच्या जन्माचा उत्सव साजरा करणारा हा आणखी एक प्रमुख सण आहे जो राखीची शक्ती दर्शवितो. द्रौपदीने भगवान कृष्णाच्या जखमी बोटांवर तिच्या साडीचा तुकडा बांधला होता. या हृदयस्पर्शी हावभावाने प्रभावित होऊन त्याने तिला जपण्याचे आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात तिचे रक्षण करण्याचे वचन दिले.

जेव्हा कौरव दरबाराच्या मध्यभागी तिचा अपमान करत होते तेव्हा त्याने हे सिद्ध केले, त्यानेच तिला अपमानापासून वाचवले. अशाप्रकारे, आपले ऐतिहासिक महाकाव्य रक्षाबंधनाच्या प्रबळ शक्तीचे साक्षीदार आहे. म्हणूनच, त्यानंतर आणखी एक शुभ आणि महत्त्वाचा समारंभ आयोजित केला जातो. अशाप्रकारे, या दिवशी राखी काढणे अशुभ मानले जात नाही.

काही जण तर या रक्षाबंधनाला बांधलेली राखी पुढच्या रक्षाबंधनाला नवीन राखी बांधून जुनी राखी काढतात.

काढलेल्या राखीचे काय करायचे हा प्रश्न उद्भवतो. इतका पवित्र आणि दिव्य धागा दुर्लक्षित करता कामा नये. पवित्र धागा जपण्यासाठी तुम्ही काही गोष्टी करू शकता. एक मार्ग म्हणजे तो पाण्यात, तलावात किंवा नदीत विसर्जित करणे.



जर तुम्हाला ते करणे शक्य नसेल तर तुम्ही राखी कोणत्याही झाडाजवळ ठेवू शकता. पण जर तुम्हाला ती जतन करायची असेल आणि तुमच्याकडे संग्रहीत करायची असेल तर ती स्वच्छ ठिकाणी, व्यवस्थित सांभाळून ठेवावी. अशा प्रकारे, तुम्ही राखी धाग्यावरील तुमचे प्रेम प्रदर्शित करू शकाल आणि ते तुमच्या प्रेमाचे बंधन प्रदर्शित करेल.

**रक्षाबंधन हा सण भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाचे प्रतीक मानला जातो. रक्षाबंधन हा श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी श्रावण महिन्यातील पौर्णिमा ८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.१२ वाजता सुरू होते आणि ९ ऑगस्ट रोजी दुपारी १.२४ वाजता संपते. उदय तिथीनुसार, रक्षाबंधन ९ ऑगस्ट २०२५ रोजी साजरे केले जाईल. या दिवशी सूर्योदय पहाटे ५.४७ वाजता होईल. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणींनी राखी बांधताना काही खास गोष्टी लक्षात ठेवाव्यात. विशेष गोष्ट अशी आहे की, यावेळी रक्षाबंधनावर भद्राकालची कोणतीही सावली होणार नाही. म्हणजेच सकाळपासून संध्याकाळी बहिणींना त्यांच्या भावांच्या मनगटावर राखी बांधता येईल. गेल्या तीन वर्षांपासून भद्रामुळे राखी बांधण्यास उशीर झाला होता. परंतु यावेळी संपूर्ण दिवस शुभ आणि शुभ आहे.**

- रक्षाबंधनाचा सण अगदी तोंडावर आला आहे. बहिणींनीही राख्यांची खरेदी सुरु केली आहे. दरवर्षी रक्षाबंधन हा सण श्रावण पौर्णिमेला साजरा केला जातो. बहिणींनी राखी बांधताना काही उपाय केल्यास भाऊ-बहिणीचे नाते अधिक मधुर होऊन भावाची सुख-समृद्धी वाढते.
- जेव्हा एखादी बहीण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते, तेव्हा त्यापूर्वी तिने गणेशासमोर राखीचे ताट ठेवावे आणि त्यांच्या चरणी राखी अर्पण करावी. त्यानंतर भावाच्या मनगटावर राखी बांधावी. गणपतीला आद्य पूज्य देवता मानले जाते. या पद्धतीमुळे ते प्रसन्न होतात.
- दुसरा उपाय म्हणजे बहिणीने लाल कपड्यात रोळी, अक्षता आणि एक नाणे बांधून आशीर्वाद म्हणून भावाला द्यावे आणि भावाने ते बंडल आपल्या तिजोरीत ठेवावे. यामुळे भावाला कधीही आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणार नाही. भावाची प्रगती दिवसा दुप्पट आणि रात्री चौपट होईल.
- तसेच रक्षाबंधनाच्या दिवशी पंचमेवाची खीर बनवून अविवाहित मुलीला खाऊ घालावी. यामुळे घरात सुख-समृद्धी वाढेल आणि नकारात्मक ऊर्जा दूर होण्यासोबतच भाऊ-बहिणीच्या नात्यात गोडवा येईल.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# मध्य प्रदेशात सापडला सोन्याचा महाखजिना

भोपाळ

**मध्य** प्रदेशातील कटनी जिल्ह्यातील स्लीमनाबाद परिसरात सोन्याची मोठी खाण सापडली आहे. या खाणीत ३.३५ लाख टन सोन्याचा साठा सापडला आहे. भारतातील ही सर्वात मोठी सोन्याची खाण असल्याचा दावा केला जात आहे.



या सोन्याच्या खाणीमुळे मध्यप्रदेश राज्य आणि देशाचे आर्थिक चित्र बदलणार आहे. दरवर्षी येथून सुमारे ३३,२१४ टन सोन्याचे धातू आणि इतर मूलभूत धातूंचे उत्खनन केले जाईल, असे सांगण्यात येत आहे. या खाणीतून अंदाजे ३.३५ लाख टन शुद्ध सोने मिळण्याची अपेक्षा आहे. मुंबईतील प्रॉस्पेक्ट रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला या खाणीतून सोने काढण्याचे कंत्राट मिळाले आहे. मध्य प्रदेश सरकारच्या खनिज विभागाने या कंपनीला ५० वर्षांचा भाडेपट्टा दिला आहे. केंद्रीय खाण मंत्रालयाने २३ ऑगस्ट २०२३ रोजी खाणकाम योजनेला अंतिम मान्यता दिली आहे. यामुळे राज्याला मोठा महसूल तर मिळेल, शिवाय या प्रदेशात रोजगाराच्या नवीन संधीही उपलब्ध होतील. केवळ सोनेच नाही तर येथून तांबे, शिसे-जस्त आणि चांदी यांसारखी मौल्यवान खनिजेदेखील काढली जातील. यामुळे या भागातील अर्थव्यवस्थेत विविधता येईल आणि स्थानिक रहिवाशांसाठी उपजीविकेचे नवीन मार्ग खुले होतील.

# रत्नागिरीत अडीच कोटींची व्हेल माशाची उलटी जप्त

रत्नागिरी

**रत्नागिरी** पोलिसांनी काल केलेल्या एका कारवीत सुमारे अडीच कोटी रुपयांची व्हेल माशांची उलटी म्हणजेच अंबरग्रीस जप्त केली. या प्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

रत्नागिरीच्या एमआयडीसी परिसरात काल रात्री ११ वाजता ही कारवाई केली. पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचला व ही उलटी व ती विकण्याच्या तयारीत असलेल्या एजाज अहमद युसुफ मिरकर यांना ताब्यात घेतले. स्पर्म व्हेल या धोक्यात असलेल्या प्रजातीच्या माशांच्या जठरात तयार होणाऱ्या या पदार्थाला अंबरग्रीस किंवा फ्लोटिंग गोल्ड म्हटले जाते. हा मौल्यवान पदार्थ समुद्रावर तरंगतो आणि नंतर किनाऱ्यावर येतो. वन्यजीव संरक्षण अधिनियमानुसार, हा पदार्थ बाळगणे किंवा त्याची विक्री करणे हा गुन्हा आहे. जागतिक बाजारपेठेत सुगंधी द्रव्यांच्या उद्योगात सुगंध दीर्घ काळ टिकवण्यासाठी अंबरग्रीसचा उपयोग होतो.

# चिखलदऱ्यात पर्यटकांना जिप्सी चालकाकडून मारहाण

अमरावती

**विदर्भाचे** नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यात पर्यटकांची सध्या मोठ्या प्रमाणात वर्दळ आहे. याच चिखलदऱ्यातील प्रसिद्ध पंचबोल पॉईंटवर गाण्याच्या आवाजावरून पर्यटकांमध्ये वाद झाला. यात जिप्सी चालकांनी हस्तक्षेप करत काही पर्यटकांना मारहाण केली. याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

काही पर्यटक पंचबोल पॉईंटवर गाण्याचा आनंद घेत असताना गाण्याच्या आवाजावरून दुसऱ्या पर्यटकांशी वाद झाला. वाद विकोपाला गेल्यावर जिप्सी चालकांनी हस्तक्षेप करत थेट मारहाणीला सुरुवात केली. घटनेनंतरही जिप्सी चालकांचा एक गट परत एकत्र येऊन पर्यटकांचा पाठलाग करण्याच्या तयारीत होता. त्यामुळे घाबरलेल्या पर्यटकांनी झाडीत लपून आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न केला.घटनेची माहिती मिळताच चिखलदरा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पर्यटकांची सुखरूप सुटका केली.

# समाजातील सर्वांना सोबत घ्या सरन्यायाधीशांचे आवाहन

नागपूर



**स्वत:चा** विकास साधताना समाजातील मागास घटकांना सोबत घेण्याचे विचार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांनी दिले असून विद्यार्थ्यांनी त्याचा अंगीकार करावा असे आवाहन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केले. ते आज नागपूरमध्ये दीक्षाभूमी स्मारक समिती संचलीत डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवी सोहळ्यात प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

भूषण गवई म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांचा अंगीकार व त्यातून मार्गक्रमण करणे हीच डॉ. आंबेडकर महाविद्यालयासाठी आयुष्य वेचणाऱ्या व्यक्तींना आदरांजली ठरेल. १९८१ मध्ये धम्मपरिवर्तनाच्या रौप्य महोत्सवी वर्षी मुंबईहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थी नागपुरात आल्या तेव्हा येथील जनतेने उत्स्फुर्तपणे त्याचे स्वागत केले ही या शहराची सर्वधर्म समभावाची ओळख आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित शिक्षण व शिक्षणाचा दर्जा राखत डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने वंचित समाजासाठी शिक्षणाचे दार खुले केले व त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविले.

# धामणीत काजू फॅक्टरीला आग! लाखोंचे नुकसान

देवरुख

**मुंबई-गोवा** राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या धामणी येथे आज सकाळी एका काजू फॅक्टरीला आग लागली. या आगीत फॅक्टरीतील महागडी मशिनरी, काजू बिया आणि इतर साहित्य जळून पूर्णपणे खाक झाल्याने व्यावसायिक चंद्रकांत गणू भांबाडे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

चंद्रकांत भांबाडे यांच्या मालकीच्या या फॅक्टरीतून सकाळी धुराचे लोट बाहेर येऊ लागले. स्थानिकांनी आग विझवण्यासाठी धाव घेतली. मात्र आगीने रौद्ररूप धारण केल्याने त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. घटनेची माहिती मिळताच देवरुख नगरपंचायतीच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले.

# वेंगुर्ल्यात मच्छिमारांच्या जाळ्यात बंपर कोळंबी

सिंधुदुर्ग

**दरवर्षीचा** मासेमारी बंदीचा काळ संपल्यानंतर आता वेंगुर्ल्याच्या समुद्र किनारपट्टीवर उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण दिसत आहे. कारण मासेमारी हंगामाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे काल शुक्रवारी मच्छिमारांना मासळीची बंपर लॉटरी लागली. जाळ्यांमध्ये कोळंबीचा अक्षरशः खच पडल्याने दोन महिन्यांच्या प्रतिक्षेचे सोने झाले आहे. काल शुक्रवारी पहाटे अनुकूल हवामानाचा संकेत मिळताच वेंगुर्ले तालुक्यातील मच्छीमारांनी आपल्या नौका समुद्रात लोटल्या. दिवसभराच्या अथक परिश्रमानंतर सायंकाळी जेव्हा नौका मांडवी खाडीत परतल्या तेव्हा किनार्यावर एक वेगळेच आनंदी वातावरण निर्माण झाले.नौकांमधून



मासळी उतरवण्याची, ती निवडण्याची आणि शीतगृहांच्या गाड्यांमध्ये भरण्याची लगबग सुरू होती.या अनपेक्षित आणि भरघोस कोळंबीच्या उत्पादनामुळे केवळ मच्छीमारच नव्हे, तर त्यावर अवलंबून असलेले इतर व्यावसायिकही सुखावले आहेत.या बंपर सुरुवातीमुळे संपूर्ण हंगामासाठी मच्छीमारांच्या आशा उंचावल्या आहेत.ही पावस म्हणजेच पहिल्या हंगामातील मासळी मच्छीमारांसाठी शुभसंकेत ठरली आहे.

# रेड सॉईल स्टोरीज युट्युब चॅनेलच्या गवस यांचा मृत्यू

सिंधुदुर्ग

**कोकणातील** ग्रामीण जीवनाचे सौंदर्य युट्यूबवरून जगासमोर उलगडणाऱ्या रेड सॉईल स्टोरीज या युट्युब चॅनेलचे निर्माते शिरीष गवस यांचे वयाच्या ३३ व्या वर्षी निधन झाले. ब्रेन हॅमरेजमुळे त्यांच्यावर गोव्यातील रुग्णालयात उपचार सुरू होते. पण उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शिरीष मुंबईत सेल्स मॅनेजर म्हणून कार्यरत होते. पत्नी पूजा सिनेसृष्टीत काम करत होती. कोरोनात दोघांनीही सिंधुदुर्गातील गावात राहण्याचा निर्णय घेतला. गावातील जीवनशैली, तिथली खाद्यसंस्कृती, लोकांचे जीवन, त्यात येणारी आव्हाने, गमतीजमती या सर्व घटना गवस दाम्पत्याने युट्यूबच्या माध्यमातून जगासमोर आणल्या.

# कांजूरमार्गाची जमीन आता संरक्षित वन असणार नाही

## सुप्रीम कोर्टाचा मुंबई महापालिकेला दिलासा

नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने मुंबईतील कांजूरमार्ग येथील १२० हेक्टर जमीन संरक्षित वन म्हणून घोषित करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.या निर्णयामुळे मुंबई महापालिकेचा या जागेचा वापर डंपिंग ग्राऊंड म्हणून करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती के.विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने सरकारचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या युक्तिवादाची दखल घेतली.मेहता यांनी सांगितले की,ही जागा कचरा टाकण्यासाठी वापरली जात आहे.या जागेला चुकून संरक्षित वन म्हणून अधिसूचित केले गेले होते.त्यामुळेच त्या जागेची अधिसूचना रद्द करून ती डंपिंगसाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यावर सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, आम्ही उच्च न्यायालयाचा आदेश स्थगित करतो. यावेळी एका वकिलाने या आदेशाला विरोध केला,त्यावर न्यायालयाने विचारले की मग तुम्हीच सांगा एवढा कचरा आता कुठे टाकायचा?

कांजूरमार्गमधील ११९.९१ हेक्टर जमीन संरक्षित वन म्हणून काढलेली अधिसूचना नंतर राज्य सरकारने रद्द केली होती.परंतु राज्य सरकारचा हा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने २ मे रोजी रद्दबातल ठरवला होता व त्या जमिनीला पुन्हा संरक्षित वनचा दर्जा बहाल केला होता.त्यामुळे उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.या याचिकेवर ही सुनावणी झाली.

# पुणे व बीडमध्ये वर्दीची भीती नाही! सुप्रिया सुळेंची टीका

पुणे

**उद्योग** क्षेत्रात घुसलेली दादागिरी ही पुण्याच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा असल्याचे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात एका कार्यक्रमात केले होते. त्यांच्या या विधानाचा दाखला देत आज शरदचंद्र पवार गटाने महायुती सरकारवर टीका केली. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्यात पुणे, बीडसह दोन-तीन जिल्ह्यांमध्ये सातत्याने गुन्हे वाढत आहेत. पुणे आणि बीडमध्ये तर खाकी वर्दीची भीती राहिली नाही. मुख्यमंत्री काय करत आहेत?

त्या पुढे म्हणाल्या की, मुख्यमंत्री स्वतः म्हणतात की, पुण्यात दादागिरी वाढली आहे. त्यामुळे गुंतवणूक येत नाही. मग तुम्ही कारवाई का करत नाही? जबाबदारी कोणाची? मुख्यमंत्र्यांनी सांगितले पाहिजे. सत्ता आणि पैसा आल्यावर गाडी कशी चुकीच्या ट्रॅकवर जाते? लाडकी बहिण योजनेत ४९०० कोटींचा भ्रष्टाचार झाला. एवढा मोठा जनादेश मिळाल्यानंतर हे सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करत आहेत, गुन्हेगारी वाढत आहे. आणि इकडे मंत्री वाचाळपणा करण्यात व्यस्त आहेत.

मध्य रेल्वे
मुंबई विभाग
सर्व पीएमएस उपकरणांकरिता सर्वसमावेशक वार्षिक देखभाल कंत्राट (सीएएमसी)
खुली निविदा - जीईएम बोली क्रमांक - जीईएम/२०२५/बी/६५१०७५४, कामाचे नाव - मुंबई विभागामध्ये सर्व पीएमएस उपकरणे (मॉनिटर आणि कीबोर्डसह थिन क्लायंट-०६, डॉट मॅट्रिक्स प्रिंटर-०७, बारकोड प्रिंटर-०४, एचएचटी-०५, एचएचटी मिनी प्रिंटर-०५, वजन यंत्र-०५ (एलटीटी), ०१ (दादर), ०१ (पनवेल), ०१ (ठाणे) करिता सर्वसमावेशक वार्षिक देखभाल कंत्राट. कार्यालयाचा पत्ता - डीआरएम कार्यालय, वाणिज्य शाखा, मुंबई विभाग., कामाचे ठिकाण - लोकमान्य टिळक टर्मिनस, दादर, पनवेल, ठाणे, जाहिरात केलेले मूल्य - रु. १०,५१,४८८/-, निविदा प्रकार - एकल पाकीट प्रणाली, निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळ - १९.०८.२०२५ रोजी १५.०० वा. कंत्राटाचा कालावधी - दोन वर्षे (७३० दिवस), प्रस्तावाची वैधता - ६० दिवस, निविदा दस्तऐवज उपलब्ध असणारी वेबसाईट - www.gem.gov.in, संबंधित निविदेच्या संबंधातील पुढील परिशिष्ट/शुद्धीपत्रक, निविदा मागे घेणे, दिनांकामध्ये बदल, वेळ विस्तार, स्पष्टीकरण इ. जर असल्यास, फक्त वेबसाईटमध्ये उपलोड करण्यात येईल. बोलीदारांनी त्यांना अद्ययावत ठेवण्याकरिता नियमितपणे वेबसाईटला भेट द्यावी.
डीआरएम कार्यालय, वाणिज्य शाखा, मुंबई विभाग
SUN 327
टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

# गोवा समुद्रकिनारी मद्यपान केल्यास ५० हजारांचा दंड

■ पणजी



**गोव्याच्या** समुद्रकिनाऱ्यांवर फुटलेल्या मद्याच्या बाटल्यांमुळे पर्यटक जखमी होत आहेत. हा मुद्दा विधानसभेत चांगलाच गाजला. सत्ताधारी आणि विरोधी आमदारांनी या मुद्यावर पर्यटनमंत्री रोहन खंवटे यांना अनेक प्रश्न विचारले. त्यावर पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांनी जाहीर केले की, यापुढे समुद्रकिनारी मद्यपान केल्यास ५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाईल आणि ते उपद्रवी वर्तन मानले जाईल.

विधानसभा सभागृहात कळंगुटचे आमदार मायकल लोबो म्हणाले की, पर्यटक मद्यपान करत समुद्रात उतरतात, बाटल्या फोडतात. मात्र या बाटल्यांचे तुकडे इतर पर्यटकांना लागून गंभीर जखमी होतात. तर विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी प्लास्टिक व मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांनाही जबाबदार धरण्याची मागणी केली. यावर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले की, समुद्रकिनाऱ्यापासून ५० मीटर अंतरावर असलेल्या वाइन शॉपमध्ये बीअरच्या बाटल्यांऐवजी कॅन स्वरूपात ती देण्याचा विचार सुरू आहे. आमदार मायकल लोबो यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दर्शविला असून कायद्यात तशी सक्ती करता येईल का, याचा अभ्यास सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

देश विदेश

# व्हाईट हाऊसमध्ये लवकरच भव्य बॉलरूम बांधला जाणार

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** व्हाईट हाऊसमध्ये आता लवकरच भव्य बॉलरूम बांधला जाणार आहे.या बॉलरूममध्ये ६५० जण बसण्याची क्षमता असणार आहे.२०० दशलक्ष डॉलर खर्चून बांधल्या जाणाऱ्या या हॉलचे बांधकाम सप्टेंबरपासून सुरू होईल.यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि काही खाजगी देणगीदार निधी देणार आहेत. या बॉलरूमच्या बांधकामाची अधिकृत घोषणा व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी केली.बराक ओबामा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. तेव्हा ट्रम्प यांनी त्यांच्या वैयक्तिक पैशातून व्हाईट हाऊसमध्ये नवीन बॉलरूम बांधण्याची इच्छा व्यक्त केली होती.ओबामा प्रशासनाने हा प्रस्ताव गांभीर्याने घेतला नाही.आता ८ वर्षांनंतर तोच प्रस्ताव प्रत्यक्षात येणार आहे. नवीन बॉलरूम व्हाईट हाऊसच्या ईस्ट विंगजवळ बांधण्यात येणार आहे.

# ऑस्ट्रेलियात मुलांना यूट्यूब अकाऊंट बनवण्यास बंदी

■ सिडनी

**ऑस्ट्रेलियात** १६ वर्षांखालील मुलांना यूट्यूबवर अकाऊंट बनवण्यास बंदी घातली. नवा नियम १० डिसेंबर २०२५ पासून लागू होईल. ऑस्ट्रेलियात यापूर्वी फेसबुक,इन्स्टाग्राम,टिकटॉक,स्नॅपचॅट,एक्स अशा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी लागू होती. त्यामध्ये आता यूट्यूबचा समावेश झाला.यूट्यूबवर असलेल्या कीड्स ॲपला या नियमांतून सूट देण्यात आली. मुलांना सोशल मीडियाच्या घातक प्रभावापासून वाचवण्यासाठी हा निर्णय ऑस्ट्रेलियन सरकारने घेतला.अलीकडच्या एका सर्व्हेतून उघड झाले की, २६०० पैकी ४० टक्के मुलांनी यूट्यूबवर हानिकारक कंटेन्ट बघितला आहे.

# मल्याळम मिमिक्री कलाकार कलाभवन नवास यांचे निधन

■ कोची



मल्याळम चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध मिमिक्री कलाकार आणि अभिनेता कलाभवन नवास (५१) यांचे आकस्मिक निधन झाले. केरळच्या चोट्टानिकारा (एर्नाकुलम) येथील एका हॉटेलमध्ये ते बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. त्यानंतर रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले की, प्रकम्बनम या चित्रपटाचे चित्रीकरण काल सायंकाळी ५:३० वाजता संपले. तेव्हा ते पूर्णपणे स्वस्थ होते आणि दोन दिवसांची सुट्टी असल्याने घरी जाणार होते. ते हॉटेलमध्ये विश्रांतीसाठी थांबले होते. ते बराच वेळ हॉटेलमधील खोलीतून बाहेर आले नाहीत. त्यानंतर हॉटेल कर्मचाऱ्यांनी दार उघडून पाहिले असता ते बेशुद्ध अवस्थेत आढळले.

# उदयपूर फाईल्स चित्रपटासंदर्भात केंद्राच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह

■ नवी दिल्ली

**राजस्थानातील** उदयपूर येथील एका हत्याप्रकरणावर आधारित उदयपूर फाईल्स या चित्रपटातील काही प्रसंग काढून टाकण्याच्या केंद्र सरकारच्या आदेशावर दिल्ली उच्च न्यायालयाने आक्षेप घेतला असून त्यानंतर हे आदेश मागे घेण्याची भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे.

२८ जून २०२२ रोजी उदयपूर येथे कन्हैयालाल तेली या शिंप्याची हत्या करण्यात आली होती. या विषयावर तयार करण्यात आलेल्या चित्रपटातील काही दृश्यांवर केंद्र सरकारने कात्री लावण्याचे आदेश दिले. यावर दिल्ली उच्च न्यायालयाने सिनेमॅटोग्राफी कायद्याच्या कलम ६ अन्वये केंद्र सरकारला असे आदेश देण्याचा अधिकार आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. यावर केंद्र सरकारतर्फे अतिरिक्त महाधिवक्ता यांनी सांगितले की, हे आदेश परत घेतले जातील. दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय व न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या पीठाने म्हटले की, या प्रकरणी ४ ऑगस्ट रोजी सुनावणी झाल्यानंतर पुनर्परिक्षण अधिकाऱ्यांनी ६ ऑगस्टपर्यंत आवश्यक तो निर्णय घ्यावा. सुनावणीसाठी इतर पक्षकारांना उपस्थित राहण्यासाठी नोटीस पाठवण्याची गरज नाही.

# वॉलमार्ट-मॅकडोनाल्ड्सवर अमेरिकेत देशव्यापी बहिष्कार

■ वॉशिंग्टन




**अमेरिकेतील** नामवंत कंपन्या वॉलमार्ट आणि मॅकडोनाल्ड्स यांच्याविरोधात द पीपल्स युनियन यूएसए या पुरोगामी संघटनेने देशव्यापी बहिष्काराचे आवाहन केले आहे. कालपासून सुरू झालेले हे आंदोलन संपूर्ण महिनाभर चालणार असून, नागरिकांनी या कंपन्यांकडून कोणतीही खरेदी न करता स्थानिक व्यवसायांना पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या बहिष्कारामागे कामगारांचे शोषण, करचुकवेगिरी आणि सामाजिक जबाबदारीचा अभाव यासारखे मुद्दे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. वॉलमार्टवर कर्मचाऱ्यांना कमी वेतन देणे, कामाच्या ठिकाणी शोषण करणे आणि करचुकवेगिरी केल्याचे आरोप आहेत. तर मॅकडोनाल्ड्सने पगारवाढीविरोधात लॉबिंग केल्याचा तसेच त्यांच्या विविधता आणि सर्वसमावेशकता कार्यक्रमांमध्ये कपात केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संघटनेचे संस्थापक जॉन श्वार्झ हे सोशल मीडियावर विशेष सक्रिय असून, त्यांनी आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये वॉलमार्टला कॉर्पोरेट सत्तेच्या दुरुपयोगाचे प्रतीक संबोधले आहे. यापूर्वीही त्यांनी टार्गेट आणि ॲमेझॉनसारख्या मोठ्या कंपन्यांविरोधात अशाच आर्थिक बहिष्कार मोहिमा राबवण्यात आल्या होत्या. या आंदोलनामुळे अमेरिकेत कॉर्पोरेट कंपन्यांच्या कार्यपद्धतीविषयी गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

# कामा रुग्णालयात पाणीटंचाई ६० टक्के पाणीपुरवठा टँकरने

■ मुंबई

**ऐन** पावसाळ्यात सीएसएमटी येथील मुंबई महापालिका मुख्यालयाजवळ असलेल्या कामा रुग्णालयात सध्या पाणीटंचाई जाणवत आहे.या रुग्णालयाच्या पाण्याच्या टाकीत केवळ ४० टक्केच पाणी जमा होत आहे. त्यामुळे उर्वरित ६० टक्के पाणी टँकरच्या माध्यमातून मागविले जात आहे. या रुग्णालयाच्या पाण्याच्या जलवाहिनीतील बिघाडामुळे यापूर्वीही पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. त्यामुळे रुग्णालयाच्या सर्व इमारतींमधील पालिकेच्या मुख्य जलवाहिनीमधून येणारे सर्व पाइप बदलण्यात आले होते. त्यानंतर काही दिवस पाण्याचा पुरवठा सुरळीत झाला, पण गेल्या महिनाभरापासून पुन्हा पाणीपुरवठा आणि दाब कमी झाल्याचे कर्मचारी आणि रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. रुग्णालयात एकूण सहा इमारती आहेत.

# लालबाग-परळमध्ये गणरायाचे आगमन! पोलिसांची बैठक

■ मुंबई

गणेशोत्सवापूर्वी उंच मूर्तीचे आगमन जास्तीतजास्त लालबाग तसेच परळ या विभागातून होणार आहे. विशेष म्हणजे गणेशाचे आगमन जास्तीतजास्त मंडळाने सुट्टीच्या दिवशी शनिवार व रविवारी करावे जेणेकरून वाहतुकीला अडथळे होणार नाहीत. त्याचप्रमाणे आगमन मिरवणूक व्यवस्थित पार पडण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना कराव्या लागतील याबाबत भोईवाडा तसेच



काळाचौकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच पालिका अधिकारी व वाहतूक विभागाचे अधिकारी यांच्यासमवेत बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे पदाधिकारी व आसपास गणेश मंडळासोबत १ ऑगस्ट रोजी सायंकाळी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत आगमन रस्त्यावरील वाढलेल्या झाडांच्या फांद्या तसेच सिग्नल यांचा अडथळा येऊ नये याबाबत उपाययोजना करण्यात येणार आहे. गणेश मंडळाने पोलीस विभाग, वाहतूक विभागाला सहकार्य देण्याचे आवाहन करण्यात आले.

# पावसाळा हंगामात यंदा कोयनेचे दरवाजे दुसऱ्यांदा बंद

■ कराड

**सातारा** जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर कमी झाला आहे. त्यामुळे पाटण तालुक्यातील कोयना धरणाचे सर्व सहा वक्री दरवाजे यंदाच्या पावसाळ्यात दुसऱ्यांदा बंद करण्यात आले आहेत. काल शुक्रवारी सकाळच्या सुमारास कोयना धरणात १६ हजार क्युसेक वेगाने पाणी येत होते, तर धरणातील पाणीसाठा ८६.१९ टीएमसी झाला होता. कोयनेचे दरवाजे बंद केले असले तरी हे धरण भरण्यासाठी अजून १९ टीएमसी पाण्याची गरज आहे. कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सहा वक्री दरवाजे पहिल्यांदा उघडले होते.त्यानंतर काही दिवसांपूर्वीच हे दरवाजे दुसऱ्यांदा उघडून आता बंद करण्यात आले आहेत. सध्या जिल्ह्यातील प्रमुख सहा धरणांमधून १७ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. जिल्ह्यात मागील दोन महिन्यांपासून पाऊस सुरू आहे, पण जून महिन्याच्या मध्यानंतर खऱ्या अर्थाने पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर मागील दीड महिना पाऊस पडत आहे. यामध्ये जुलै महिन्याच्या मध्यावर पावसाचा जोर पूर्णपणे कमी झाला होता. पश्चिम भागातील कास, तापोळा, बामणोली, कोयना, नवजा आणि महाबळेश्वर परिसरातच थोडाफार पाऊस झाला. त्यानंतर जुलैच्या उत्तरार्धात चांगला पाऊस पडला.

# मुंबई महापालिकेकडून मूर्तिकारांना मोफत रंग

■ मुंबई

**यंदा** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मुंबई महापालिकेकडून मूर्तिकारांना मोफत शाडूची माती आणि गणेश कार्यशाळेच्या मूर्ती घडविण्यासाठी मोफत जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यानंतर आता मूर्तिकारांना मोफत पर्यावरणपूरक रंगही पालिकेच्या वतीने पुरवण्यात येणार आहेत. प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबविला जाणार आहे. मुंबई महापालिका मूर्तिकारांना पांढरा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा आणि लाल असे ७ हजार ८०० लिटर पर्यावरणपूरक रंग आणि तीन हजार लिटर इको प्रायमर रंग मोफत देणार आहे. मूर्तिकारांनी या रंगांचा वापर करून गणेशमूर्ती रंगवाव्यात, असे आवाहन पालिकेने केले आहे. यामध्ये इतर रंगांच्या तुलनेत पांढरा रंग मोठ्या प्रमाणात पुरविण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक पांढरा प्रायमरही देण्यात येणार आहे. जलप्रदूषण कमी करणे हा त्यामागील उद्देश आहे. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या निर्देशानुसार प्रशासनाकडून निरनिराळ्या नागरी सेवासुविधा पुरविल्या जात आहेत. मुंबई शहरात शाडू मातीच्या मूर्ती घडविण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, जास्तीत जास्त पर्यावरणपूरक मूर्तींची प्रतिष्ठापना व्हावी, यासाठी पालिकेकडून मूर्तिकारांना याआधी मोफत शाडू माती दिली आहे.

# काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्या विरोधात शिंदे गटाचे मुंबई आणि ठाण्यात आंदोलन

■ मुंबई

शिंदे गटाने आज काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्या विरोधात मुंबई व ठाणे परिसरात तीव्र आंदोलन केले. २००८ मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व आरोपी न्यायालयाने निर्दोष सोडले. त्यानंतर चव्हाण आणि इतर काँग्रेस नेते सनातन दहशतवाद, हिंदू दहशतवाद अशी वक्तव्ये करून हिंदूंना बदनाम करत आहेत, असा आरोप शिंदे गटाने करत. टिळक भवन येथील काँग्रेस कार्यालयासमोर आंदोलन केले. शिंदेच्या महिला आघाडीने पृथ्वीराज चव्हाण, राहुल गांधी यांनी हिंदूंची माफी मागावी या मागणीसाठी ठिय्या मांडला.यावेळी कार्यकर्त्यांनी काँग्रेसची विचारधारा ही तुष्टीकरण आहे,काँग्रेस नेत्यांनी हिंदूंना बदनाम करण्याचे काम केले अशी घोषणाबाजी करत पृथ्वीराज चव्हाण, राहुल गांधी, सुशीलकुमार शिंदे यांनी हिंदूंची माफी मागावी, अशी मागणी केली. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, ज्यांनी माझे वक्तव्य नीट ऐकले नाही तेच लोक आंदोलन करत आहेत. तेही फक्त एका पक्षाचेच लोक आहेत. माझे कालचे निवेदन आजही आणि उद्याही तसेच राहील.



२ आठवड्यांवर आलेल्या दहीहंडी उत्सवासाठी धारावीतील कुंभारवाड्यात रंगीबेरंगी मटकी विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

# निवडणूक आयोग अधिकाऱ्यांच्या मानधनामध्ये दुपटीने वाढ

■ नवी दिल्ली

केंद्रीय निवडणूक आयोगाने केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या (बीएलओ) मानधनात दुपटीने वाढ केली आहे. यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रसिद्धी पत्रक जारी केले आहे. या पत्रकात नमूद केले आहे की, निवडणूक नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी, बीएलओ पर्यवेक्षक आणि बीएलओ यांचा समावेश असलेली निवडणूक यंत्रणा मतदार याद्या खूप मेहनतीने तयार करते. ते निष्पक्ष आणि पारदर्शक मतदार याद्या तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. यामुळे निवडणूक आयोगाने बीएलओंचे वार्षिक मानधन दुपटीने वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. मतदार यादी तयार करून त्यात सुधारणा करणाऱ्या बीएलओ पर्यवेक्षकांच्या मानधनातही वाढ केली आहे. याआधी त्यांचे मानधन २०१५ मध्ये वाढवले होते. आता ईआरओ आणि एईआरओ यांना पहिल्यांदाच मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे.

# कोल्हापुरी चप्पलला 'जीआय टॅग' स्वामित्व दोन महामंडळांकडे

■ मुंबई

कोल्हापूर शहराच्या प्रमुख आकर्षणापैकी एक असलेली कोल्हापुरी चप्पल सध्या चर्चेत आहे.याच महाराष्ट्र व कर्नाटकातील पारंपरिक आणि ऐतिहासिक पादत्राणास जीआय टॅग म्हणजेच भौगोलिक संकेतचिन्ह मिळाले आहे.या जीआय टॅगचे अधिकृत नोंदणीकृत स्वामित्व संत रोहिदास लेदर इंडस्ट्रीज ॲण्ड चर्मकार डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड आणि डॉ.बाबू जगजीवनराम लेदर इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या दोन महामंडळाकडेच आहे,असे या दोन्ही महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी स्पष्ट केले आहे. दोन महिन्यापूर्वी इटलीच्या प्रसिद्ध



'प्राडा' कंपनीने एका फॅशन शोमध्ये कोल्हापुरी चप्पल झळकावली होती. एका मॉडेलने परिधान केलेल्या लेदर सँडल्सचे डिझाईन हुबेहुब महाराष्ट्रातील पारंपरिक आणि जीआय नोंदणीकृत कोल्हापुरी चप्पलप्रमाणे होते.या घटनेनंतर सोशल मीडिया आणि कोल्हापुरातील कारागिरांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या.त्यानंतर वकिलांच्या एका गटाने 'जीआय टॅग' अर्थात भौगोलिक संकेतचिन्हाने संरक्षित असलेल्या कोल्हापुरी चपलेसारखे डिझाईन वापरून कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल प्राडाला आव्हान देणारी एक जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावेळी खंडपीठाने ही जनहित याचिका फेटाळून लावताना असा निर्णय दिला की, अशा बाबींसाठी फक्त कोल्हापुरी चपलेच्या 'जीआय टॅग' चे नोंदणीकृत धारक म्हणजेच महाराष्ट्र आणि कर्नाटक चर्मोद्योग विकास महामंडळे ही प्रत्यक्ष भागधारक असल्याने त्यांनाच अशा प्रकारची दिवाणी कारवाई करण्याचा कायदेशीर अधिकार आहे.या पार्श्वभूमीवर, लिडकॉम आणि लिडकर या महामंडळाने कोल्हापुरी ग्लोबल जीआय टॅगच्या अधिकृत नोंदणीकृत मालक आहे.

# पुण्याच्या खोराड वस्तीमध्ये पुन्हा गाड्यांची तोडफोड

■ पुणे

**पुण्यातील** हिंगणे भागातील खोराड वस्ती परिसरात काल रात्री पुन्हा गाड्यांची तोडफोड करत टोळक्याने दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रात्री सव्वाआठ ते साडेआठच्या दरम्यान म्हसोबा मंदिर परिसरातून आलेल्या १५ ते २० तरुणांच्या टोळक्याने परिसरातील ८ ते १० दुचाकी आणि रिक्षांची तोडफोड केली. या टोळक्याच्या हातात कोयते आणि लोखंडी गज होते. या टोळीने तोडफोड करत स्थानिक नागरिकांनाही धमकावले. या आधीही खोराड वस्तीमध्ये अशाच प्रकारच्या तोडफोडीच्या घटना घडल्या आहेत. मध्यंतरी कोयता गँगच्या सक्रियतेनेही येथे दहशत निर्माण झाली होती. परिसरात दोन गटांतील वादाचे पडसाद सामान्य नागरिकांवर उमटत आहेत.



# दशावतारी नाट्य कलावंताचा विजेचा शॉक लागून मृत्यू

■ कणकवली

**सिंधुदुर्गातील** दशावतारी लोककलेतील प्रख्यात कलावंत, प्रसिद्ध स्त्रीपात्र कलाकार प्रशांत रामचंद्र मेस्त्री यांचा विजेचा शॉक लागून राहत्या घरी मृत्यू झाला. ते ४९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने हरकुळखुर्द गावासह जिल्हयातील दशावतारी कला क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.तालुक्यातील हरकुळखुर्द सुतारवाडी येथील प्रशांत मेस्त्री हे गाडी वॉशिंग करण्याची इलेक्ट्रिक मशिन, वायर लावून तपासणी करत होते. त्यावेळी त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. त्यात ते जागीच गतप्राण झाले. त्यांच्या निधनाने हरकुळखुर्द गावासह जिल्हयातील दशावतारी कलाक्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. प्रशांत मेस्त्री हे दशावतार नाट्यकलेतील प्रसिध्द नाव होते. ते एक उत्कृष्ट स्त्री पार्ट साकारणारे कलाकार म्हणून जिल्हयात ओळखले जात. त्यांच्या द्रौपदी वस्त्रहरण, महारथी कर्ण, सौभद्र, स्वामी समर्थ आदी दशावतार नाट्य प्रयोगातील भूमिका अजरामर झाल्या आहेत.

# धोम गावातील ग्रामस्थांचा सामूहिक आत्मदहनाचा इशारा

■ सातारा


वाई तालुक्यातील धोम गावच्या बौद्धवस्तीत समाज मंदिर उभारण्यासाठी आणि सरपंचांवर निलंबन कारवाई करावी,या मागणीसाठी या बौद्ध वस्तीतील लोकांनी १५ ऑगस्ट रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. धोम गावातील या बौद्ध वस्तीत समाज मंदिर उभारण्यासाठी शासनाकडून निधी मंजूर झाला आहे. या समाज मंदिराच्या नियोजित जागेची पाहणी करून प्राथमिक आराखडाही तयार केला आहे. परंतु सरपंच अधिकाऱ्यांना चुकीची माहिती पुरवून या कामात अडथळा निर्माण करत असल्याचा आरोप लोकांनी केला. त्यामुळे या सरपंचावर निलंबन कारवाई करावी. समाज मंदिराचे काम तत्काळ सुरू करावे.या मागणी बौद्ध वस्तीतील लोकांनी केली आहे.

# कबुतरखाना तोडक कारवाईला स्थानिकांचा तीव्र विरोध

■ मुंबई

**दादर** येथील जुन्या कबुतरखान्यावर तोडक कारवाई करण्यासाठी काल रात्री मुंबई महानगरपालिकेचे पथक दाखल झाले होते. परंतु स्थानिक नागरिकांनी या कारवाईला तीव्र विरोध केल्यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी याठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात केला. पण अखेर ही कारवाई सध्या लांबणीवर ढकलली आहे. दादर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेल्या या कबुतरखान्याविरोधात काही महिन्यांपासून नागरिक आणि मनसेकडून आवाज उठवत आहेत. कबुतरांची विष्ठा आणि पिसांमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर श्वसनविकार, ॲलर्जी व इतर आरोग्य समस्या निर्माण होत आहे. याशिवाय, हा कबुतरखाना रस्त्याच्या मध्यभागी असल्यामुळे वाहतुकीलाही अडथळा होत असल्याच्या तक्रारीत वाढ झाली होती. १९३३ मध्ये हा कबुतरखाना पाण्याचा कारंजा म्हणून बांधला होता. नंतर तेथे कबुतरांना दाणे टाकण्याची परंपरा सुरु झाली. हळूहळू त्याचे कबुतरखान्यात रुपांतर झाले. सद्यस्थितीत या जागेवर कबुतरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नागरिकांच्या तक्रारीनंतर मनसेने २०१७ पासून आंदोलने सुरु केली होती. कबुतराना दाणे खाऊ घालू नये या न्यायालयाच्या आदेशानंतर माहीम पोलीस ठाण्यात या प्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३३१



**आडवे शब्द –**

२. भाळ, ललाट ४. रव्याचा नाश्त्यातील पदार्थ ७. मोठा आर्थिक व्यवहार १२. स्पर्शाने लोखंडाचे सोने करणारा मणी १४. सात सुरातील दुसरा १६. सवडीनुसार १८. धुमाकूळ २०. विशिष्ट प्रसंग वा व्यक्तीच्या आठवणीप्रीत्यर्थ प्रकाशित पुस्तिका २३. निश्चय, प्रतिज्ञा २४. समजूत काढणे २७. दहशत २९. प्रभात ३०. टोचणी, शल्य ३१. मालिका, हार ३३. निर्मिती ३४. चारचाकी दणकट वाहन ३६. बीमोड ३७. इच्छापूर्तीसाठी देवाला साकडे ३८. घसा व जठर यांच्यामधील अवयव ४२. मंदिराचा मुख्य भाग ४३. आदला दिवस ४४. जिवलग मित्र ४५. दागिने गाठवण्याचे काम करणारा ४७. भरतीची वेळ ४९. जवळच्या व्यक्तीशी गप्पा ५०. डोंगर ५१. चारशे ऐंशी कागद ५२. आवेश, जोश ५४. बिछायत ५६. पूर्वग्रह, प्रतिकूल मत ५७. पूल ५९. तोरा, दिमाख ६०. राजा ६१. उपवासाला चालणारा लोकप्रिय कंद ६३. गरीबी ६५. मुक्काम ६७. शरीर ६९. महान ७०. अर्धी ओंजळ ७२. बेडूक ७४. विडा रंगवणारा घटक ७५. मृतदेह ७६. साडीचे टोक ७७. विनंती ७९. उतरती कळा ८०. या एकादशीनंतर चातुर्मास सुरू होतो. ८१. वसाहत ८२. भेकड ८३. मनाचा झुकाव ८४. फिकीर ८६. लवकर न शिजणारी तूरडाळ ८८. प्राण ९०. सारखेपणा, साम्य ९४. पतंगाचा धारदार दोरा ९५. बलशाली ९७. सलगीचे नाते ९९. सातत्याने होणारी तीव्र वेदना १०१. वरिष्ठांच्या बोलण्यावर विचार न करता मान डोलावणारा १०३. दोस्त १०४. कपी १०५. टेकडीचा, डोंगराचा उतार १०७. मतैक्य १०९. झाडाचे पान ११०. गणती १११. अस्थी ११२. गीत ११३. पोपट ११४. हिमालयात उगम पावून म्यानमारमध्ये जाणारी नदी ११५. पराक्रमी ११६. समुद्राच्या पोटातील अग्नी

**उभे शब्द –**

१. अत्यंत क्षुद्र २. लक्ष्मी ३. जल ५. टापू, प्रदेश ६. उडीद ८. कंटाळवाणी हकीकत, चऱ्हाट ९. शेवट, अंत १०. मराठी पाचवा महिना ११. देशातील सद्यस्थिती १३. तरुण बैल, गोऱ्हा १५. राख १७. तळहाताचा हलका प्रहार १८. क्षालन १९. गुपित २१. जीभ, जिव्हा २२. चिंता २५. कपाळभर लावलेले कुंकू २६. बातमी, पोलिसाचा गणवेष २८. फणसाचा प्रकार ३०. डोंगरमाथ्यावरील सपाट जमीन ३२. वेगळे, अलग ३५. वेतनावर नेमलेला ३६. सामान्य तपमानाला द्रवरूप असणारा एकमेव धातू ३८. पावा, बासरी ३९. रक्तवाहिनी ४०. लेखी करार ४१. कर्नाटक व तामिळनाडूमधील मोठी नदी ४३. विडा रंगवणारा घटक ४५. सर्दी ४६. दुर्बळ ४७. एक शिकारी पक्षी ४८. तिखट-मिठाचा रव्याचा पदार्थ ४९. कृपण, कंजूष ५३. विष्णूचा एक अवतार, सूकर ५५. बळजबरी ५६. इतर, बाकीचे ५८. घृत ६२. घोड्याचे पाऊल ६४. चषक ६६. दरोडेखोर ६७. निधन ६८. पृथ्वी, भूमी ६९. अडवणे, रोखणे ७१. अंगावर काटे असलेला प्राणी ७३. तबला वाजवणारा ७५. निद्रा ७८. तळहाताचा प्रहार ८२. प्रौढी, बढाई ८५. खाण्यासाठी पकडलेले मासे ८६. वैदिक विवाहविधीतील साळीच्या लाह्यांचा होम ८७. परिसर, अंगण ८९. जड ९१. मणक्याचे खालचे हाड ९२. रगेल, तडजोड न करणारा ९३. जखमी कुत्र्याचे ओरडणे ९५. कब्जा ९६. दयेचा सागर, देव ९८. वर देणारी देवता १००. आश्रय १०२. संन्यासी १०४. उचित १०६. पाणी पिण्याचा लोटा १०८. श्वसनासाठी आवश्यक गोष्ट १०९. वाणीच्या चार अवस्थांपैकी पहिली ११२. कपोल

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३०चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. सांबर ४. विधू ५. महसूल ८. वराह १०. नृत्यांगना ११. मत्त १२. मंगळ १३. केरसुणी १५. तावदान १६. जडजवाहीर १८. मवसर २१. मुक्ताबाई २२. मोती २३. भाक २४. पर्वत २६. खरा २७. पेन २९. टाहो ३१. सुमन ३३. दमदाटी ३५. वक्ष ३६. रमारम ३९. दवा ४१. वारी ४२. पथ ४३. मदार ४४. धुरा ४५. पूतना ४७. घायाळ ४९. सटरफटर ५०. नाक ५१. विडी ५२. भुमका ५३. इमारत ५५. जनक ५७. जोकर ५९. तर्क ६१. खोपा ६२. मदतनीस ६३. सरबराई ६४. मेनका ६६. सकल ६८. दीड ७१. यदुनाथ ७२. नारद ७४. मरकत ७६. तास ७७. द्रुम ७८. नवल ८०. वासरू ८२. टरकलेला ८४. ज्योत ८५. तंटा ८९. कडवा ९०. खंबीर ९१. धराशायी ९२. कालवश ९४. रया ९६. व्रत ९७. गजरा १०१. ब्रिज १०२. अटन १०३. बुरसटलेला १०३. मानभावी

**उभे शब्द** : १. अनृत २. सांगता ३. बनावट ४. वित्त ५. महसूल ६. हळवा ७. लकेर ८. वसुमती ९. राणीव ११. मनमुराद १२. मंडई १४. वरकड १६. जबाबदारी १७. हीर १९. सभा २०. पूर्वसुकृत २२. मोहोरदार २५. तम २८. नवथर ३०. डौर ३२. नद ३४. मवाळ ३७. मार ३८. मधुकर ४०. वाघा ४२. पटका ४३. मटकी ४५. पूर्वज ४६. नाविक ४८. यात्रिक ४९. समजूतदार ५०. नामानिराळा ५४. तनू ५६. नमन ५७. जोपासना ५८. रमल ५९. तसदी ६०. सरसकट ६४. मेणा ६५. कायम ६७. कथन ६९. डमरू ७०. मासला ७२. नाल ७३. दवा ७५. तरकश ७६. तालेवार ७७. द्रुत ७९. वसुंधरा ८१. सट ८३. कड ८४. ज्योत्स्ना ८५. तंबी ८६. टारगट ८७. निशाचर ८८. वेल ९०. खंत ९३. वस्त्र ९५. यादवी ९६. व्रज ९८. जन ९९. ताट १००. ऊन

## मेष

**आठवड्याचा** प्रारंभ फारसा सकारात्मक नाही. उत्तरार्धात मात्र कष्टाचे फळ मिळेल. संघर्षाची तयारी ठेवा. निराश न होता प्रयत्न करणे फायद्याचे ठरेल. भाग्याची साथ असल्यामुळे अडथळे व हितशत्रूंवर मात कराल. आर्थिक स्थिती चांगली होणार असली तरी विनाकारण खर्च वाढणार आहे. अनपेक्षित लाभही होऊ शकतो. कुटुंबासाठी पुढाकार घेऊन काही गोष्टी कराव्या लागतील. प्रसंगी कठोर निर्णय आवश्यक ठरतील. वादविवादाचे प्रसंग येतील. कार्यक्षेत्र व कुटुंबासाठी वेळ देताना तारांबळ उडेल. जोडीदाराची साथ मिळेल. मात्र संततीकडून फार अपेक्षा ठेवू नये.

नोकरदारांनी विनाकारण वादात अडकू नये. वरिष्ठांची साथ मिळणार नाही. अतिउत्साह किंवा कंटाळा दोन्हीही त्रासदायक ठरेल. व्यावसायिकांना नवीन संधीचा लाभ घेता येईल. नियमाविरुद्ध वागू नका. कायदेशीर प्रकरण, कर्जप्रकरण या संबंधित गोष्टी थोड्या अडथळ्याने पण पुढे सरकतील. भागीदारीतील व्यवसायात फायदा होईल. सेवा क्षेत्र, तंत्रज्ञ, वकील, व्यापारी, इव्हेंट मॅनेजमेंट, मास मीडिया, वैद्यकीय व्यवसाय यामध्ये यश मिळू शकते.

पोटाचे विकार, अस्थिरोग, उष्णतेचे विकार, पित्तविकार, मधुमेह, पाठदुखी यापासून जपावे.

**शुभ दिनांक :** ७, ८, ९.

## वृषभ

**आठवड्याची** सुरुवात चांगली होणार आहे. महत्त्वाची कामे प्रारंभीच करा. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामासंबंधी योजना गुप्त ठेवा. प्रवास करताना काळजी घ्या. नव्या व्यवहाराबाबत सावधगिरीचा पवित्रा ठेवा. कुठलेही काम अर्धवट सोडू नका. गरज पडली तर नव्याने सुरुवात करा. यश नक्की येईल. कुटुंबामध्ये थोडे अलिप्त धोरण ठेवून परिस्थितीचे अवलोकन करा. व्यावहारिक व कठोर निर्णय कुटुंबासाठीच हिताचे ठरतील. मुले व जोडीदाराशी सुसंवाद ठेवा. मातेच्या आरोग्याची चिंता राहील. वडिलोपार्जित मालमत्तेसंबंधी प्रश्न मार्गी लागेल.

नोकरदारांनी स्वतःची मते ठामपणे परंतु योग्य शब्दात मांडावीत. आळशीपणा उपयोगी नाही. गरज पडल्यास मदत घेऊन काम वेळेत पूर्ण करा. व्यावसायिकांना कामाचा मोबदला मिळेल. नवीन गुंतवणूक करताना मात्र फसवणूक होऊ शकते. भागीदारीतील व्यवसायात मतभेदाची शक्यता. खाद्यपदार्थ, इव्हेंट मॅनेजमेंट, व्यवस्थापन, खेळाडू, कलाकार, राजकारण, कायदा या संबंधित क्षेत्रामध्ये यश मिळू शकते.

मधुमेह, हवाबदल व खाण्यातील बदलामुळे होणारे आजार, लवकर थकवा येणे, मानसिक तणाव, रक्तदाब, कानाची दुखणी यासारख्या तक्रारी राहतील.

**शुभ दिनांक :** ४, ५, ९.

## मिथुन

**आठवड्याच्या** सुरुवातीला महत्त्वाची कामे करून घ्या. राशीस्वामी बुध वक्री आहे. वाणीवर नियंत्रण ठेवा. वाद होणार नाहीत याकडे लक्ष ठेवा. लोकांचे म्हणणे नीट ऐकून घ्या. प्रश्न सोडवण्याच्या नादात स्वतःसाठी समस्या निर्माण करू नका. आर्थिक स्थिती साधारण राहील. आर्थिक नियोजन गरजेचे आहे. मोठी गुंतवणूक पुढे ढकला. घरातील जबाबदाऱ्या वाढणार आहेत. निर्णय घेताना गोंधळ होऊ शकतो. ज्येष्ठांचा सल्ला उपयोगी पडेल. अहंकार बाजूला ठेवा. नवीन नात्याची सुरुवात होऊ शकते. मित्र, भावंडे यांच्याशी गैरसमज होऊ देऊ नका. कुटुंबासाठी खर्चात वाढ होईल. वडिलांच्या तब्येतीची काळजी घ्या.

नोकरदारांनी कामामध्ये कमी पडू नये. व्यावसायिकांनी कामे वेळच्यावेळी होतील याकडे लक्ष द्यावे. संयम आवश्यक आहे. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. तुलनात्मक चिकित्सा करूनच निर्णय घ्या. कामाची गती मंदावेल. कला, खेळ, संशोधन शैक्षणिक क्षेत्र, सीए, स्टॉक मार्केट, व्यवस्थापन, मार्केटिंग, तंत्रज्ञ, सेवाक्षेत्रासाठी चांगला काळ आहे.

नेत्रविकार, वाचाविकार, अपचन, पित्तविकार, पायांची दुखणी, मूत्रविकार, छातीत कफ होणे, अनुवंशिक आजार, मानसिक चिंता याकडे वेळीच लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** ३, ४, ६, ७.

## कर्क

**आठवड्याची** सुरुवात मनासारखी नसली तरी नंतर सुधारणा होणार आहे. कामाची गती मंद असली तरीही कामे पूर्ण होतील. नेटाने प्रयत्न चालू ठेवा. आत्मविश्वास चांगला ठेवा. भावना व व्यवहार यामध्ये समन्वय साधा. स्वतःला कमी लेखू नका. वेळेत निर्णय घेऊन लवकर कृती करा. खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे. घरापासून लांब गेलात तरी जबाबदारी टाळता येणार नाही. बुद्धीचातुर्याने प्रश्न मार्गी लावा. जोडीदाराच्या मताचा सन्मान करा. नवीन घर घ्यायचे असल्यास योग्य काळ आहे. जमिनीबाबतचे व्यवहार मात्र पुढे ढकला. मित्र, भावंडे यांचे सहकार्य गृहीत धरू नका. मुलांबरोबर दुरावा येणार नाही याची काळजी घ्या.

नोकरदारांनी आपले दैनंदिन काम चोख करावे. व्यावसायिकांना स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. नवीन व्यवहार करताना अडचणींचा सामना करावा लागला तरी त्यातून फायदा होणार आहे. कमिशन एजंट, व्यवस्थापन, खेळ, कला, आर्थिक क्षेत्र, वैद्यकीय व्यवसाय, खाद्यव्यवसाय, तंत्रज्ञ, शैक्षणिक क्षेत्रामध्ये यश मिळू शकते

पित्तविकार, खाण्यातून ॲलर्जी, दुखापत, कफविकार, रक्तदाब, पायांची दुखणी, डोकेदुखीपासून सांभाळा.

**शुभ दिनांक :** ६, ७, ८, ९.

## सिंह

**आठवड्याचा** उत्तरार्ध चांगला आहे. कुठलीही भीती, शंका बाळगू नका. अति स्पष्ट बोलण्यावर नियंत्रण ठेवा. आजूबाजूच्या परिस्थितीचा, व्यक्तींचा तुमच्यावर नकारात्मक परिणाम होऊ देऊ नका. काम वेळेत पूर्ण झाले नाही तरीही अर्धवट सोडू नका, संयम ठेवा. आर्थिक परिस्थिती साधारण राहील. मोठी गुंतवणूक पुढे ढकला. दैनंदिन कामकाज काटेकोरपणे करत राहा.

कुटुंबामध्ये थोडा दुरावा जाणवेल. वडिलोपार्जित संपत्तीमुळे वाद होऊ शकतो. स्वतःसह कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घ्या. संततीसाठी चांगला काळ. जोडीदारावर मत लादू नका. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. मित्रांबरोबर आनंदात वेळ घालवाल, पण त्यामुळे खर्चात वाढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

आठवड्याच्या उत्तरार्धात स्पर्धकांवर, हितशत्रूंवर नियंत्रण ठेवता येईल. नोकरदारांनी अहंकार बाजूला ठेवावा. नियमाप्रमाणे काम करा. नोकरीत बदल करायचा असल्यास प्रयत्न चालू करा. व्यावसायिकांनी नवीन संधीचा लाभ घ्यावा. सध्या मनाविरुद्ध काम करावे लागेल. प्रवासातून फायदा होईल. सरकारी क्षेत्र, कला, शिक्षण, खाद्यपदार्थ, आर्थिक क्षेत्र, तंत्रज्ञ, मास मीडिया, वैद्यकीय व्यवसायासाठी चांगला काळ आहे.

नेत्रविकार, त्वचाविकार, वातविकार, संधिवात, सर्दी-कफ यासारख्या आरोग्याच्या तक्रारी राहतील. मानसिक आरोग्य सांभाळा.

**शुभ दिनांक :** ७, ८, ९.

## कन्या

**आठवड्याचा** प्रारंभ चांगला आहे. महत्त्वाची कामे सुरुवातीलाच करून घ्या. द्विधा मनस्थिती निर्णय घेण्यात अडथळे निर्माण करेल. अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला विचारात घ्या. जिद्द कायम ठेवा. मात्र हट्टीपणा नको. एखादे काम परिपूर्ण करण्याच्या नादात इतर कामांकडे दुर्लक्ष होऊ शकते. एका वेळेस अनेक ठिकाणी लक्ष द्यावे लागणार आहे. आर्थिक स्थिती सुधारेल. मात्र गुंतवणुकीचे निर्णय भावनेच्या भरात घेऊ नका. कामामध्ये चालढकल नको. कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. धार्मिक कार्य कराल. जोडीदार व संततीशी सुसंवाद ठेवा.

नोकरदारांनी स्पर्धक, हितशत्रू ओळखावे. जशास तसे वागणे योग्य ठरेल. व्यावसायिकांना अपेक्षित जुने येणे वसूल करता येईल. भागीदारीत व्यवसाय असल्यास सावधगिरीने निर्णय घ्यावा. अतिउत्साह घातक ठरेल. खाद्यपदार्थ, घाऊक व्यापारी, कापड व्यापारी, मास मीडिया, जाहिरात, शिक्षण, आर्थिक, सरकारी व धार्मिक क्षेत्र, कायदा विभाग, संशोधन क्षेत्राशी संबंधित कार्य असणाऱ्यांसाठी चांगला काळ आहे.

कुठल्याही आजाराचे योग्य निदान होईल याची काळजी घ्या. पित्त, पायाचे दुखणे, ॲलर्जी, थकवा, सर्दी, कफ, मणक्याचे विकार यापासून जपा.

**शुभ दिनांक :** ३, ४, ९.




**रविवार ३ ऑगस्ट २०२५ ते शनिवार ९ ऑगस्ट २०२५**

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे.**

## तूळ

**आठवड्याच्या** मध्यावर महत्त्वाची कामे करा. सुरुवातीला व शेवटी आत्मविश्वास कमी झाल्यासारखा वाटेल. मनामध्ये भीती राहील. आर्थिक नियोजन करण्यासाठी अनुभवी लोकांचा सल्ला घ्या. भाग्याची साथ आहे, कामामध्ये चालढकल नको. नियोजन करून एकदा निर्णय झाला की, त्यावर ठाम राहा. कामामध्ये सातत्य गरजेचे राहील. आरोग्याकडे लक्ष द्या. कुटुंबामधील वातावरण सर्वसाधारण राहील. एकत्रित व्यवसाय असल्यास यश मिळेल. जोडीदार व तुम्हाला एकमेकांसाठी वेळ देता येणार नाही. आपापल्या कामांमध्ये व्यस्त राहाल. संततीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करू नका. भावंडाशी सुसंवाद राखा. मित्रांकडून फार अपेक्षा ठेवू नका.

नोकरदारांनी संयम राखणे आवश्यक राहील. अति घाई, वाद टाळा. नोकरदार व व्यावसायिकांनी परिस्थितीनुसार कार्यशैलीत बदल करणे योग्य ठरेल. अहंकार बाजूला ठेवा. जबाबदारीत वाढ होईल. आजूबाजूला योग्य व्यक्तीच राहतील याची काळजी घ्या. नवीन संधी पूर्ण खात्री झाल्याशिवाय स्वीकारू नये. सरकारी, सामाजिक, सेवा व धार्मिक क्षेत्र, कला, खेळ, कायदा विभाग, जाहिरात क्षेत्रासाठी चांगला काळ आहे.

पित्त, गुडघेदुखी, छातीत कफ, झोपेच्या समस्या, अनुवंशिक आजारासंबंधी तक्रारी राहतील. प्रवासात काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** ४, ६, ७.

## वृश्चिक

**हा** आठवडा सर्वसाधारणपणे चांगला जाईल. प्रयत्नांमध्ये कमी पडू नका. लाभ मिळतील. आर्थिक स्थिती सर्वसाधारण चांगली राहील. प्रयत्नांना भाग्याची साथ असल्यामुळे ठरवलेल्या गोष्टी पार पाडाल. चिकित्सक वृत्ती वाढेल. कामाची गती कमी असली तरीही नेटाने पूर्ण करा. आर्थिक गुंतवणूक करताना काळजी घ्या, नाहीतर पैसे अडकून पडतील. दुसऱ्यांचे प्रश्न सोडवताना स्वतःकडे दुर्लक्ष नको. घरामध्ये अस्वस्थता जाणवेल. गैरसमज टाळण्यासाठी वागण्या-बोलण्यामध्ये पारदर्शकता ठेवा. टोकाची भूमिका घेऊन नका. जमीन, शेतीच्या व्यवहारातून फायदा होईल. जोडीदार व मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. भावंडांचे सहकार्य राहील. वडिलोपार्जित संपत्तीचे प्रश्न मार्गी लावता येतील.

नोकरदारांनी पूर्ण अभ्यास करून घेतलेल्या निर्णयावर ठाम राहावे. वाद टाळा. कामाचे चीज होईल. व्यावसायिकांनी एकदम मोठी उडी मारण्यापेक्षा टप्प्याटप्प्याने व्यवसायात वाढ करावी. भागीदारीत मतभेद टाळा. व्यावहारिक दृष्टिकोन महत्त्वाचा ठरेल. सरकारी विभाग, व्यवस्थापन, तंत्रज्ञ, इंजिनिअर, वकील, संशोधन, घरगुती व्यवसायासाठी यशदायी काळ.

अनुवंशिक आजार, थकवा, नैराश्य, स्नायूंच्या समस्या, कान व डोळ्यांचे विकार, झोपेच्या समस्या, मधुमेहासंबंधी त्रास जाणवतील.

**शुभ दिनांक :** ४, ८, ९.

## धनु

**या** आठवड्यात अडथळ्यांवर मात करत तुम्हाला पुढे जायचे आहे. सकारात्मक दृष्टिकोन ही तुमची ताकद ठरेल. लाभाचे प्रमाण वाढेल. अति धाडस टाळा. धडाडीने व विचारपूर्वक काम करा. नवीन व्यवहार, नवीन व्यवसाय, कार्यक्षेत्रात बदल यासाठी पूरक काळ आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. मोठ्या गुंतवणुकीस मात्र योग्य काळ नाही. कागदपत्रांची काळजी घ्यावी. वाटाघाटी करताना योग्य शब्द वापरा. गैरसमज टाळावेत. कुटुंबामध्ये चांगले वातावरण ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. मुलांच्या कर्तृत्वाला वाव मिळेल. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. मित्रांबरोबर चांगला वेळ घालवाल. त्यांची मदतही होऊ शकेल.

नोकरदारांनी संघर्ष टाळावा. कामाचे फलित मिळेल. नोकरदार व व्यावसायिकांनी निर्णय घेण्यास उशीर करू नये. हातातील संधी जाऊ शकते. भाग्याची फारशी साथ नसल्यामुळे श्रम व सावधगिरीचे प्रमाण वाढवावे लागेल. प्रवासात अडथळे येतील. बौद्धिक क्षेत्र, किचकट कामे, व्यवस्थापन, शैक्षणिक व तांत्रिक क्षेत्र, स्थावर, कपडे, कायदा विभाग यासाठी चांगला काळ.

नेत्रविकार, कफ व पित्तविकार, दाताच्या समस्या, खांदेदुखी, वातविकार, मधुमेह, थायरॉईड, अनुवंशिक आजारापासून सांभाळा.

**शुभ दिनांक :** ६, ७, ८.

## मकर

**आठवड्याचा** प्रारंभ व उत्तरार्ध यश देणार आहे. त्यामुळे कामामध्ये संयम व सातत्य ठेवा. खूप दिवसांपासून ज्या संधीची, व्यवहाराची तुम्ही वाट बघत होता तो पूर्ण होईल. नियमाविरुद्ध वागल्यास भरपाई करावी लागेल. आर्थिक आवक चांगली राहील. भाग्य साथ देणार आहे. अचानक खर्च निघू शकतात. शक्तीबरोबरच युक्तीही वापरावी लागेल. बोलताना काळजी घ्या. घरापासून थोडे कामानिमित्त लांब जावे लागले तरी त्यामुळे फायदा होईल. जोडीदार व संततीशी जमवून घ्या. मित्रांकडून उत्तम सहकार्य मिळेल.

नोकरदारांनी सर्वांशी सौम्यपणे, मिळून मिसळून वागावे. वादामध्ये ऊर्जा वाया घालवण्यापेक्षा कामावर लक्ष केंद्रित करा. नोकरदार व व्यावसायिकांना नवीन संधीचा लाभ घेता येईल. व्यावसायिकांना नोकरवर्ग सहकार्य करेल. परंतु त्यांच्यावर जास्त खर्च करावा लागेल. पैसा चुकीच्या ठिकाणी खर्च होणार नाही याची काळजी घ्या. मार्केटिंग, संशोधन क्षेत्र, घाऊक व्यापार, आयटी, कमिशन एजंट, जमिनीचे व्यवहार, रसायन, व्यवस्थापन, कायदे विभाग, परदेश व्यापार या क्षेत्रामध्ये यश मिळू शकते.

खाण्यापिण्यातून संसर्ग, मधुमेह, नेत्रविकार, छातीत कफ अशा तक्रारी राहतील. मानसिक स्थैर्य राखा.

**शुभ दिनांक :** ३, ४, ८, ९.

## कुंभ

**आठवड्याचा** उत्तरार्ध थोडा अडचणीचा असल्यामुळे महत्त्वाची कामे सुरुवातीला आटपून घ्या. महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी गुरुचे आशीर्वाद तुम्हाला मिळणार आहेत. कुठल्या कार्याला प्राधान्य द्यायचे याचा निर्णय लवकर घ्यावा. व्यावहारिक दृष्टिकोन महत्त्वाचा ठरेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. पैसा अडकून पडणार नाही याची मात्र काळजी घ्यावी लागेल. कुठे आक्रमक व्हायचे व कुठे शांत राहायचे याचा निर्णय तुम्हाला घ्यावा लागेल. लहरीपणा नियंत्रणात ठेवा. कुटुंबाची आर्थिक जबाबदारी घ्यावीच लागेल. जोडीदाराशी जमवून घ्या. संततीच्या प्रगतीसाठी कठोर निर्णय घ्यावे लागतील. मित्रांचे सहकार्य मिळेल. आईच्या सल्ल्याचा उपयोग होईल.

नोकरदार व व्यावसायिकांनी अहंकार बाजूला ठेवून व्यावहारिक भूमिका घ्यावी. अनुभवाचा उपयोग करा. व्यवसायात काही प्रमाणात अडथळे आले तरीही प्रयत्न सोडू नका. नवीन व्यवहार, संधी विचारपूर्वक हाताळा. मोठा निर्णय शक्यतो पुढे ढकला. सरकारी क्षेत्र, पोलीस खाते, संशोधन, कला, खाद्यपदार्थ, कायदा, या क्षेत्रामध्ये यश मिळू शकते.

मानसिक अस्वस्थता, झोपेच्या समस्या, मणक्याचे विकार, नेत्रविकार, त्वचा, रक्तदोष, हार्मोन्स, पचनाच्या समस्या, कफविकार, दंतरोग या तक्रारी जाणवू शकतात.

**शुभ दिनांक :** ३, ४, ६, ७.

## मीन

**आठवड्याची** सुरुवात नियोजनासाठी वापरा. नंतर तुमच्या प्रयत्नांना यश मिळत जाईल. नैराश्य, आळशीपणा, कामामध्ये चालढकल या गोष्टींना फाटा द्या. आर्थिक गणिते काळजीपूर्वक हाताळा. आजूबाजूच्या लोकांपासून सावध राहा. येणारी परिस्थिती प्रत्येक वेळी तुमच्यासाठी योग्यच असेल असे नाही. प्रतिस्पर्ध्यांवर नियंत्रण ठेवता आले पाहिजे. भावनेच्या भरात निर्णय योग्य ठरणार नाही. बोलताना सौम्य शब्दांचा वापर करा. कुटुंबामध्ये सर्वसाधारणपणे वातावरण चांगले राहील. धार्मिक कार्याच्या निमित्ताने नातेवाईक जमून आनंदात वेळ घालवाल. मित्रांचा सल्ला पारखून घ्या. जोडीदाराशी मतभेद टाळा. संततीबरोबर विनाकारण दुरावा येणार नाही याकडे लक्ष ठेवा.

नोकरदारांनी हितशत्रू, स्पर्धक ओळखून त्यांच्यावर लक्ष ठेवावे. व्यावसायिकांना नवीन संधीचा लाभ घेता येईल. तात्पुरत्या फायद्यापेक्षा दूरगामी विचार करा. खाद्यपदार्थ, इंटिरियर डेकोरेशन, घरगुती व्यवसाय, कपडे, फॅशन डिझायनर, कमिशन एजंट, स्थावर, या क्षेत्रांमध्ये यश मिळू शकते.

पित्त, भाजणे, ॲलर्जी, स्नायू, हृदयविकार, पायाचे दुखणे, नेत्रविकार, मधुमेह, झोपेच्या समस्या, छातीत कफ साठणे, पोषक मूलद्रव्यांची कमतरता यासारख्या आरोग्याच्या तक्रारी राहतील. मानसिक आरोग्य सांभाळा.

**शुभ दिनांक :** ६, ७, ८.

# नवाकाळ

• पुणे । रविवार ३ ऑगस्ट, २०२५ • पान -८


## मुसळधार पावसाचा फटका अमरनाथ यात्रा रद्द केली



■ श्रीनगर

**जम्मू** आणि काश्मीरमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रशासनाने दोन दिवसांपूर्वी खबरदारीचा उपाय म्हणून पहलगाम आणि बालटाल या दोन्ही मार्गांवरील यात्रेवर बंदी घातली होती. पण प्रशासनाकडून आता अमरनाथ यात्रा थांबवण्यात आली आहे.

यंदा अमरनाथ यात्रा ३ जुलै रोजी सुरू झाली होती आणि ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी संपणार होती. यावेळी यात्रा फक्त १ महिना चालू शकली. या कालावधीत सुमारे ४.१० लाख भाविकांनी गुहेला भेट दिली. गेल्या वर्षी हा आकडा ५.१० लाखांहून अधिक होता. यात्रेदरम्यान सुमारे ५०,००० सीआरपीएफ जवान तैनात करण्यात आले होते.

काश्मीरचे विभागीय आयुक्त विजय कुमार बिधुरी म्हणाले की, बालटाल आणि पहलगाम मार्गांवर दुरुस्तीचे काम सुरू असून, सतत मशीन आणि कर्मचारी तैनात आहेत. पावसामुळे दोन्ही मार्गांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे सध्या यात्रा पुन्हा सुरू करणे शक्य नाही.



कांदिवली श्री



चारकोप राजा

## माघी गणेशोत्सवातील गणेशमूर्तींचे सहा महिन्यांनंतर समुद्रात विसर्जन

■ मुंबई

**पीओपी** गणेशमूर्तींचे समुद्रात विसर्जनाला मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर आज माघी गणेशोत्सवात विराजमान झालेल्या कांदिवलीतील डहाणूकरवाडीचा कांदिवलीचा श्री आणि चारकोपचा राजाचे तब्बल ६ महिन्यांनंतर गणेशभक्तांनी विसर्जन केले. या विसर्जन मिरवणुकीत गोविंदा पथकांनी थर रचून मानवंदना दिली. त्यात साईलीला दहिकाला पथक, गोराई उत्कर्ष दहिकाला पथक, स्वस्तिक महिला गोविंदा पथक, ओम साई माऊली क्रीडा मंडळांचा समावेश होता. पीओपी मूर्तींचे नैसर्गिक जलाशयात विसर्जन करण्यात येऊ नये, असे आदेश उच्च न्यायालयाने ३० जानेवारी रोजी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी), राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेसह अन्य महापालिकांना दिले होते. त्यानंतर मुंबई महापालिकेने पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार केले होते. मात्र कांदिवलीचा श्री आणि चारकोपचा राजा कृत्रिम तलावात आपल्या मूर्तींचे विसर्जन करण्यास नकार दिला होता. कांदिवलीच्या श्री मंडळाने आपली मूर्ती मंडपालगतच्या मैदानात झाकून ठेवली होती. तर चारकोपचा राजा या मंडळाने मूर्ती अज्ञातस्थळी झाकून ठेवली होती. उच्च न्यायालयाने सहा फुटांवरील मूर्तींचे समुद्रात विसर्जन करण्याची परवानगी दिल्यानंतर या दोन्ही मंडळांनी मूर्तींचे समुद्रात विसर्जन केले.

## इगतपुरीच्या महिंद्रा कंपनीतील कंत्राटी कामगार बेमुदत संपावर

**कंत्राटदार बदलण्याचा घाट**

■ नाशिक



**नाशिक** जिल्ह्यातील इगतपुरी येथील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या इंजिन विभागातील कंत्राटी कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. आपला कंत्राटदार बदलू नये यासाठी त्यांनी हे आंदोलन पुकारले असून, कंपनीने या संदर्भात आपली अजून भूमिका व्यक्त केलेली नाही.

कामगारांनी म्हटले आहे की, या कंपनीतील कंत्राटी कामगारांचा कंत्राटदार बदलण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांची ज्येष्ठता, ग्रॅज्युइटी व इतर लाभ धोक्यात आले आहेत. नवा कंत्राटदार त्यांना नव्याने आलेल्या कामगारांप्रमाणे वागवून त्यांची सेवाज्येष्ठता नाकारेल. याआधीही अशाच मुद्यांवर कंपनीत २०२० साली संप झाला होता. त्यावेळच्या कामगारांच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत. त्यामुळे हा संप कितीही काळ चालला तरी कामगार त्याच्यासाठी तयार आहेत. माजी नगरसेवक सतिश सकट यांना एकनाथ शिंदे शिवसेना युनियनच्या स्थापनेसाठी कंपनीत येऊ न दिल्याबद्दलही सध्या संघर्ष सुरू आहे.

## सोलापूर साखर कारखाना घोटाळा राजेंद्र राऊतांची ईडीकडे तक्रार

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील तीन साखर कारखान्यांमध्ये सुमारे १०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप करत बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी केला आहे. या घोटाळ्याप्रकरणी राऊत यांनी थेट अंमलबजावणी संचालनालयाकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली असून, लवकरच उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशाराही दिला आहे.

राजेंद्र राऊत म्हणाले की, सोलापूर मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तत्कालीन संचालकांनी बेकायदेशीर कर्जवाटप करून हजारो कोटींचा गैरव्यवहार केला आहे. या घोटाळ्यांत साखर तारण ठेवून बँकांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज उचलण्यात आले. प्रत्यक्षात साखर उपलब्ध झाली नाही आणि त्या कर्जाची परतफेडही करण्यात आली नाही. या प्रकरणांतील गुन्हे काही महिन्यांपूर्वी नोंदवले गेले असून, या प्रकरणांची सखोल चौकशी ईडीमार्फत व्हावी.

## तुळजापूरातून गहाळ शस्त्रपूजन तलवार वाकोजीबुवांच्या मठात

■ धाराशिव

**राज्यातील** साडेतीन शक्तीपिठांपैकी एक असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिरातील शस्त्र पूजनाची भवानी तलवार गहाळ झाल्याचा आरोप पुजाऱ्यांनी केला होता. यामुळे मंदिर प्रशासन व भाविकांमध्ये खळबळ उडाली होती.मात्र ही तलवार दर्शनासाठी वाकोजीबुवांच्या मठात ठेवल्याची माहिती मंदिर प्रशासनाने दिली.

मंदिर प्रशासनाने सांगितले की, शस्त्रपूजन तलवार मंदिरात नाही. तर भाविकांच्या



दर्शनासाठी आणि दैनंदिन पूजेसाठी महंत वाकोजीबुवा यांच्या मठात तलवार ठेवली आहे. माध्यमांवरील वृत्त निरर्थकअसून तलवार सुरक्षित आहे.

श्री तुळजाभवानीच्या पुजाऱ्याला माहिती न देता पद्मश्री गणेश्वर द्रविड शास्त्रीच्या मार्फत मंदिर संस्थांनी होम हवन विधी केला. या माध्यमातून आठ आयुधांतील शस्त्राची तत्त्व आणि शक्ती तलवारीमध्ये टाकले होते. मंदिरात सुरू असणाऱ्या कामात अडथळे येऊ नयेत, हा या पूजेचा उद्देश होता. मंदिर संस्थांच्या खजाना खोलीत ही तलवार होती. मात्र तिथे ती न दिसल्याने तलवार गहाळ झाल्याचे वृत्त सगळीकडे पसरले होते.

## जम्मू-काश्मीरच्या कुलगाममध्ये एका दहशतवाद्याला कंठस्नान

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीरमधील** कुलगाममध्ये भारतीय सुरक्षा दलांनी आज सकाळी एका दहशतवाद्याला कंठस्नान घातले. आज सकाळपासून कुलगामच्या अखल जंगलात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार सुरू होता. दहशतवादाविरुद्ध सुरक्षा दलांच्या कारवाईचा आज दुसरा दिवस होता. या ऑपरेशनमध्ये स्पेशल ऑपरेशन ग्रुप, जम्मू-काश्मीर पोलीस, लष्कर आणि सीआरपीएफ या दलातील जवानांचा समावेश आहे. याबाबत एका अधिकाऱ्याने माहिती दिली की, या परिसरात दहशतवादी कारवायांची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सकाळी शोधमोहीम सुरू करण्यात आली. यावेळी दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. त्यानंतर चकमक सुरू झाली. अखल जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांची संख्या अद्याप समजू शकलेली नाही. परंतु पुढील कारवाईसाठी अधिक सुरक्षा दलांना त्या भागात पाठवले आहे. तिथे लपलेले दहशतवादी पीपल्स अँटी-फॅसिस्ट फ्रंट (पीएएफएफ) संघटनेचे असल्याचा संशय आहे.

## आज तिन्ही रेल्वेमार्गांवर ४ ते ५ तासांचा मेगाब्लॉक

■ मुंबई

**उपनगरीय** रेल्वेमार्गांच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी मध्य, हार्बर आणि पश्चिम मार्गावर उद्या रविवार ३ ऑगस्ट रोजी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

मध्य रेल्वेवर चार तासांचा आणि हार्बर व पश्चिम मार्गावर पाच तासांचा मेगाब्लॉक असणार आहे. मध्य रेल्वे मार्गावर उद्या रविवारी माटुंगा ते मुलुंड दरम्यान अप व डाऊन जलद मार्गावर सकाळी ११.०५ वाजेपासून ते ३.४५ वाजेपर्यंत ब्लॉक घेण्यात येईल. ब्लॉक काळात सीएसएमटी येथून १०.३६ ते १५.१० वाजेपर्यंत सुटणाऱ्या डाऊन जलद मार्गावरील ट्रेन माटुंगा स्थानकावर डाऊन धीम्या मार्गावर वळवल्या जाऊन त्यांच्या निर्धारित स्थानकांवर थांबतील आणि १५ मिनिटे उशिराने गंतव्यस्थानी पोहोचतील. ठाणे पलीकडे जाणाऱ्या



जलद ट्रेन मुलुंड स्थानकावर डाऊन जलद मार्गावर पुन्हा वळवल्या जातील. तर ठाणे येथून सकाळी ११.०३ ते दुपारी ३.३८ पर्यंत सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील ट्रेन मुलुंड स्थानकावर अप धिम्या मार्गावर वळवल्या जाऊन मुलुंड आणि माटुंगा स्थानकांदरम्यान त्यांच्या निर्धारित स्थानकांवर थांबतील आणि माटुंगा स्थानकावर अप जलद मार्गावर पुन्हा वळवल्या जातील व १५ मिनिटे उशिराने गंतव्यस्थानी पोहोचतील. कुर्ला आणि वाशी स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन हार्बर मार्गावर ११.१० वाजेपासून ते १६.१० वाजेपर्यंत ब्लॉक असेल. या कालावधीत सीएसएमटी येथून १०.३४ वाजल्यापासून १५.३६ वाजेपर्यंत वाशी/बेलापूर/पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील ट्रेन रद्द राहतील. पनवेल/बेलापूर/वाशी येथून १०.१६ वाजल्यापासून १५.४७ वाजेपर्यंत सीएसएमटीकडे जाणाऱ्या अप हार्बर मार्गावरील ट्रेन रद्द राहतील. तसेच पश्चिम रेल्वे मार्गावर चर्चगेट ते मुंबई सेंट्रल दरम्यान अप-डाऊन जलद मार्गावर सकाळी १०.३५ ते दुपारी ३.३५ वाजेपर्यंत ब्लॉक असेल.

## मिठी नदी गैरव्यवहार प्रकरणी जोशी व कदमविरुद्ध आरोपपत्र

■ मुंबई

**मिठी** नदीतील गाळ काढणे कंत्राटातील कथित निधी गैरवापर प्रकरणात केतन कदम आणि जय जोशी या दोन आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल झाले. याप्रकरणी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेने ७ हजार पानांचे आरोपपत्र न्यायालयात सादर केले. तपासातील १६-१७ जणांचे जबाबानुसार या कंत्राट निविदांमध्ये फेरफार करून आरोपींनी ९ कोटी रुपयांपैकी ४.५ कोटी स्वतःकडे ठेवल्याचा आरोप आहे. या व्यवहारात केतन कदम आणि जय जोशी यांनी मध्यस्थी म्हणून काम केले. यापूर्वी निवडलेल्या कंपन्यांनाच गाळ काढण्याचे कंत्राट मिळण्यासाठी खासगी कंपन्यांचे संचालक आणि पालिकेतील वरिष्ठ अधिकारी यांनी प्रयत्न केल्याचा आरोप आरोपपत्रात नमूद आहे. यामध्ये त्याच कंपनीला गाळ काढण्याचे कंत्राट मिळावे या अनुषंगाने नियम, अटी तरतूद केल्याची माहिती आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या गुन्ह्यांच्या आधारे ईडीनेही या प्रकरणी स्वतंत्र गुन्हा नोंदवला आहे. ईडीने दोन दिवसांपूर्वी मुंबई मिठी नदीचे गाळ काढण्यासंदर्भात कंत्राट दिलेल्या कंपन्यांच्या कार्यालयावर छापेमारी केली होती.

## वरळी कोळीवाडा वारस जमीन! हायकोर्टाचे सर्वेक्षणाचे आदेश

■ मुंबई



**मुंबईतील** एकाहून एक मोक्याच्या जमिनी खासगी विकासकाच्या घशात जात असताना वरळी कोळीवाड्यातील कोळी समाजाच्या वारस जमिनीबाबत सकारात्मक निर्णय आला आहे. मुंबई महानगरपालिकेने अडचणींचा पाढा वाचल्यानंतरही मुंबई उच्च न्यायालयाने या जमिनीच्या सर्वेक्षणाचे व सीमांकनाचे आदेश दिले आहेत.

वरळी कोळीवाड्यातील सुमारे १ लाख २० हजार चौरस मीटरहून अधिक जागा ही कोळी समाजाच्या ताब्यात आहे. ही जमीन फार आधीपासून ते मासेमारी व इतर कामांसाठी वापरत आहेत. या जमिनीच्या काही भागावर झोपडपट्ट्यांनी अतिक्रमण केले तर काही भाग हा लष्कराच्या ताब्यात आहे. येथील रहिवाशी वासुदेव शिवराम वरळीकर यांनी या जागेवरील हक्कासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. त्यावरील सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती अभय आहुजा यांनी हे आदेश दिले. पालिकेने या संदर्भात म्हटले की, १९०८ च्या नागरी संहिताअंतर्गत नोटीस पाठवणे आवश्यक आहे. त्यावर न्यायालयाने सांगितले की, नोटीस जारी केल्याने अवास्तव विलंब होईल व या आदेशाचे उद्दिष्ट बाजूला पडेल. हा हुकुम १९९४ सालचा असल्याने त्यात आता अधिक उशीर करायला नको. त्यावर पालिकेने आता ही जमीन ओळखणे कठीण असल्याचे कारण पुढे केले.

त्यावर न्यायालयाने म्हटले की, या जमिनीचे वर्णन व नोंदी या सर्वेक्षण अधिकाऱ्यांकडे आहे. त्यामुळे अधिकाऱ्याचीच न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करून हे काम करण्यात यावे. या प्रकरणाची पुढील सुनावणी पुढच्या वर्षी २५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे.

## अयोध्या राममंदिर उडव! बीडच्या तरुणाला ऑफर

■ बीड

**अयोध्येतील** राम मंदिर आरडीएक्सने उडवण्याच्या उद्देशाने बीडच्या तरुणाला पाकिस्तानातून ऑफर आल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. याप्रकरणी शिरूर कासार पोलीस ठाण्यात तरुणाने तक्रार दिली.

या तक्रारीनुसार तरुणाच्या समाजमाध्यम खात्यावर कराची लोकेशनवरून संदेश प्राप्त झाला की, अयोध्येतील श्रीराम मंदिर आरडीएक्सने उडवायचे आहे. त्यासाठी १ लाख रुपये देऊ. या कामासाठी ५० जण पाहिजे. त्यांना प्रत्येकी १ लाख रुपये देऊ. मंदिर उडवण्यासाठी आरडीएक्सही पुरवण्यात येईल. मेसेज पाठवणाऱ्याने पाकिस्तानातील कराचीचे लोकेशनही शेअर केले आहे.

## होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी औषध देण्यासाठी विशेष कोर्स

**केंद्र सरकारची मान्यता**

■ मुंबई

**देशातील** होमिओपॅथी डॉक्टरांना आधुनिक औषधनिर्माण शास्त्राचे प्रमाणपत्र प्रशिक्षण देण्याला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. यामुळे होमियोपॅथी डॉक्टर रुग्णांना ॲलोपॅथीची औषधे देऊ शकणार आहेत. एमबीबीएस डॉक्टरांच्या संघटनांनी या प्रस्तावाला विरोध केला होता. या अर्धवट ज्ञानामुळे रुग्णांच्या जीवाला धोका पोहोचू शकतो, असे त्यांनी म्हटले होते. त्यांचा विरोध डावलून हा निर्णय घेण्यात आला आहे.

लोकसभेत नुकत्याच झालेल्या चर्चेत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी ही माहिती दिली. या संदर्भातील एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात त्यांनी म्हटले की, सर्व राज्य सरकारांना एक वर्षाचे औषधनिर्माण शास्त्राचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवण्याला मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे होमिओपॅथी डॉक्टरही एमबीबीएस डॉक्टरप्रमाणे रुग्णांना गरज असल्यास ॲलोपॅथी उपचार देता येतील. देशातील ग्रामीण व दुर्गम भागात अधिक चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारने हे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांसाठी वेगळी नोंदणी सुरू केली आहे. या डॉक्टरांना होमिओपॅथी परिषदेकडेही नोंदणी करावी लागणार आहे.

देशभरातील डॉक्टरांच्या संघटनेने या प्रस्तावाला विरोध केला होता. पाच वर्षांच्या एमबीबीएस पदवीनंतर ज्या पद्धतीने उपचार करता येतात त्या पद्धतीने या एका वर्षाचा कोर्स करणाऱ्या डॉक्टरांना करता येईल का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

**गुन्हे अन्वेषण शाखेकडे तपास वर्ग**

■ परभणी

**कायद्याचे** शिक्षण घेणारे सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीत झालेल्या मृत्यू प्रकरणात आज मोंढा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणाचा तपास आता गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे.

परभणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतिकृतीची तोडफोड झाल्यानंतर ११ डिसेंबर रोजी जिल्हा बंदच्या पार्श्वभूमीवर जाळपोळ आणि दगडफेकीच्या घटना घडल्या. त्यानंतर पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवले आणि त्यात सोमनाथ सूर्यवंशी यांना अटक करण्यात आली. त्यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. या घटनेनंतर सोमनाथ यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने एक आठवड्यात संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले होते. राज्य शासनाने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. पण सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला. या प्रकरणात कोणते पोलीस दोषी आहेत त्याची जबाबदारी निश्चित करून मग नावे या गुन्ह्यात समाविष्ट करावीत, असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

## स्वदेशीचा संकल्प करा पंतप्रधान मोदींचे आवाहन

■ वाराणसी

**जागतिक** अर्थव्यवस्था सध्याच्या काळात संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. जगातील सर्व देश स्वतःचा स्वार्थ पाहत आहेत. अशा स्थितीत आपणही आपल्याच देशात तयार होणाऱ्या वस्तू वापरायला हव्यात. त्यामुळे देशवासीयांनी आता स्वदेशीचा संकल्प केला पाहिजे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसीत केले. ते आज येथे आयोजित विविध प्रकल्पांच्या पायाभरणी व लोकार्पण कार्यक्रमानंतर आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. अमेरिकेने भारतीय वस्तूंवर लावलेल्या २५ टक्के आयात शुल्काच्या पार्श्वभूमीवर मोदी यांनी हे आवाहन केले. नरेंद्र मोदी यांनी आज वाराणशीत २२०० कोटी खर्चाच्या ५२ प्रकल्पांचे लोकार्पण व पायाभरणी केली. त्यानंतर सेवापुरीतील बनौली गावात त्यांची जाहीर सभा झाली. ते म्हणाले की, आता आपल्याला त्याच वस्तू विकत घ्याव्या लागतील, ज्या आपल्याच देशातल्या लोकांनी तयार केल्या आहेत. आपल्याला आता 'ग्लोकल फॉर लोकल' हा मंत्र स्वीकारायला हवा.

## मनालीमध्ये भूस्खलन झाल्याने लेह-चंदीगड राष्ट्रीय महामार्ग बंद

**१०,००० घरे पाण्याखाली**

■ शिमला



**हिमाचल** प्रदेशात मुसळधार पावसामुळे २९१ रस्ते बंद झाले आहेत. मनाली येथे भूस्खलन झाल्याने चंदीगड-मनाली-लेह राष्ट्रीय महामार्गही बंद झाला आहे. राज्यात विविध अपघातांमध्ये आतापर्यंत ९५ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच या नैसर्गिक आपत्तीमध्ये १५०० घरांचे नुकसान झाले आहे. या पावसाचा अमरनाथ यात्रेवरदेखील परिणाम झाला असून, यात्रा उद्यापर्यंत स्थगित करण्यात आली आहे.

पहलगाम आणि बालटाल या यात्रेच्या दोन मार्गांवर दुरुस्तीचे काम सुरू आहे. काल सकाळी बालटाल मार्गावरून यात्रा सुरू करण्यात आली होती. परंतु मुसळधार पावसामुळे यात्रा पुन्हा थांबवण्यात आली. उत्तर प्रदेशात मुसळधार पावसामुळे गंगा, यमुना आणि बेतवा नद्या दुथडी भरून वाहत आहेत. प्रयागराजमधील सलोरी, गोविंदपूर या भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. येथे सुमारे १०,००० घरे २ ते ३ फूट पाण्याखाली आहेत. काशीतील सर्व ८४ घाट पाण्यात बुडाले आहेत.